मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे स्थळप्रत.
अनुक्रम २०७०३५ वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

सकलसंतशिरोमणी



REFBK 0009421
REFBK-0009421

श्रीज्ञानेश्वर महाराज

२४६३५ ३.६५
९४२८. १६/३/५८

# प्र स्ता व ना

वाचे बरवें कवित्व । कवित्वीं बरवें रसिकत्व ॥
रसिकत्वीं परतत्व । स्पर्श जैसा ॥ ३४७ ॥
॥ श्रीज्ञानेश्वरी अ. १८ ॥

माझे स्नेही ह. भ. प. बन्सीलाल हे वारकऱ्यांना प्रिय असलेले लहान लहान सहा ग्रंथ एकत्र छापीत आहेत. वास्तविक यांपैकीं प्रत्येक ग्रंथ हा एक एक चिद्‌रत्नच आहे. त्यांना माझ्या शब्दांच्या उटण्यांनीं घांसून हीं रत्नें बाजारांत मांडलीं तरच तीं चमकतील असें नाहीं; म्हणून या ग्रंथास प्रस्तावनेची खरोखर गरज नाहीं. परंतु मित्राचे शब्द मोडणें जीवावर येतें म्हणूनच खालील चार शब्द लिहीत आहें.

मानवी जीवन सुखकर करण्याचे प्रयत्न नित्यश: नवीन नवीन होतच आहेत. हल्लीं त्या प्रयत्नास बाह्य सुखसाधनें सुधारणें,त्यांची विपुलता निष्पन्न करणें हें रूप प्राप्त झालेलें आहे. सुखाचीं बाह्य साधनें विपुल झालीं तरीसुद्धां त्या बाह्य साधनांचा उपयोग करून आपणांस सुख लावून घेणें यांस एक प्रकारच्या मनोरचनेची आवश्यकता आहे. आमच्याकडील संत व उपनिषद् द्रष्टे ऋषि हे तर सुखाचा निर्झर आपल्या हृदयांतच आहे असें अट्टाहासानें प्रतिपादित आहेत. तें जरी आपणांस अनुभवास न आल्यामुळें मान्य करणें जड होत असेल तर असलेल्या सुखसाधनांचा उपयोग करून वर म्हटल्याप्रमाणें तें सुख स्वत:स लावून घेण्यास एका विशिष्ट प्रकारच्या मनाच्या स्थितीची आवश्यकता आहे. ही गोष्ट सर्वमान्य होण्यासारखी आहे. ती मनाची अचल स्थिति करून देण्याचें हे ग्रंथ सोपें व सुलभ साधन आहे.

या ग्रंथांत 'असोनि संसारीं' सुखाची खटपट करणाराविषयीं-पासून तों थेट 'जीवन्मुक्त' या कोटीपर्यंत सर्व वेगवेगळ्या अधिकाराच्या लोकांना शांती, समाधान, अत्यानंद आणून देणारे लहान लहान ग्रंथ गोंवलेले आहेत. हे सर्व ग्रंथ असे आहेत कीं, प्रत्येकानें मुखोद्‍गत करून आपली वाणी अलंकृत करून नेहमीं आपल्याशीं यांतील सुभाषितें गुणगुणत रहावीं. यानें खात्रीनें मनास शांती मिळेल यांत शंकाच नाहीं.

ह्या ग्रंथांची योग्यता काय आहे हें ज्यांनीं त्यांच्याशीं समरस होऊन त्यांतील प्रमेयांचा अनुभव घेतला त्यांच्या शब्दांत खालीं देतों

**श्री अनुभवामृत**— तैसाचि अनुभवामृत ॥ सिद्धपीठ केले भाव ॥ दाऊनि मनोहर राणीव । अनुभवी जाणती ॥

॥ श्रीनामदेव अभंग १०१५ ॥

**श्रीचांगदेवपासष्टि**— वाचिलिया अर्थ आणितां मानसीं । पाविजे अनायासीं परमतत्त्वा ॥ १ ॥

॥ श्रीनिळोबा अभंग १५५६ ॥

**हरिपाठ**— हरिपाठ कीर्ति मुखें जरी गाय ॥ पवित्रचि होय देह त्याचा ॥ १ ॥

॥ श्रीज्ञानदेवकृत हरिपाठ अभंग १८ वा. ॥

**चिरंजीव पद**— चिरंजीव पद पावावयासी ॥ अधिकार कैसा साधकासी ॥ किंचित् बोलेन निश्चयेसी । कळावयासी साधका ॥१॥

॥ श्रीएकनाथकृत चिरंजीव पद ओवी ॥ १ ॥

**श्रीविष्णुसहस्रनाम**— नामाचिया सहस्रवरी । नावा इया अवधारीं ॥ सजूनियां संसारीं । तारु जाहलों ॥ ९० ॥

॥ श्रीज्ञानेश्वरी अ. १२. ॥

**श्रीमद्भगवद्गीता**— म्हणोनि जाणतया सवा । गीताचि येकी सेवा । काय कराल आघवां । शास्त्रीं येरीं ।। १६९५ ।।
।। श्रीज्ञानेश्वरी अ. १८ ।।

ग्रंथाची छपाई उत्तम आहे व किंमतहि बेताची आहे. आमच्या स्नेह्याच्या इच्छेप्रमाणें श्रीज्ञानेश्वर महाराज यांच्या कृपेनें हें ग्रंथ सर्वांचें जीवन होवोत.

पुण्यपत्तन,<br>
आश्विन व।। ११<br>
शके १८५७.

**शंकर वामन दांडेकर.**

# द्वितीय आवृत्तीची प्रस्तावना.

आमचे स्नेही ह. भ. प. बन्सीलाल रामसुक कर्वे यांनीं काढलेली 'वारकरी जीवन' या पुस्तकाची प्रथमावृत्ति संपून दुसरी काढण्याचा आज सुयोग येत आहे. कै. गु. जोगमहाराजांनीं स्थापन केलेल्या आळंदी येथील वारकरी शिक्षण संस्थेवर ह. भ. प. बन्सीलालजी यांचें इतकें प्रेम आहे, कीं त्यांनीं पहिल्या आवृत्तीच्या छपाईनंतर बहुतेक सर्व प्रती संस्थेच्या हवालीं केल्या; हेतु हा कीं, संस्थेनें त्यांची विक्री करून तें उत्पन्न घ्यावें. ती आवृत्ती संपल्यावर तर त्यांनीं आपल्या सर्व हक्कांसह 'वारकरी जीवन' विना मोबदला संस्थेस दिलें. संस्था त्यांच्या या उपकाराबद्दल त्यांची सदैव ऋणी आहे.

ही प्रत थोडक्या अवकाशांत प्रसिद्ध करण्यास आम्हांस श्री. य. गो. जोशी व मङ्गल साहित्य छापखान्याचे मालक श्री. अमरेन्द्र गाडगीळ यांनीं जें साहाय्य केलें त्याबद्दल त्यांचे आम्ही आभारीं आहोंत.

श्रीक्षेत्र आळंदी.<br>
का. व. ११<br>
शके १८७१.

**शं. वा. दांडेकर.**

या ग्रंथांत 'असोनि संसारीं' सुखाची खटपट करणाराविषयीं-पासून तों थेट 'जीवन्मुक्त' या कोटीपर्यंत सर्व वेगवेगळ्या अधिकाराच्या लोकांना शांती, समाधान, अत्यानंद आणून देणारे लहान लहान ग्रंथ गोंवलेले आहेत. हे सर्व ग्रंथ असे आहेत कीं, प्रत्येकानें मुखोद्गत करून आपली वाणी अलंकृत करून नेहमीं आपल्याशीं यांतील सुभाषितें गुणगुणत रहावीं. यानें खात्रीनें मनास शांती मिळेल यांत शंकाच नाहीं.

ह्या ग्रंथांची योग्यता काय आहे हें ज्यांनीं त्यांच्याशीं समरस होऊन त्यांतील प्रमेयांचा अनुभव घेतला त्यांच्या शब्दांत खाली देतों

**श्री अनुभवामृत**— तैसाचि अनुभवामृत ।। सिद्धपीठ केले भाव ।। दाऊनि मनोहर राणीव । अनुभवी जाणती ।।

।। श्रीनामदेव अभंग १०१५ ।।

**श्रीचांगदेवपासष्टि**— वाचिलिया अर्थ आणितां मानसीं । पाविजे अनायासीं परमतत्त्वा ।। १ ।।

।। श्रीनिळोबा अभंग १५५६ ।।

**हरिपाठ**— हरिपाठ कीर्ति मुखें जरी गाय ।। पवित्रचि होय देह त्याचा ।। १ ।।

।। श्रीज्ञानदेवकृत हरिपाठ अभंग १८ वा. ।।

**चिरंजीव पद**— चिरंजीव पद पावावयासी ।। अधिकार कैसा साधकासी ।। किंचित् बोलेन निश्चयेसीं । कळावयासी साधका ।।१।।

।। श्रीएकनाथकृत चिरंजीव पद ओवी ।। १ ।।

**श्रीविष्णुसहस्रनाम**— नामाचिया सहस्रवरी । नावा इया अवधारीं ।। सजूनियां संसारीं । तारु जाहलों ।। ९० ।।

।। श्रीज्ञानेश्वरी अ. १२. ।।

**श्रीमद्भगवद्गीता**— म्हणोनि जाणतया सवा । गीताचि येकी सेवा । काय कराल आघवां । शास्त्रीं येरीं ।। १६९५ ।।

।। श्रीज्ञानेश्वरी अ. १८ ।।

ग्रंथाची छपाई उत्तम आहे व किमतहि बेताची आहे. आमच्या स्नेह्याच्या इच्छेप्रमाणें श्रीज्ञानेश्वर महाराज यांच्या कृपेनें हें ग्रंथ सर्वांचें जीवन होवोत.

पुण्यपत्तन,
आश्विन व।। ११
शके १८५७.

**शंकर वामन दांडेकर.**

## द्वितीय आवृत्तीची प्रस्तावना.

आमचे स्नेही ह. भ. प. बन्सीलाल रामसुक कर्वे यांनीं काढलेली 'वारकरी जीवन' या पुस्तकाची प्रथमावृत्ति संपून दुसरी काढण्याचा आज सुयोग येत आहे. कै. गु. जोगमहाराजांनीं स्थापन केलेल्या आळंदी येथील वारकरी शिक्षण संस्थेवर ह. भ. प. बन्सीलालजी यांचें इतकें प्रेम आहे, कीं त्यांनीं पहिल्या आवृत्तीच्या छपाईनंतर बहुतेक सर्व प्रती संस्थेच्या हवालीं केल्या; हेतु हा कीं, संस्थेनें त्यांची विक्री करून तें उत्पन्न घ्यावें. ती आवृत्ती संपल्यावर तर त्यांनीं आपल्या सर्व हक्कांसह 'वारकरी जीवन' विना मोबदला संस्थेस दिलें. संस्था त्यांच्या या उपकाराबद्दल त्यांची सदैव ऋणी आहे.

ही प्रत थोडक्या अवकाशांत प्रसिद्ध करण्यास आम्हांस श्री. य. गो. जोशी व मङ्गल साहित्य छापखान्याचे मालक श्री. अमरेन्द्र गाडगीळ यांनीं जें साहाय्य केलें त्याबद्दल त्यांचे आम्ही आभारीं आहोंत.

श्रीक्षेत्र आळंदी.
का. व. ११
शके १८७१.

**शं. वा. दांडेकर.**

# तिसऱ्या आवृत्तीचे दोन शब्द.

श्रीहरिकृपेनें 'वारकरी जीवन' या ग्रंथाची तिसरी आवृत्ती प्रकाशित होत आहे. या आवृत्तींत पूर्वीपेक्षां अनुभवामृताच्या कठिण शब्दार्थांचा कोश व श्रीएकनाथ महाराजकृत हरिपाठ व आनंदलहरी हे ग्रंथ वाढवून हा ग्रंथ सर्वोत्कृष्ट व सुशोभित उत्तम कागदावर चांगला छापून प्रसिद्ध केला आहे. किमत पूर्वींचीच ठेविली आहे. तरी सर्वांनीं घेण्याची कृपा करावी.

कार्तिक व॥ ११
१८७९

ब. रा. कर्वा.

स्वानंद सुखनिवासी श्रीगुरुमहाराज

# ह. भ. प. विष्णुबोवा जोग



जन्म

भाद्रपद व॥ १ शके १७८९

प्रयाण

माघ व॥ १ शके १८४१

यांस परमादरानें व कृतज्ञतेनें ही ग्रंथमालिका अर्पण करितां

२ ७३५

# श्रीअनुभवामृत

## प्रकरण पहिले.

८४.२१.

यदक्षरमनाख्येयमानंदमजकेवलं ॥
श्रीमन्निवृत्तिनाथेति ख्यातं दैवतमाश्रये ॥१॥
गुरुरित्याख्यया लोके साक्षाद्विद्या हि शांकरी ॥
जयत्याज्ञा नमस्तस्यै दयाद्रायै निरंतरम् ॥२॥
सार्धं केन च कस्यार्धं शिवयोः समरूपिणोः ॥
ज्ञातुं न शक्यते लग्नमिति द्वैतच्छलान्मुहुः ॥३॥
अद्वैतमात्मनस्तत्त्वं दर्शयंतौ मिथस्तराम् ॥
तौ वंदे जगतामाद्यौ तयोस्तत्त्वाभिपत्तये ॥४॥
मूलायाग्राय मध्याय मूलमध्याग्रमूर्तये ॥
क्षीणाग्रमूलमध्याय नमः पूर्णाय शंभवे ॥५॥
ऐशीं हीं निरुपाधिकें । जगाचीं जिये जनकें ॥
तियें वंदिलीं मियां मूळिकें। देवोदेवी ॥१॥
जो प्रीयुचि प्राणेश्वरी । उलथे आवडीचिये सरोभरी ॥
चारुस्थळीं एकाहारी । एकाआंगाची ॥२॥
आवडीचेनि वेगें । एकएकातें गिळिती आंगें ॥
कीं द्वैताचेनि पांगें । उगळितें आहाति ॥३॥
जी एकाचि नव्हे एकसरे । दोघा दोपण नाहीं पुरे ।
काय नेणो साकारे । स्वरूपें जिये ॥४॥

केशी स्वसुखाची अळुकी । जे दोनीपण मिळूनि एकी॥
नेदेतीच कवतुकी । एकपण फुटो ॥ ५ ॥
हा ठावोवरी वियोगभेडे । जे बाळ जगायेवढे ॥
वियाली परी न मोडे । दोघुलेपण ॥ ६ ॥
आपुलिये अंगीं संसारा । देखिलिया चराचरा ॥
परी नेदितीच तिसरा । झोंक लागों ॥७॥
जया एके सत्तेचें बैसणें । दोघां एका प्रकाशाचें लेणें॥
जे अनादी एकपणें । नांदती दोघे ॥ ८ ॥
भेदु लाजोनि आवडी । एकरसीं देत बुडी ॥
जो भोगणया थाव काढी । द्वैताचा जेथें ॥९॥
जेणें देवें संपूर्ण देवी । जियेवीण कांहीना तो गोसावी॥
किंबहुना एकोपजीवी । एकएकाचीं ॥१०॥
कैसा मेळु आला गोडिये । दोघ न माती जगीं इये ॥
कीं परमाणूहि माजी उवाये । मांडिली आहाती॥११॥
जिहीं एकएकावीण । न कीजे तृणाचेंही निर्माण ॥
जिये दोघे जीवप्राण । जिया दोघा ॥१२॥
घरवाते मोटकीं दोघे । जैं गोसावी सेजे रिघे ॥
तैं दंपत्यपणें जागे । स्वामिणी जे ॥१३॥
जया दोघांमाजी एकादे । विपाये उमजले होय निदे॥
तरी घरवात गिळुनी नुसधे । कांहींना करी ॥१४॥
हीं आंगांचीं आटणी । गिवसित आहाती एकपणीं॥
भेदाचिया वाहणी । आधाधी जिये ॥१५॥

विषो एकमेकांची जिये । जिये एकमेकांची विषयीं इयें।
जिहीं दोघी सुखिये । जिये दोघे ॥१६ ॥
स्त्रीपुरुषनामभेदे । शिवपण एकलें नांदे ॥
जग सगळें अधाधें । पणें जिहीं ॥१७॥
दो दांडी एक श्रुति । दोहीं फुलीं एक दृति ॥
दोहीं दिवीं दीप्ति । एकीची जेवीं ॥१८॥
दो ओठीं एकी गोष्टी । दो डोळां एकी दृष्टी ॥
तेवीं दोघीं जिहीं सृष्टी । एकीचि जे ॥१९ ॥
दाऊनि दोनीपण । एकरसाचें आरोगण ॥
करीत आहे मेहूण । अनादि जे ॥२०॥
जे स्वामीचिया सत्ता । वीण असो नेणें प्रतिव्रता ॥
जियेविण सर्वकर्ता । कांहीं ना जो ॥२१॥
ते का भातारांचें दिसणें । भातारूचि जियेचें असणें ॥
नेणिजती दोघेजणें । निवडूं जिये ॥२२॥
गोडी आणि गुळु । कापूर आणि परिमळू ॥
निवडुं जातां पांगळु । निवाडु होय ॥२३॥
समग्र दीप्ती घेतां । जेवी दीपचि ये हाता ॥
तेवीं जियेचिया तत्वता । शिवूचि लाभे ॥२४॥
जैशी सूर्य मिरवे प्रभा । प्रभे सूर्यत्वचि गाभा ॥
तैशी भेद गिळित शोभा । एकचिजे ॥२५॥
कां बिंब प्रतिबिंबा द्योतक । प्रतिबिंब बिंबा अनुमापक।
तैसें द्वैतामिसें एक । बरवत असे ॥२६॥

सर्व शून्याचा निष्कर्षु । जिया वाइला केला पुरुषु ॥
जेणें दादुलन सत्ता विशेषु । शक्ति जाली ॥२७॥
जिये प्राणेश्वरीवीण । शीवींहि शीवपण ॥
थारो न शके ते आपण । शीवे घडली ॥२८॥
ऐश्वर्येंशी ईश्वरा । जियेचे अंग संसारा ॥
आपण होउनी उभारा । आपणचि जे ॥२९ ॥
पतीचेनि अरूपपणें । लाजोनि अंगाचें मिरवणें ॥
केलें जगायेवढे लेणें । नामरूपाचें ॥३०॥
ऐक्याचाही दुकाळा । बहुपणाचा सोहळा ॥
जिये सदैवेचिया लीळा । दाखविला ॥३१॥
आंगाचिया आटणिया । कांतुउवाया आणिला जिया॥
स्वसंकोचें प्रिया । रुढविली जेणें ॥३२॥
जियेतें पहावयाचिया लोभा ।घढे दृष्टत्वाचिया क्षोभा॥
जयेतें न देखतुचि उभा । आंगचि सांडी ॥३३॥
कांतेचिया भिडा । अथला होये जगायेवढा ॥
अंगाविला उघडा । जियेवीण ॥३४॥
जो हा ठाव मंदरूपें।उवाइलेपणें हारपे ।
तो जाला जियेचेनि पडपे।विश्वरूप ॥३५॥
जिया चेवविला शीवु।वेद्याचे वोणे बहु ॥
वाढीतेणेशी जेउ।घाला जो ॥३६॥
निदेलेनि भातारें।जे विये चराचरें ॥
[illegible]येचा विसांवला नुरे।आंबुलेपणही ॥३७॥

जंव कांत लपो बैसे । तंव नेणिजे जियोद्देशे ॥
जिये दोघे आरिसे । जिया दोघां ॥३८॥
जियेचेनि अंगलगें । आनंद आपणा आरोगूं लागे ॥
सर्वभोक्तृत्वही नेघे । जियेवीण कांहीं ॥३९॥
जया प्रियेचें जें अंग । जो प्रियु जियेचें चांग ॥
कालवूनि दोन्ही भाग । जेवित आहाति ॥४०॥
जैशी कां समीरेसकट गाति । कां सोनियासकट कांती॥
तैशी शीवेंसि शक्ति । अवघीच जे ॥४१॥
कां कस्तूरीसकट परिमळु । कां उष्मेसकट अनळु ॥
तैसा शक्तीशी केवळु । श्रीशीवूचि जो ॥४२॥
राती आणि दीवो । पातली सूर्याचा ठावो ॥
तैसे आपुलिया साची वावो । दोघे जिये ॥४३॥
किंबहुना तिये । प्रणवाक्षरी विरूढतिये ॥
दशेचीही वैरीये । शीवशक्ति ॥४४॥
हे असो नामरूपाचा भेदशिरा।गिळित एकार्थाचा उजिरा
नमो तया शिववोहरा । ज्ञानदेवो म्हणें ॥४५॥
जयाच्या रूपानिर्धारी । गेली परेसी वैखरी ॥
सिंधूशीं प्रलयनीरीं । गंगा जैसी ॥४६॥
जया दोघांच्या आलिंगनीं । विरोनी गेलीं दोनी ॥
वधीयाचि रजनी । दिठीच जे ॥४७॥
वायू चळबळेशी । जिराला व्योमोचिये कुशी ॥
अटला प्रळयप्रकाशी । सप्रभभानु ॥४८॥

तेवीं निहाळिता ययातें । गेले पाहणेनशी पाहतें ।।
पुढती घरौतें वरौतें । वंदिली तिये ।।४९।।
जयाच्या वाहणी । वेदकु वेद्यांचें पाणी ।।
न पिये पण सांडणी । आंगाचीही करी ।।५०।।
तेथ मी नमस्कारा । लागी हो दुसरा ।।
तरी लिंगभेद पऱ्हा । जोडू जावो ।।५१।।
परी सोनेनसी दुजे । नव्हतु लेणे सोना भजे ।।
हें नमन करणें माझें । तेसें आहे ।।५२।।
सांगता वाचेतें वाचा । ठावो वाच्य वाचकाचा ।।
पडता काय भेदाचा । विटाळु होये ।।५३।।
सिंधु आणि गंगेची मिळणी । स्त्रीपुरुष नामाची मिरवणी
दिसतसे तरी काय पाणी । द्वैत होईल ।।५४।।
पाहेपा भास्य भासकता । आपुला ठांई दाविता ।।
एकपण काय सविता । मोडीतसे ।।५५।।
चांदाचिया दोंदावरी । होता चांदणियाची विखुरी ।।
काय उणे दीप्तीवरी । गिवसोपा दीपु ।।५६।।
मोतियाची कीळ । होय मोतियावरी पांगुळ ।।
अगळे निर्मळ । रूपा ये कीं ।।५७।।
मात्राचिया त्रिपुटिया । प्रणवू काय केला चिरटिया ।।
कीं णकार ती रेघटीया । भेदवला काई ।।५८।।
सहो ऐक्याचें मुद्दल न ढळे । आणि साजिरेपणाचा लाभ
हे।। तरी स्वतरंगाची मुकुळें । तुरंबु कां पाणी ।।५९।।

म्हणोनि भूतेशुभवानी । वंदिलीं न करोनी सिनानीं ॥
मी निघालों नमनीं । तें हे ऐसें ॥६०॥
दर्पणाचेनि त्यागें । प्रतिबिंब बिंबीं रिगे ॥
कां बुडी दीजे तरंगे । वायूचा ठेला ॥६१॥
नातरी नीद जातखेवो । पावे आपुला ठावो ॥
तैशी बुद्धित्यागें देवीदेवो । वंदिली मिया ॥६२॥
सांडूनि मीठपणाचा लोभु । मिठें सिंधुत्वाचा घेतला लाभु
तेवी अहं देउनि मी शंभु शांभवी जालों ॥६३॥
शिवशक्ति समावेशें । नमन केलें म्या ऐसें ॥
रंभागर्भ आकाशें । रिघाला जैसा ॥६४॥

इति श्रीसिद्धानुवादे श्रीमदनुभवामृते शिवशक्ति-
समावेशनमनंनाम प्रथमं प्रकर्ण संपूर्ण ।

---

# प्रकरण दुसरें.

आतां उपायवनवसंतु । जो आज्ञेचा आहेवतंतु ।
अमूर्तचि परी मूर्तु । कारुण्याचा ॥१॥
मोडोनी मायाकुंजरू । मुक्तमोतियांचा वोगरु ॥
जेवविता सद्गुरु । निवृत्ति वंदु ॥२॥

अविद्येचि आडवे । भुंजीत जीवपणाचे भवे ॥
तया चैतन्याचे धांवे । कारुण्ये जो कीं ॥३॥
जयाचेनि अपांगपाते बद्ध मोक्षपणीं आते ॥
भेटे जाणतया जाणते । जयापाशीं ॥४॥
कैवल्यकनकाचिया दाना।जो न कडसी थोरसाना॥
द्रष्टयाचिया दर्शना । पाढाउ जो ॥५॥
सामर्थ्याचेनि बिके । जो शिवाचेंही गुरुत्व जिंके॥
आत्मा आत्मसुख देखे । आरसा जिये ॥६॥
बोधचंद्राचिया कळा । विखुरल्या एकवळा ॥
कृपापुनीव लीळा । करी जयाची ॥७॥
जो भेटलियाचि सवे । पुरति उपायाचे धांवे ॥
प्रवृत्तिगंगा स्थिरावे । सागरीं जिये ॥८॥
जयाचेनि अनवसरे । द्रष्टा ले दृश्याचे मोहिरे ॥
जो भेटतखेव सरे । बहुरुपाचि हे ॥९॥
अविद्येचे काळवखे । कीं स्वबोधसुदिनीं फांके॥
सीतले प्रसादार्के । जयाचेनि ॥१०॥
जयाचेनि कृपासलिलें।जीवू हा ठाववरी पाखाळे॥
जें शीवपणही बोविळे । अंगी न लवी ॥११॥
राखो जाता शिष्याते । गुरुपणही धाडिले थिते ॥
तरी गुरुगौरव जयाते । सांडिचिना ॥१२॥
एकपण नव्हे सुसास।म्हणूनि गुरुशिष्याचे करुनि मिस
है॰ ऱ्णेचि आपली वास । पाहतचि असे ॥१३॥

जयाचेनि कृपातुषारे। परतले अविद्येचे मोहिरे ॥
परिणमे अपारे। बोधामृते ॥१४॥
वेद्या देतां मिठी। वेदकूही सुये पोटी ॥
तऱ्ही नव्हेचि उशिटी। दिठी जयाची ॥१५॥
जयाचेनि सावाये। जीवू ब्रम्हउपर लाहे ॥
ब्रम्ह तृणातळी जाये। उदासे जेणे ॥१६॥
उपास्तिवरीराबतिया। उपायफळी येती मोडूनिया ॥
वरिवंडिले जयाचिया। अनुज्ञा का ॥१७॥
जयाचा दिठिवा वसंतु। जंव न रिघे निगमवनाआंतु
तंव आपुलिये फळीं हातु। न घेपती ही ॥१८॥
पुढें दृष्टीचेनि अलगे। खोची की निवटे मागें ॥
येवढे या जैता निघे। आपणपे जो ॥१९॥
लघुत्वाचोनि मुद्ले। बैसला गुरुत्वाचे सेले॥
नासूनि नाथिले। सदैव जो ॥२०॥
नाहीं ते जळी बुडिजे। तै घनवटे जेणे तरिजे ॥
जेणें तरिलियाहि नुरिजे। कवणी ठायी ॥२१॥
आकाश हें सावेव। न बंधे आकाशाची हाव ॥
ऐसे कोणीएक भरीव। आकाश जो ॥२२॥
चंद्रादि सुशीतळे। घडली जयाचेनि मेळे ॥
सूर्य जयाचेनि उजाळे। कडवसेनी ॥२३॥
जीवपणाचोनि त्रासे। यात्रया आपुलिये दशे ॥
शिवही मुहूर्त पुसे। जया जोशियातें ॥२४॥

चांदिणे स्वप्रकाशाचे । लेइला द्वैतदुणीचें ॥
तऱ्हीं उघडेपण नवचे । चांदाचें जया ॥२५॥
जो उवड कीं न दिसे । प्रकाश कीं न प्रकाशे ॥
असतेपणेचि नसे । कव्हणीकडे ॥२६॥
आतां जो तो इहीं शद्बीं।के मिळवू अनुमानाची मांदी॥
हा प्रमाणाही वो नेदी । कोणाही मा ॥२७॥
जेथें शद्बाची लिही पुसे । तेणशीं चावळो बैसे ॥
दुजयाच्या रागी रुसे ॥ एकपणा जो ॥२८॥
प्रमाणाची परी सरे । तै प्रमेयेची आविष्करे ॥
नवल मेचु ये धुरे । नाहींपणाची ॥२९॥
कांहींवाही आळुमाळु । देखे येखादे वेळू ॥
तरी देखे तेही विटाळू । जया गांवीं ॥३०॥
तेथें नमने का बोले । केउती सुये पाउले ॥
आंगी लावूनि नाडिले । नावचि येणें ॥३१॥
नव्हे आत्मया आत्मप्रवृत्ति । वाढवितां के निवृत्ति॥
या नामाची वाय बुंथी । सांडीचिना ॥३२॥
निवर्त्य तंव नाहीं । मा निवर्तवी हा कांई ॥
तरी कैसा बैसे ठाई । निवृत्तिनामाच्या ॥३३॥
परी सूर्यासी अंधकारु । कै जाहला होता गोचरु॥
तरी वमारी हा डगरु आलाचि कीं ॥३४॥
तैसें लटिके येणें रूढे । जड येणें उजिवडे ॥
[illegible]ढे तेही घडे । याचिया मावा ॥३५॥

हां गा मायावशे दाविशी। ते माइक म्हणूनी वाळिशी
अमाइक तव नव्हशी । कवणाही विषयो ॥३६॥
शिव शिवा सद्‌गुरु । तुजला गूढा काय करुं ॥
एकाही निर्धारा धरु । देतासी कां ॥३७॥
नामे रुपें बहुवसे । उभारुनि पाडिली वोसे ॥
सत्तेचेनि अवेशें । तोपलासी ना ॥३८॥
जीवू घेतलिया उणें । चालो नेदिसी साजणें ॥
मृत्यु उरे स्वामीपणें । तेही नव्हे ॥३९॥
विशेषाचोनि नांवें । आत्मत्वही न साहवे ॥
किंबहुना नव्हे । कोण्हीच यया ॥४०॥
राती नुरेचि सूर्या । ना तरी लवण पाणिया ॥
नुरे जेवि चेइलिया । नीद जैशी ॥४१॥
कापुराचे थळीव । नुरेचि आगीची बरव ॥
नुरेचि रूप नांव । तैसे यया ॥४२॥
याच्या हाता पाया पडे । तव वंद्यत्वें पुढे न मंडे ॥
न पडेचि हा भिडे । भेदाचिये ॥४३॥
आपणाप्रति रवि । उदो न करी जेवी ॥
हा वंद्य नव्हे तेवी । वंदनासी ॥४४॥
कां समोरपण आपुलें । न लाहिजे कांहीं केलें ॥
तैसे वंद्यत्व घातलें । हिरोनी येणें ॥४५॥
आकाशाचा अरिसा । नुठी प्रतिबिंबाचा ठसा ॥
हा वंद्य नव्हे तैसा नमस्कारासि ॥४६॥

परी नव्हे तरीं न हो । हे वेखासी कां घेओ ॥
परी वंदीलयाही ठावो । उरो नेदी ॥४७॥
आंगौनि एकुणा झोलु । फेडिताचि तरि तो बाहिरिलु
कडु फिटे आतुलु । न फेडीतांचि ॥४८॥
नाना बिंबपणासरिसे । घेऊनि प्रतिबिंबनासे ॥
नेलें वंद्यत्व येणें तैसे । वंदितेनसी ॥४९॥
नाहीं रूपाची जेथें सोये । तेथें दृष्टीचें कांहींच नव्हे ॥
आम्हा फळले हे पाये । ऐशिया दशा ॥५०॥
गुणातेलाचिया सोइरिका । निर्वाहिली दीपकळिका ॥
ते कां होईल पुळिका । कापुराचिया ॥५१॥
तया दोहो परस्परे । होय ना जव मेल्हेरे ॥
तंव दोहींचेहीं सरे । सरिसेंचि ॥५२॥
तोवि देखेना मी ययाते । तंव गेले वंद्य वंदिते ॥
चेइलिया कांते । स्वप्नींचि जेवी ॥५३॥
किंबहुना इया भाषा । द्वैताचा जेथें उपखा ॥
फेडुनियां स्वसखा । श्रीगुरु वंदिला ॥५४॥
याच्या सख्याची नवाई । आंगीं एकपणा रुप नाहीं
आणि गुरुशिष्य दुवाळीही । पवाडु केला ॥५५॥
कैसा आपणा आपण । दोंवीण सोयरेपण ॥
हा याहूनि विलक्षण । नाहीं ना नोहे ॥५६॥
जंग अवघें पोटीं माये । गगनायेवढें होऊनि ठाये ॥
कीं तेचि निसी साहे । नाहींपणाची ॥५७॥

कां पूर्णते तरी आधारू । सिंधू जैसा दुर्भरू ॥
तैसा विरुद्धा पाहुणेरू । याच्या घरीं ॥५८॥
तेजा तमातें कांहीं । परस्परे निके नाहीं ॥
परी सूर्याच्या ठाईं । सूर्यचि असे ॥५९॥
एक म्हणता भेदें । ते कीं नानात्वें नांदे ॥
विरुद्धे आपणया विरुद्धे । होतील काई ॥६०॥
म्हणोनि शिष्य आणि गुरुनाथु।या दोही शब्दाचा अर्थु
श्रीगुरुचि परि होतु । दोहीं ठाईं ॥६१॥
कां सुवर्ण आणि लेणें । वसतें एके सुवर्णें ॥
वसते चंद्र चांदिणे । चंद्रीचि जेवी ॥६२॥
नाना कापूर आणि परिमळु । कापूरचि केवळु ॥
गोडी आणि गूळु । गूळचि जेवि ॥६३॥
तैसा गुरु शिष्य मिसे । हाचि एकु उल्हासे ॥
जरी कांहीं दिसे । दोनीपणें ॥६४॥
आरसा आणि मुखी । मी दिसे हे उखी ॥
हे आपुलिये ओळखी । जाणे मुख ॥६५॥
पहा पा निरंजनी निदेला । तो निर्विवाद एकला ॥
परी चेता चेववीता जाला । दोनी तोचि ॥६६॥
जे तोचि चेता तोचि चेववी।तेवी हाचि वुझे हा वुझावी
गुरुशिष्यत्व नांदवी । ऐसेन हा ॥६७॥
दर्पणेवीण डोळा । आपुले भेटीचा सोहळा ॥
भोगिता तरी लीळा । सांगतो हे ॥६८॥

एवं द्वैतासी उमसो । नेदी ऐक्याशी विसकुसो ॥
सोइरिकीचा अतिसो । पोखीतसे ॥६९॥
निवृत्ति जया नांव । निवृत्ति जया बरव ॥
जया निवृत्तिची राणीव । निवृत्तीची ॥७०॥
वांचोनि प्रवृत्तिविरोधें । कां निवृत्तीचेनि बोधे ॥
आणिजे तैसा वादे । निवृत्ति नव्हे ॥७१॥
आपणा देऊनि राती । दिवसा आणि उन्नति ॥
प्रवृत्ति वारी निवृत्ति । नव्हे तैसा ॥७२॥
ओपसरयाचें बळ । घेऊनि मिरवे कीळ ॥
तैसें रत्न नव्हे निखिळ । चक्रवर्ती हा ॥७३॥
गगनही सूनी पोटीं । जें चंद्राची पघळे पुष्टी ॥
तें चांदिणें तेणेंसी उठी । आंग जयाचे ॥७४॥
तैसे निवृत्तिपणासी कारण । हाचि आपणया आपण
घेयावया फूलचि झाले घ्राण । आपुली दृति ॥७५॥
दिठी मुखाचिये बरवे । पाठीकडूनि जैं पावे ॥
तैं आरसे धांडोळावे । लागती काई ॥७६॥
कीं राती हन गेलिया । दिवस हन पातलिया ॥
काय सूर्यपण सूर्या । होआवे लागे ॥७७॥
म्हणोनी बोध्य बोधोनी । घेपे प्रमाणें साधूनि ॥
ऐसा नव्हे भरवसेनी । गोसावी हा ॥७८॥
ऐसे करणयावीण । स्वयंभचि जे निवृत्तिपण ॥
तयाचे श्रीचरण । वंदिले ऐसे ॥७९॥

आतां ज्ञानदेवो म्हणे । श्रीगुरुप्रणामे येणें ॥
फेडिली वाचाऋणें । चौही वाचांची ॥८०॥

इति श्रीसिद्धानुवादे श्रीमदनुभवामृते श्रीगुरुस्तव-नकथनंनाम द्वितीयप्रकर्ण संपूर्ण.

---

## प्रकरण तिसरें.

ययाचोनि बोभाटे । आत्मयाची झोप लोटे ॥
पूर्ण तऱ्ही ऋण न फिटे । जे चेणेंचि नीदकीं ॥१॥
येऱ्हवी परादिका चौघी । जीव मोक्षाच्या उपेगी ॥
अविद्येसवे आंगीं । वेंचती कीर ॥२॥
देहासवे हात पाये । जाती मनासवे इंद्रियें॥
कां सूर्यासवे जाये । किरणजाळ ॥३॥
नातरी निद्रेचिये अवधी । स्वप्नें मरती आधीं ॥
तेवि अविद्येचे संबंधीं । अटती इया ॥४॥
मृतें लोहे होती । ते रसरूपें जिती ॥
जळोनि इंधनें येती । वन्हीदशे ॥५॥
लवण आंगे विरे । परि स्वादें जळीं उरे ॥
नीद मरोनि जागरें । जीइये नीदें ॥६॥
तेवि अविद्येसवे । चौघी वेचिती जीवे ॥
तत्वज्ञानाचोनि नांवें । उटतीच इया ॥७॥

हा तत्वज्ञानदिवा । मरोनी इही लावावा ॥
तरी हाही शीणलेवा । बोधरूपेंचि ॥८॥
येऊनि स्वप्न मेळवी । गेलिया आपणपां दावी ॥
दोन्ही दिठी नांदवी । नीद जैशी ॥९॥
जिति अविद्या ऐशी । अन्यथा बोधाते गिवशी ॥
तेचि यथाबोधेशी । निमाली उठी ॥१०॥
परी जिती ना मेली । अविद्या हे जाकळी ॥
बंधमोक्षी घाली । बांधोनियां ॥११॥
मोक्षचि बंधु होये । तरी मोक्ष शद्ब कां साहे ॥
अज्ञाना घरी त्राये । वाउगी यांची ॥१२॥
बागुलाचेंनि मरणें । तोषावें कीं बालपणें ॥
येरा तो नाहीं मा कोणे । मृत्यु मानावा ॥१३॥
घटाचे नाहींपण । फुटलेयाची नागवण ॥
मानितसे ते जाण । म्हणो ये कीं ॥१४॥
म्हणोनी बंधचि तंव वावो । मा मोक्षा के प्रसवो ॥
परी मरोनी केला ठावो । अविद्या तया ॥१५॥
आणि ज्ञान बंधु ऐसें । शिवसूत्राचेनि मिसे ॥
म्हणितले असे । सदाशिवे ॥१६॥
आणि वैकुंठीचेनिही सुजाणें । ज्ञानपाशीं सत्वगुणें ॥
बांधिजे हे निरोपण । बहु केलें ॥१७॥
परी शीवें कां श्रीवल्लभे । बोलिले येणेंचि लोभें ॥
मानू ते हे लाभे । न बोलतांही ॥१८॥

जें आत्मज्ञान निखिळ । तेंही घे ज्ञानाचें बळ ॥
तैं सूय चिंती सबळ । तैसें नोहे ॥१९॥
ज्ञाने श्लाघतू आहे । तैं ज्ञानपण धाडिले वाये ॥
दीप वांचोनिं दिवा लाहेतैं आंग भूललाचि कीं॥२०॥
आपणपे आपणापाशी । नेणतां देशोदेशी ॥
आपणापे गिवसी । हें कीरू होये ॥२१॥
परि वहुतां कां दिया । आपणापे आठवलिया ॥
म्हणे मी यया । कैसा रिझों ॥२२॥
तैसा ज्ञानरूप आत्मा । ज्ञानेंचि आपुली प्रमा ॥
करितसे सोहमा । ऐसा बंधु ॥२३॥
जें ज्ञान स्वयें वुडे । म्हणोनी भारी नावडे॥
ज्ञानें मोक्षु घडे । ते निमालेंनि ॥२४॥
म्हणोनी परादिका वाचा । तो शृंगारु चौ आंगाचा॥
एवं अविद्याजीवाचा । जीवत्वत्यागी ॥२५॥
आंगाचेनि इंधनें उदासु । उठोनि ज्ञानाग्नी प्रवेशु ॥
करी तेथें भस्मलेशू । बोधाचा उरे ॥२६॥
आंगीं लावलिया विभूति । ते परीमाणूही झडती ॥
परी पांडुरत्वें कांती । राहे जैशी ॥२७॥
जळीं जळा वेगळु । कापूर न दिसे अवडळु॥
परी होऊनि परिमळु । उरे जेवी ॥२८॥
ना वोहळलाआंगीं जैसे । पाणी पाणीपण नसे ॥
तऱ्ही वोल्हासाचेनि मिसें । आथीच ते ॥२९॥

तातरी माध्यान्हाकाळीं । छांया न दिसे वेगळी ॥
असे पायातळीं । रिगोनिया ॥३०॥
तैसें ग्रासूनि दुसरे । स्वरूपीं स्वरूपाकारे ॥
आपुलेपणे उरे । बोध जो का ॥३१॥
तें ऋणशेष वाचा इया । न फेडवे मरोनिया ॥
तें पाया पडोनि मियां । सोडविले ॥३२॥
म्हणोनि परा पश्यंति । मध्यमा हन भारती ॥
या निस्तरिलिया लागती । ज्ञानी अज्ञानीची॥३३॥

इति श्रीसिद्धानुवादे श्रीमदनुभवामृते वाचाऋणमोचनं नाम तृतीयप्रकर्णं संपूर्ण ॥ शुभं भवतु ॥

---

# प्रकरण चवथें.

--◇--

आतां अज्ञानाचेनि मारें । ज्ञान अभेदं वावरे ॥
नीद साधूनि जागरें । नांदिजे जेवि ॥१॥
कां दर्पणाचा निघाला । ऐक्यबोधू पहिला॥
मुख भोगी आपुला । आपणांचि ॥२॥
ज्ञान जियातिया परी । जगीं आत्म्यैक्य करी ॥
तें सुरिया खोचे सुरी । तैसें जाहलें ॥३॥

लावी आत ठाउनि कोपटातो साक्षी आपणया सकट
कां बांधलेया चोरट । मोटेमाजी ॥४॥
आगी पोतासाचेनि मिसे । आपणपे जाळिले जैसे ॥
ज्ञानाज्ञाननाशे । तैसें जाहलें ॥५॥
अज्ञानाचा टेका । नसतांही ज्ञान अधिका ॥
फाके जव उफका । आपुला पडे ॥६॥
वात दशाही ते निमालियां । येणें जे ये उवाया ॥
ते केवळ नाशावया । दीपाचे परी ॥७॥
उठणें कीं पडणें । कुचभाराचे कोण जाणे ॥
कां फाकणें कीं सुकणें । जाउळाचे ॥८॥
तरंगाचे रुपा येणें । तयाचि नांव निमणें ॥
कां विजेचे उदैजणें । तोचि अस्तु ॥९॥
तैसें पिऊनि अज्ञान । तंवतरी वाढे ज्ञान ॥
जंव आपुले निधन । निःशेष साधे ॥१०॥
जैसें कल्पांतीचे भरिते । स्थळां जळां दोहीते ॥
बुडविल्या अरौते । राहोचि नेणें ॥११॥
कीं विश्वाही वेगळ । वाढे जैं सूर्यमंडळ॥
तैं तेजतम निखिळ । तेंचि होये ॥१२॥
नाना नीद मारोनी । आपणपें हिरोनी ॥
जागणे ठाके होउनी । जागणेंचि ॥१३॥
तैसें अज्ञान अटोनिया । ज्ञान येते उवाया ॥
ज्ञानाज्ञान गिळोनिया । ज्ञानचि होये ॥१४॥

ते वेळीं पुनिवा भरे । ना आवसा सरे ॥
तें चंद्रचि उरे । सतरावी जैशी ॥१५॥
कां तेजांतरे नाटोपे । कोणे तमे न शिंपे ॥
ते उपमेचे ज्ञाउपे । सूर्यचि होय ॥१६॥
म्हणोनी ज्ञानें उजळे । कां अज्ञाने रुळे ॥
तैसें नव्हे निर्वाळे । ज्ञानमात्र जे ॥१७॥
परि ज्ञानमात्रे निखळे । तेंचि कीं तयां कळे ॥
काइ देखिजे बुबुळें । बुबुळा जेवीं ॥१८॥
आकाश आपणपया रिघे । काइ आगी आपणया लागे ॥
आपुला माथा वळघे । आपण कोण्ही ॥१९॥
दिठी आपणया देखे । स्वाद आपणया चाखे ॥
नादु आपुलें आइके । नादपण ॥२०॥
सूर्य सूर्यासी विवळे । कां फळ आपणया फळे ॥
परिमळु परिमळे । घेपत असे ॥२१॥
तैसें आपणया आपण । जाणते नव्हे जाण ॥
म्हणोनी ज्ञानपणेंवीण । ज्ञानमात्र जे ॥२२॥
आणि ज्ञान ऐशी सोये । ज्ञानपणेचि जरी साहे ॥
तरी अज्ञान हें नोहे । ज्ञानपणेंचि ॥२३॥
जैसें तेज जें आहे । तें अंधारें कीर नव्हे ॥
मा तेज तरी होये । तेजासी काइ ॥२४॥
तैसें असणें आणि नसणें । हें नाहीं जया होणें ॥
आतां मिथ्या ऐसे येणें । बोले गमे ॥२५॥

तरी कांहीं नाहीं सर्वथा । ऐशी जरी व्यवस्था ॥
तरी नाहीं हे प्रथा । कवणासी पा ॥२६॥
शून्यसिद्धांतबोधु । कोणी सत्ता होय सिध्दू ॥
नसता हा अपवादु । वस्तूसी जो ॥२७॥
माल्हविला दिवे । माल्हविते जरी मालवे ॥
तरी दीपु नाहीं हे फावे । कवणासी पा ॥२८॥
कीं निदेचेनि आलेषणें । निदेले ते जाय प्राणे ॥
तरी नीद भली हे कोणे । कोणासी पा ॥२९॥
घटु घटुपणें भासे । तद्भंगें भंगु आभासे ॥
सर्वथा नाहीं तें नसे । कोण्हे ह्मणावें ॥३०॥
ह्मणोनी कांहींनाहीं पण । देखता नाहीं आपण ॥
नोहोनी असणेंनवीण । असणें जे ॥३१॥
परि आणिका कां आपणया । न पुरे विखो होआवया॥
म्हणोनी न असावया कारण कीं ॥३२॥
जो निरंजनीं निदेला । तो आणिकीं नाहीं देखिला॥
आपुलाही निमाला । आठवूं तया ॥३३॥
परी जीवें नाहीं नोहे । तैसें शुद्ध असणें आहे ॥
हें बोलणें न साहे । असेनाहींचे ॥३४॥
दिठी आपणया मुरडे । तैं दिठीपणही मोडे ॥
परी नाहीं नोहे हें फुडे । जाणेंचि ते ॥३५॥
कां काळा राहे काळवखा । तो आपणा ना आणिकां॥
न चोजवे तऱ्ही आसिका । हा मी बाणे ॥३६॥

तैसें असण कां नसणें । हें कांहींच मानूसवाणें ॥
नसोनि असणें । ठायें ठावो ॥३७॥
निर्मळपणीं आपुला । आकाशाचा संचु विराला ॥
तो स्वयें असे पुढिला । कांहीं ना की ॥३८॥
कां आंगीं कीं निर्मळपणीं । हारतलिया पोखरणीं ॥
हें आणिका वांचूनि पाणी । सगळेंच आहे ॥३९॥
आपणया भागू तैसें । असणेंचि जें असे ॥
असेनाहीं ऐसें । सांडूनियां ॥४०॥
निदेचें नाहींपण । निमालियाही जागेपण ॥
असिजे कां नेण । कोणी होऊनि जैसें ॥४१॥
कां भूमि कुंभ ठेविजे । तै सकुंभता आपजे ॥
तो नेलिया म्हणिजे । तेणेंविणें ॥४२॥
परी दोन्ही हे भाग । न शिवती भूमीचें आंग ॥
ते वेळीं भूमि तैसें चांग । चोंख जें असणें ॥४३॥

इति श्रीसिद्धानुवादे श्रीमदनुभवामृते ज्ञानअभेद-
कथनं नाम चतुर्थप्रकरणं संपूर्ण ॥

---

# प्रकरण पांचवें.

सत्ता प्रकाश सुख । या तिहीं तिहींउणे लेख ॥
जैसें विषपणेंचि विख । विखा नाहीं ॥१॥

कांति काठिण्य कनक । तिन्ही मिळोनि कनक एक
द्राव गोडी पियूख । पियूखचि जेंवि ॥२॥
उजाळ द्रति मार्दव । या तिहीं तिहींउणीव ॥
हे देखिजे सावेव । कापुरीं येके ॥३॥
आंगे कीर उजाळ । कीं उजाळताचि मवाळ ॥
कीं दोन्ही ना परिमळ । मात्र जे ॥४॥
ऐसे ये कापूरपणीं । तिन्हीं इये तिहींउणी ॥
इयापरी आटणी । सत्तादिकांची ॥५॥
येऱ्हवी सच्चिदानंद भेदें । चालिली तिन्हा पदें ॥
परी तिन्हीं उणीं आनंदें । केली येणें ॥६॥
सत्ताचि कीं सुखप्रकाशु । प्रकाशूचि सत्ताउल्हासु ॥
हें न निवडे मिठांशु । अमृतीं जेवीं ॥७॥
शुक्लपक्षीच्या सोळा । दिवसा वाढती कळा ॥
परी चंद्र मात्र सगळा । चंद्रीं जेवी ॥८॥
थेंबी पडतां उदक । थेंबां धरु ये लेख ॥
परी पडिलाठायीं उदक । वांचूनि आहे ॥९॥
तैसें असताचिया व्यावृत्ति । सत म्हणूं आले श्रुति॥
जडाचिया समाप्ती । चिद्रूप ऐसें ॥१०॥
दुःखाचेनि सर्व नाशे । उरलें तें सुख ऐसे ॥
निगदिले निश्वासे । प्रभूचेनी ॥११॥
ऐशी सदादि प्रतियोगियें । असदादि तिन्ही ये॥
लोटिता जाली त्राये । सत्तादिकां ॥१२॥

एवं सच्चिदानंदु । आत्मा हा ऐसा शब्दु ॥
अनव्यावृत्तिसिध्दु । वाचक नव्हे ॥१३॥
सूर्याचेनि प्रकाशे । जें कांहीं जड आभासे ॥
तया तो गिवसे । सूर्य काई ॥१४॥
तेवि जेणें तेजें । वाचेसी वाच्य सुजे ॥
ते वाचा प्रकाशिजे । हें कें आहे ॥१५॥
विषो नाहीं कोणाही । जया प्रमेयत्वचि नाहीं ॥
तया स्वप्रकाशा काई । प्रमाण होये ॥१६॥
प्रमेय परिच्छेदें । प्रमाणत्व नांदे ॥
तीं काई स्वतःसिद्धे । वस्तुच्या ठायीं ॥१७॥
एवं वस्तूशीं जाणों जातां । जाणणेंचि वस्तु तत्वता ॥
मग जाणणें आणि जाणता । कैचा उरे ॥१८॥
म्हणोनी सच्चित्सुख । हे बोल वस्तुवाचक ॥
नव्हती हे शेष । विचाराचे ॥१९॥
ऐसेन इये प्रसिद्धे । चालली सच्चिदानंदपदें ॥
मग द्रष्टया स्वसंवादे । भेटती जेव्हां ॥२०॥
तेवेळीं वरषोनी मेघु । समुद्र होऊनि वोघु ॥
सरे दाऊनी मागू । राहे जैसा ॥२१॥
फळ विउनी फूल सुके । फळ नाशे रसपाकें ॥
तोही रस उपखे । तृप्तीदानीं ॥२२॥
कां आहूति अग्नीआंत । घालूनि वोसरे हात ॥
सुख चेवऊनि गीत । उगा राहे ॥२३॥

नाना मुखा मुख दाऊनि । आरिसा जाय निघौनी ॥
कां निदेले चेवउनी । चेविते जैसे ॥२४॥
तैसें सच्चिदानंदा चोखटा । दाऊनि द्रष्ट्या द्रष्टा ॥
तिन्हीं पदें लागती वाटा । मौनाचिया ॥२५॥
जें जें बोलिजे तें तें नव्हे । होय तें तंव न बोलवे ॥
साउलिवरी न मववे । मविते जैसें ॥२६॥
मग आपुलियाकडे । मवितया से पडे ॥
तै लाजलाजो आखुडे । मविती जैसी ॥२७॥
तैशी सत्ताचि स्वभावें । असत्ता तंव नव्हे ॥
मा सत्तात्व संभवे । सत्तेसी काई ॥२८॥
आणि अचिदाचेनि नाशें । आले जे चिन्मात्रदशे
आतां चिन्मात्रचि मा कैसे । चिन्मात्रीं ये ॥२९॥
नीद प्रबोधाच्या ठाईं । नसे तैसे जागणेंही ॥
तेवि चिन्मात्रचि मा काई । चिन्मात्री ये ॥३०॥
ऐसें यया सुखपणें । नाहीं कीरु दुःखहोणें ॥
मा सुख हें गणणें । सुखाशी काई ॥३१॥
म्हणोनी सदसदत्वें गेलें । चिदचिदत्वें मावळलें ॥
सुखासुख जालें । कांहीं ना कीं ॥३२॥
आतां द्वंद्वाचे लवंचक । सांडूनि दुणीचें कंचुक ॥
सुखमात्रचि येक । स्वये आथी ॥३३॥
वरी येकपणें गणिजे । तें गणतेनसी दुजे ॥
म्हणोनि हें न गणिजे । ऐसें एक ॥३४॥

सुखा आतोनी निघणें । ते सुखिये सुखी तेणें ॥
हें सुखमात्रचि मा कोणे । अनुभवावें ॥३५॥
जैं प्रकृति डंकु अनुकरे । तैं प्रकृति डंके अन्तरे ॥
मा डंकूचि तैं भरे । कोणकोणा ॥३६॥
तैसें आपुलेनि सुखपणें । जया नाहीं सुखावणें ॥
आणि नाहीं हेंही जेणें । नेणिजे सुखें ॥३७॥
आरिसा न पाहतां मुख । स्वयें सन्मुख ना विन्मुख
तेवीं नसोनी सुखासुख । सुखचि जें ॥३८॥
सर्वसिद्धांताच्या उजरिया । सांडूनिया निदसुरिया ॥
आपुलिया हाता चोरिया । आपणचि जे ॥३९॥
न लविता ऊंस । ते जैसेनि असे रस ॥
तेथिचा मिठांश । तोचि जाणे ॥४०॥
कां न सज्जीता विणा । तो नादु जो अबोलणा ॥
तया तेणेचि जाणा । होआवे लागे ॥४१॥
नाना पुष्पाचिया उदरा । न येतां पुष्पसारा ॥
आपणचि भवरा । होआवे पडे ॥४२॥
नाना न रांधिता रससोयें । ते गोडी कैशी पा अहे
हें पाहणें तैसें नोहे । आणिकाजोगी ॥४३॥
तैसें सुखपणा येवो । लाजे आपुले सुख पावो ॥
ते आणिकां चाखोसुवो । । येइल काई ॥४४॥
दिहाच्या दुपारी । चांदू जैसा अंवरीं ॥
ते असणे चांदावरी । जाणावें कीं ॥४५॥

रूप नाहीं तैं लावण्य । अंग नुठी तैं तारुण्य ॥
क्रिया न फुटे तैं पुण्य । कैसें असे ॥४६॥
जैं मनाचा अंकुर नुपजे । तेथलेन मकरध्वजे ॥
तोचि हन माजे । तरीच घडे ॥४७॥
कां वाद्यविशेपाची सृष्टी । जैं जन्म नेघे दृष्टी ॥
तैं नाद् ऐशी गोष्टी । नादाचि जोगी ॥४८॥
नाना काष्ठाचिया विटाळा । वोसरलियाही अनळा॥
लागणें केवळा । आंगासीचि ॥४९॥
द्र्पणाचेनि नेमें । विणाचि मुख प्रमे ॥
आणिती तेंचि वर्मे । वर्मती येणें॥५०॥
न पेरितां पिक जोडे । ते मुडाचि आहे रोकडे॥
ऐशिया सोई उघडे । बोलणे हें ॥५१॥
एवं विशेष सामान्य । दोहीं नातळे चैतन्य ॥
तें भोगिजे अनन्य । तेणेंसी सदां ॥५२॥
आतां यावरी जे बोलणें । तें येणेंचि बोले शहाणे ॥
जें मौनाचेही निपटणें । पिऊनि गेले ॥५३॥
एवं प्रमाणें अप्रमाण । पण केलें प्रमाण ॥
दृष्टांती वाइली आण । दिसावयाची ॥५४॥
आंगाचिया अनुपपत्ती । आटलिया उपपत्ती ॥
येथें उठली पांती । लक्षणांची ॥५५॥
उपाय मागिला पाये । घेऊनि जाले वाये ॥
प्रतीति सांडिली सोये । प्रत्ययाची ॥५६॥

येथें निर्धारेसी विचारू । निमोनि जाला साचारू ॥
स्वामीच्या संकटीं शुरू । सुभट्ट जैसा ॥५७॥
नाना नाश साधुनी आपुला । बोध बोधें लाजिन्नला
नुसधेपणें थोटावला । अनुभवू जेथ ॥५८॥
भिंगाचिया चडळा । पदराचा पुंज वेगळा ॥
करितां जैसा निफळा । आंगाचा होये ॥५९॥
कां गजबजिला उबा । पांघुरणें केळीचा गाभा ॥
सांडी तेव्हेळी उभा । कैचा कीजे ॥६०॥
तैसें अनुभाव्य अनुभाविक । इहीं दोहीं अनुभूतिक
ते गेलिया कैचे एक । एकासीचि ॥६१॥
अनुभवा हा ठावोवरी । आपुलीच अनवसरी ॥
तेथें अक्षराची हारी । वाइल काइ ॥६२॥
कां परेसी पडे मिठी । तेथें नादा सळु नुठी ॥
मा वावरीजेल वोठी । हें कें आहे ॥६३॥
चेइलिया पाठीं । चेवणयाच्या गोठी ॥
कीं धाला बैसे पाठीं । रंधनाच्या ॥६४॥
उदेलिया दिवसपति । तै कीं दिवे सेजे येती ॥
वांचूनि पिकला शेती। सुइजताती नांगर काइ॥६५॥
म्हणोनि बंधमोक्षाचें व्याज । नाहीं निमाले काज ॥
आतां निरुपण भोज । वोळगे जरी ॥६६॥
आणि पुढिला कां आपणापे । वस्तु विसराचेनि हाते
हारपे ॥ मग शद्धेंचि घेपे । आठवूनिया ॥६७॥

येतुलियाही परौते । चांगावें नाहीं शद्बातें ॥
जरी स्मारकपणें कीर्तीतें । मिरवी हा जगीं ॥६८॥

इति श्रीसिद्धानुवादे श्रीमदनुभवामृते सच्चिदानंद-
पदत्रयविवरणं नाम पंचमप्रकरणंसंपूर्ण

---

# प्रकरण सहावें.

वाप उपेगी वस्तु शब्दु । स्मरणदानीं प्रसिध्दु ॥
अमूर्ताचा विशदु । अरिसा नव्हे ॥१॥
पाहते अरिसा पाहे । येथें कांहींचि नवल नव्हे ॥
परि दर्पणें येणें होये । नपाहते पाहते ॥२॥
वडिला अव्यक्ताचिया वंशा । उद्योतकार सूर्य जैसा
येणें एके गुणें आकाशा । अंबरत्व ॥३॥
आपण तंव खपुष्प । परी फळ दे जगद्रूप ॥
शद्ब मवि तैं अमुप । कोण आहे ॥४॥
विधिनिषेधाचियां वाटा । दाविता हाचि दिवटा ॥
वंधमोक्ष कळिकटा । शिष्ट हाचि ॥५॥
हाचि अविद्येच्या आंगी पडे । तै नाथिले ऐसें रूढे ॥
न लाहिजे तीन कवडे । साचा वस्तु ॥६॥

शुद्धा शिवाच्या शरीरीं । कुमारु हा जीउ भरी ॥
जेवि आंगे पंचाक्षरी । तेविचिं वोलु ॥७॥
जीव देहें बांधिला । तो बोले एके सुटला ॥
आत्मा बोले भेटला । आपणपया ॥८॥
दिवसातें उगो गेला । तंव रात्रीचा द्रोहो आला ॥
म्हणोनी सूर्यो या बोला । उपमा नव्हेचि ॥९॥
जे प्रवृत्ति आणि निवृत्ति । विरुद्धा इया हातु धरिती ॥
मग शब्देंचि चालती । एकलेनि ॥१०॥
सहाय आत्मविद्येचे । करावया आपण वेचे ॥
गोमटे काय शब्दाचे । एकैक वानू ॥११॥
किंबहुना शब्दु । स्मरणदानीं प्रसिध्दु ॥
परी ययाही समंधू । नाहीं येथें ॥१२॥
आत्मया बोलाचे । कांहींच उपयोगा न वचे ॥
स्वसंवेद्या कोण्हाचे । ओझें आथी ॥१३॥
आठवे कां विसरे । विषो होऊनि अवतरे ॥
तरी वस्तूशी वस्तु दुसरे । असेना कीं ॥१४॥
आपण आपणयाते । आठवी विसरे केउते ॥
काय जिभ जिभेते । चाखे न चाखे ॥१५॥
जागणेया नीद नाहीं । मा जागणे घडे काई ॥
स्मरणास्मरण दोन्हीही । स्वरूपी तैशी ॥१६॥
सूर्यो रात्री पा नेणें । मा दीवो काय जाणे ॥
तेवी स्मरणास्मरणें । आपण वस्तु ॥१७॥

एवं स्मरणास्मरण नाहीं । तरी स्मारके काज काई ॥
म्हणोनी इये ठाई । बोलू न सरे ॥१८॥
आणिक एक शब्दें । काज कीरू भले सिद्धे ॥
परी धिवसा न बंधे । विचारू येथें ॥१९॥
कां जे बोले अविद्या नाशे । मग आत्मेन आत्मा भासे
म्हणतखेव पिसें । आलेंच कीं ॥२०॥
सूर्यो रात्री मारील । मा आपणया उदो करील॥
हे कुडे सरती बोल । साचाच्या गांवीं ॥२१॥
निदेले निद रुसे । ऐसें कीं नीद असे ॥
कीं चेइले चेऊ बैसे । ऐसें चेणें आहे ॥२२॥
म्हणोनी नाशा पुरती । अविद्या नाहीं निरुती ॥
नाहीं आत्मा आत्मस्थिति । रिगे ऐसा ॥२३॥
अविद्या तंव स्वरुपें । वांझेचे कीर जाउपे ॥
मा तर्कांचें खुरपे । खांडणें कोणा ॥२४॥
इंद्रधनुष्या सिते । कवण थनवई न घालिजेते ॥
ते दिसे तैसें होतें । साच जरी ॥२५॥
अगस्तीचिया कौतुका । पुरती जरी मृगतृष्णिका ॥
तरी मार देतो तर्का । अविद्येशीं ॥२६॥
साहे बोलाची वळघी । ऐशी अविद्या असे जगीं ॥
तरी जाळूनी कां आगीं । गंधर्वनगरे ॥२७॥
नातरी दीपाचिये सोये । अंधारें कीर न साहे ॥
तेथें कांहीं आहे । जावयाजोगें ॥२८॥

नातरी पाहावया दिवसु । वातीचा कीजे सोसु ॥
तेव्हडाही उद्वसु । उद्यमु पडे ॥२९॥
जेथें साउली न पडे । तेथें नाहीं जेणें पाडे ॥
मा पडे तेथें तेव्हडे । नाहींच कीं ॥३०॥
दिसतचि स्वप्न लटिके । हें जागरी होय ठाउकें ॥
तेंवि अविद्याकाळीं सतुके । अविद्या नाहीं ॥३१॥
बोडंवरीच्या लेणिया । घरभरी आतुडलिया ॥
नागवे नागविलिया । विशेषु काई ॥३२॥
मनोरथाचे परियळ । अरोगिजतु कां लक्षवेळ ॥
परी उपवासा वेगळ । आनु आथी ॥३३॥
मृगजळ जेथ नुमंडे । तेथ असे पां कोरडे ॥
मा उमंडे तेथ जोडे । वोल्हांसु काई ॥३४॥
हें दिसे तेसें असे । तरी चित्रींचेनि पाउसे ॥
वोल्हावतु कां माणुसें । आगरा तळीं ॥३५॥
कालवूनि अंधारें । लिहों येती अक्षरें ॥
तरी मशीचिये वोरबारे । कां शिणावें ॥३६॥
आकाश काय निळें । न देखतु हे डोळे ॥
तेवी अविद्येचे टवाळे । जाणोनी घेई ॥३७॥
अविद्या येणें नांवें । मी विद्यमानचि नव्हें ॥
हे अविद्याचि स्वभावें । सांगतसे ॥३८॥
आणि इये अनिर्वाच्यपण । ते दुजेही देवांगण ॥
आपुला अभावी आपण । साधितसे ॥३९॥

कांहींच जरी आहे । तरी निर्धारु कां न साहे ॥
वरी घटाभावी मोहे । अंकित दिसे ॥४०॥
अविद्या नाशी आरंभा । ऐशी नव्हे प्रमा ॥
सूर्या आंगीं तमा । जयापरी ॥४१॥
हे अविद्या तरी मायावी । परी मायावीपणाचि लपवी।
हे साचा आली अभावी । आपुलाहे ॥४२॥
बहुतापरी ऐशी । अविद्या नाहीं आपैशी ॥
आतां बोलू हात वसो । कवणावरी ॥४३॥
साउलि येते साबळे । हालया भोय आडळे ॥
कीं हालेन अंतराळे । थोटावे हातु ॥४४॥
कां मृगजळाच्या पानीं । गगनाच्या आलिंगनी ॥
नातरी चुंबनी । प्रतिबिंबाच्या ॥४५॥
उठावला वोथरे तवका । तो सुनाथा पडे असिका ॥
अविद्यानाशी तर्का । तैसें होये ॥४६॥
ऐशी अविद्या नासावी । हें वाहेल जो जीवी ॥
त्यानें साली काढावी । आकाशाची ॥४७॥
तेणें शेळी गळा दोहावी । गुडगाडोळा वास पहावी
वाळवूनि काचरी करावी । सांजवेळची ॥४८॥
जांभई वाटूनि रसु । तेणें काढावा बहुवसु ॥
कालवूनि अळसु । मोदळा पाजावा ॥४९॥
तो पाटा पाणी परतु । पडली साउली उलथु ॥
वारयाचे ताथू । वळू सुखे ॥५०॥

तो वागुरांते मारु । प्रतिबिंब खोळे भरु ॥
तळहातींचे विंचरु । केश सुखें ॥५१॥
घटाचे नाहींपण फोडूं । गगनाचीं फुलें तोडूं ॥
सशियाचे मोडूं । शिंग सुखें ॥५२॥
तो कापुराची मशी करु । रत्नदीपीं काजळ धरु ॥
वांझेचें लेंकरुं । परणू सुखें ॥५३॥
तो अवसेचिनि सुधाकरे । पोसू पाताळींचीं चकोरे ॥
मृगजळींचीं जळचरें । गाळू सुखें ॥५४॥
अहो हे किती बोलावें । अविद्या रचिली अभावें ॥
आतां काय नासावें । शब्दे येणें ॥५५॥
नाहीं तयाचेनि नासे । शब्द नये प्रमाणदशे ॥
आंधारीं अंधारा जैसे । नव्हे रूप ॥५६॥
अविद्येची नाहीं जाती । तेथें नाहीं म्हणतया युक्ति
जेंवी दुपारी कां वाती । अंगणीचिया ॥५७॥
न पेरितां शेती । जे कीं संवगणिया जाती ॥
तया लाजापरौती । जोडी आहे ॥५८॥
स्वप्नणियाच्या आंगा । जेणे केला वळघा ॥
तो नकरिताचि उगा । वरीं होता ॥५९॥
पाणियावरी वरखु । होतां कें असे विशेखू ।
अविद्यानाशीं उन्मेखू । फाकावा तैसा ॥६०॥
माप मापपण श्लाघे । जंव आकाश मऊं नरिघे ॥
तम पाहतां वाउगे । दीपाचे जन्म ॥६१॥

गगनाची रससोये । जीभ जैं अरोगु जाये ॥
मग रसना हे होये । आडनांव कीं ॥६२॥
नऱ्हतेंन वल्लभे । आहेवपण कां शोभे ॥
खाता केळीचे गाभे । न खाता गेले ॥६३॥
स्थूल सूक्ष्म कवणयेकू । पदार्थ न प्रकाशी अर्कू ॥
परी रात्रीविषयीं अप्रयोजिकु । जालाचि कीं ॥६४॥
दिठी पाहतां काय न फवे । परी निदेते तंव न
देखवे ॥ चेताते न संभवे । म्हणूनिया ॥६५॥
चकोराचिया उद्यमा । लटिकेपणाची सीमा ॥
जरी दिहाची चंद्रमा । गिंवसूं बैसे ॥६६॥
नुसधियाचि साच्या । मुका होय वाचरुकाचा ॥
अंतराळी पायाचा । पेंधा होये ॥६७॥
तैशी अविद्येसीं सन्मुखे । सिद्धचि प्रतिसेदके ॥
उठलीचि निरर्थके । जल्पें होती ॥६८॥
अवसे आला सुधाकरु । न करीचि काई अंधःकारु॥
अविद्यानाशी विचारु । तैसा होये ॥६९॥
नाना न निफजतेन अन्नें । जेवणें तेचि लंघनें ॥
निमालेन नयनें । पाहणाचि अंधू ॥७०॥
केसेन ही वस्तु नसे । तेथें जैं शब्दाचा अर्थ हो बैसे॥
तैं निरर्थकपणें नाशे । शब्दही थिता ॥७१॥
आतां अविद्याचि नाहीं । हें कीर म्हणो काई ॥
परी नाशितां कांहीं । नुरेचि शब्दाचें ॥७२॥

यालागीं अविद्येचिया मोहरा । उठलियाही विचारा
आंगाचाचि संसारा । होऊनि ठेला ॥७३॥
म्हणोनी अविद्येचेनि मरणें । प्रमाणा येईल बोलणें॥
हे अविद्याचि नाहींपणें । नेदी घडो ॥७४॥
आणि आत्मा हन आत्मया । दाऊनि बोलू महिमया
येईल हे साविया । विरुद्धचि॥७५॥
आपणया आपणपेंशी । लागले लग्न कवणे दिवशीं॥
कीं सूर्य आंग ग्रासी । ऐसे ग्रहण आहे ॥७६॥
गगन आपणया निघे । सिंधू आपणपा रिघे ॥
कीं तळहात काय वळंघे । आपणपया ॥७७॥
सूर्य सूर्यासी विवळे । फळ आपणया फळे ॥
कीं परिमळु परिमळें । घेपतसे ॥७८॥
चराचरा पांणीपाजणी । करूं येईल एके क्षणीं ॥
परी पाणीयासी पाणी । पाजो ये काइ ॥७९॥
साठीतिसा दिवसा । माजी एकादा होय ऐसा ॥
जे सूर्यासी सूर्य जैसा । डोळा दावी॥८०॥
कृतांत जरी कोपेल । तरी त्रैलोक्य हे जाळील ॥
वांचूनि आगी लावील । आगीसी काई ॥८१॥
आपणपे आपणया । दर्पणेंवीण धात्रया ॥
समोर होआवया । ठाकी आहे ॥८२॥
दिठी दिठीतें रिघो पाहे । रुचि रुचीतें चाखूं सूये॥
कींचेतया चेवऊं ये । हें नाहींच कीं ॥८३॥

चंदन चंदनपणा लावी । रंगु रंगपणा रावी ॥
मोतीपण मोती लेववी । ऐसे केंसे ॥८४॥
सोनेपण सोने कसी । दीपपण दीप प्रकाशी ॥
रसपण बुडी दे रसीं । तें के जोडे ॥८५॥
आपुले मुकुटीं समर्था । चंद्र बैसविला सर्वथा ॥
परी चंद्र चंद्राचिये माथा । वाउ ये काई ॥८६॥
तैसा आत्मराज तंव । ज्ञानमात्रचि भरीव ॥
आतां ज्ञानें ज्ञानासी खेव । कैसें दीजे ॥
आपुलेनिं जाणपणें । आपणयाते जाणो नेणे ॥
डोळ्या आपुले पाहणे । दुवाड जैसें ॥८८॥
आरसा आपुलिये । आंगीं आपणा पाहे ॥
तैं जाणणे जाणो लाहे । आपणयाते ॥८९॥
दिगंता पैलीकडेचे । धांवोनी सूर्या खोचे ॥
मा तिये कां तियेचें । आंग फुटे ॥९०॥
रसवृत्तीसी उगाणे । घेऊनि जिव्हाग्र शहाणे ॥
परी काई कीजे नेणे । आपणपे चाखो ॥९१॥
तरी जिभे काय आपुले । चाखणे हन ठेले ॥
तैसें नव्हे संचले । तेंचि ते कीं ॥९२॥
तैसा आत्मा सच्चिदानंदु । आपणया आपण सिध्दु॥
आतां काय दे शब्दु । तयाचे तया ॥९३॥
कोणाही प्रमाणाचेन हाते।वस्तु घे ना नेघे आपणयाते
जे स्वयें आईते । घेणे ना नघेणे ॥९४॥

म्हणोनी आत्मा आत्मलाभे । नांदवूनि शब्द शोभे॥
येईल ऐसा न लभे । उमसू घेवो ॥९५॥
एवं माध्यान्हीची दिवी ।तम धाडी ना दिवो दावी
तैशी उभयतां पदवी । शब्दा जाली ॥९६॥
आतां अविद्या नाहींपणे । नाहीं तये नासणें ॥
आत्मा सिध्दूचि मा कोणें । काय साधावे ॥९७॥
ऐसा उभय पक्षी । बोला न लाहोनी नखी ॥
हारपला प्रळयोदकी । वोघू जैसा ॥९८॥
आतां बोला भागू कांहीं । असणें जयाच्या ठायीं॥
अर्थता तरी नाहीं । निपटूनिया ॥९९॥
बागूल आला म्हणते । बोलणें जैसे रिते ॥
कां आकाश वाळंबते । तळहातीं ॥१००॥
तैसें निरर्थके जल्पे । होऊनिया सपडपे ॥
शोभती जैशी लेपे । रंगावरी ॥१०१॥
एवं शब्दैकजीवनें । । बापुडीं ज्ञानें अज्ञानें ॥
साचपणे वनें । चित्रीची जैशी ॥१०२॥
या शब्दाचा निमाला । महाप्रळयो हो सरला ॥
अभ्रासवें गेला । दुर्दिनु जैसा ॥१०३॥

इति श्रीसिद्धानुवादे श्रीमदनुभवामृते शब्दखंडनं
नाम षष्ठप्रकरणं संपूर्ण

# प्रकरण सातवें.

येऱ्हवीं तऱ्ही अज्ञाना । जै ज्ञानाची नसे क्षोभना॥
तैं तरी काना । खालींच दडे ॥१॥
आडस्थानि अंधारी । खद्योत दीप्ती सिरी ॥
तैसें लटिकेवरी । अनादी होये ॥२॥
जैशी स्वप्ना स्वप्नीं महिमा । तमीं मानू असे तमा॥
तेवी अज्ञानगरिमा । अज्ञानीची ॥३॥
कोल्हेरीचे असिवारु । न येती धारकी धरु ॥
नये लेणा शृंगारु । वोडंबरीचे ॥४॥
हे जाणगयाच्या घरीं । खोचिलेही आन न करी॥
काई चांदिणा उठे लहरी । मृगजळाची ॥५॥
आणि ज्ञान हें जें म्हणिजे । तें अज्ञानचि पा दुजे ॥
एक लपवूनि दाविंजे । एक नव्हे ॥६॥
असो आतां हा प्रस्तावो । आधीं अज्ञानाचा धांडोळा घेवों॥ मग तयाच्या साची लाहो।ज्ञानही लटिकें॥७॥
या अज्ञान ज्ञानातें । आंगेचि आहे जितें ॥
तरी जेथ असे तयातें । नेग कां न करी ॥८॥
अज्ञानें जेथें असावें । तेणें सर्व नेण होआवें ॥
ऐसी जाती स्वभावें । अज्ञानाची ॥९॥

तरी शास्त्रमत्त ऐसें । जे आत्माच अज्ञान असे ॥
आणि तेणें तो गिवसे । आश्रो जरी ॥१०॥
तरी नुठितां दुजे । जें अज्ञान असे बीजे ॥
तैं तेंचि आर्थी हे बुझे । कोण येथें ॥११॥
अज्ञान तंव आपणयाते । जडपणें नेणें निरुते ॥
आणि प्रमाण प्रमाणातें । होत आहे ॥१२॥
यालागीं जरी अज्ञान । करील आपुलें ज्ञान ॥
हे म्हणतखेव घेवर्षी मौन । विरोधचि ॥१३॥
आणि जाणती वस्तु येक । तें येणें अज्ञानें कीजे मूर्ख॥
तै अज्ञान हे लेख । कवण धरी ॥१४॥
अहो आपणयाही पुरता । नेणू न करवे जाणता ॥
तयाते अज्ञान म्हणतां । लाजिजे कीं ॥१५॥
आभाळें भानु ग्रासे । तैं आभाळ कोणें प्रकाशे ॥
सुषुप्ती सुषुप्तेया रुसे । तै तेचि कोणा ॥१६॥
तेसें अज्ञान असें जेथें । तेंच जरी अज्ञान आते ॥
तरी अज्ञान अज्ञानातें । नेणतां गलें ॥१७॥
नातरी अज्ञान एक घडे । हें जयास्तव निवडे ॥
तें अज्ञान नव्हे फुडे । कोण्हे काळीं ॥१८॥
पडळही अथी डोळा । आणि डोळा नव्हे आंधळा॥
तरी आर्थी या पोकळा । बोलिया कीं ॥१९॥
इंधनाच्या आंगीं । खवळेलन आगी ॥
ते न जळे तरी वाउगी । शक्तीच तं ॥२०॥

आंधारु कोंडूनि घरीं । घरा पडसाई न करी ॥
तैं अंधारु इहीं अक्षरीं । न म्हणावा कीं ॥२१॥
वोजावो नेदी जागणें । तिये निदेतें नीद कोण म्हणे
दिवसा नाणी उणे । तैं रात्र कैंची ॥२२॥
तैसें आत्मा अज्ञान असिके । असता तो न सुके ॥
तैं अज्ञानशब्द लटिके । आलेंचि कीं ॥ २३·
ये-हवी तरी आत्मया । माजी अज्ञान असावया ॥
कारण म्हणतां न्याया । चुकी येईल कीं ॥२४॥
अज्ञान तममेळणी । आत्मा प्रकाशाची खाणी ॥
आतां दोहीं मिळणी । एकी कैशी ॥२५॥
स्वप्न आणि जागरु । आठवू आणि विसरु ॥
हे युग्मे एका हारु । चालती जरी ॥२६॥
शीता तापा एकवट । वाहे वस्तीची वाट ॥
कां तमें वांधिजे मोट । सूर्यरश्मीची ॥२७॥
नाना राती आणि दीवो । येती एकेठायीं राहो ॥
तै आत्मा जीवें जीवो । अज्ञानाचेनि ॥२८॥
हं असो मृत्यु आणि जिणे । हे शोभती काय मेहुणे
तरी आत्मेन असणें । अज्ञानेशीं ॥२९॥
अहो आत्मेन जे बाधे । तेंचि आत्मेनशीं नांदे ॥
ऐशीं कायशीं विरुद्धे । बोलणीं इये ॥३०॥
अहो अंधारपणीची पैज । सांडूनि अंधार तेज ॥
जाला तैं सहज । सूर्य निभ्रांतचि ॥३१॥

दुलांकुडपण सांडिले । आणि आगीपण मांडिले ॥
तैंचि आगी जाले । इंधन कीं ॥३२॥
कां गंगा पावत खेवो । आनपणाचा ठावो ॥
सांडी तैं गंगा हो । लाहे पाणी ॥३३॥
तेसें अज्ञान हें अज्ञान नोहे।तरी आत्मा असके असो
लाहे ॥ येऱ्हवी अज्ञान होये । लागलेंचि ॥३४॥
आत्मेनशी विरोधी । म्हणोनी नुरेचि इये संबंधी
वेगळे तरी सिद्धि । जायेचिना ॥३५॥
लवणाची मासोळी । जऱ्ही होय जिव्हाळी ॥
तरी जळीं ना वेगळी । न जिये जेवी ॥३६॥
जे अज्ञान येथें नसे । तरीच आत्मा असे ॥
म्हणोनी बोलणीं वायसे । नायकावी कीं ॥३७॥
दोरी सर्पाभास होये । तो तेणे दोरे बांधो ये ॥
ना दवडणे न साहे । जयापरी ॥३८॥
नाना पुनिवेचेनि आंधारें । दिहाभेण राती महुरे।
कीं येतचि सुधाकरें । गिळिजे जेवी ॥३९॥
तियापरी उभयता । अज्ञान शद्ब गेला वृथा ॥
हा तर्का वांचोन हाता । स्वरूपें नये ॥४०॥
तरी अज्ञानस्वरूप कैसे । काय कार्यानुमेय असे ॥
कीं प्रत्यक्षचि दिसे । धांडोळू आतां ॥४१॥
अहो प्रत्यक्षादि प्रमाणी । कीजे जयाची घेणी ॥
तें अज्ञानाची करणी । अज्ञान नव्हे ॥४२॥

जैशी अंकुरेसीं सरळ । वेली दिसे वेल्हाळ ॥
तें बीज नव्हे केवळ । बीजकार्य होये ॥४३॥
कां शुभाशुभरूपें । स्वप्नदृष्टि अरोपे ॥
तें नीद नव्हे जाउपे । निद्रेचें कीं ॥४४॥
नाना चांदू एकु असे । तो व्योमी दुणावला दिसे॥
तें तिमिरकार्य जैसें । तिमिर नव्हे पैं ॥४५॥
तैसें प्रमाता प्रमेय । प्रमाण जें त्रय ।
तें अज्ञानाचें कार्य । अज्ञान नव्हे ॥४६॥
ह्मणोनी प्रत्यक्षादिकीं । अज्ञानकार्यविशेखी ।
न घेपे येविषयीं । आनु नाहीं ॥४७॥
अज्ञान कार्यपणे । घेइजे अज्ञान ह्मणणे ॥
तरी घेताही करणे । तयाचेचि ॥४८॥
स्वप्नी दिसे तें स्वप्न । मा देखता काय आन ॥
तैसे कार्यचि अज्ञान । केवळ जरी ॥४९॥
तरी चाखिला गूळ गूळे । माखिले काजळ कांजळे ॥
कां घेपे देपे शूळे । हालया शूळें ॥५०॥
तैसें कारणअभिन्नपणें । कार्यही अज्ञान होणें ॥
तें अज्ञानचि मा कोणें । काय घेपे॥५१॥
आतां घेते घेइजे ते ऐसा । विचारु नये मानसा ॥
तरी प्रमाण जाला मासा । मृगजळींचा ना ॥५२॥
तंव प्रमाणाचिया मापा । न संपडेचि जे बापा ॥
तया आणि खपुष्पा । विशेषु काई ॥५३॥

मा हे प्रमाणचि नुरवी । आथा हे कोण प्रस्तावी ॥
येणेंही बोले जाणावी । अज्ञान उरवी ॥५४॥
एवं प्रत्यक्ष अनुमान । यया प्रमाणा भाजन ॥
नहोनी जाले अज्ञान । अप्रमाण ॥५५॥
ना स्वकार्याते विये । जें कारणपणा नये ॥
मी अज्ञान ऐसें विहे । मानू साचे ॥५६॥
आत्मया स्वप्न दाउ । न सके कीर बहु ॥
परी ठाये ठाउ । निदेजो नेणे ॥५७॥
हें असो जिये वेळे । आत्मेपणेचि निखिळे ॥
आत्मा अज्ञानमेळे । असे तेणे ॥५८॥
जैसें न करितां मंथन । काष्टी अवस्थान ॥
जैसें कां हुताशन । सामर्थ्याचें ॥५९॥
तैसें आत्मा ऐसे नांव । न साहे आत्मयाची बरव ॥
तै का अज्ञान हाव । बांधते का ॥६०॥
काय दीप न लाविजे । तैंचि काजळी फेडिजे ॥
कीं नुगवतीया वाळीजे । रुखाची छाया ॥६१॥
नाना नुठिता देहदशा । कालवूनि लाविजे चिकसा ॥
न घडीता आरसा । उटिजे काइ ॥६२॥
कां वोहाच्या दुधीं । सायचि असावी आधीं ॥
मग ते फेडु इये बुद्धि । पवाडु कीजे ॥६३॥
तैसें आत्मयाच्या ठाई । जैं आत्मेपणा ठाऊ नाहीं ॥
तैं अज्ञान कांहीं । सारिखे कैसें ॥६४॥

म्हणोनी तेव्हांही अज्ञान नसे । हें जालेचि असे आपैसे
आतां रिकामे कायसे । नाहीं म्हणो ॥६५॥
ऐसाही आत्मा जेव्हां । जैं नातळे भावाभावा ॥
अज्ञान असे तेव्हां । तरी ते ऐसे ॥६६॥
जैसें घटाचे नाहींपण । फुटोनी होय शतचूर्ण ॥
किंवा सर्वापरी मरण । मारवलें ॥६७॥
नाना निंदे नीद् आली । कीं मूर्छा मुर्छे गेली ॥
कीं अंधारी पडली । आंधकूपी ॥६८॥
कां आभाव अवघडला । कां केळीचा गाभा मोडला
चोखळा असुडला । आकाशाचा ॥६९॥
कां निवटिया सूद्ले विख । मुकियाचे बांधिले मुख
नाना नुठिता लेख । पुसिले जैसे ॥७०॥
तैसें अज्ञान आपुलिये वेळ । भोगी हेचि टवाळ ॥
आतां तरी केवळ । वस्तु होऊनि असे ॥७१॥
देखा वांझ कैशी विये । विरुढत्ती भाजलीं बिये ॥
कीं सूर्य कोणा लाहे । अंधाराते ॥७२॥
तैसा चिन्मात्री चोखडा । भलतैसा अज्ञानाचा झाडा
घेतला तऱ्ही पवाडा । येईल काई ॥७३॥
जे सायेचिये चाडे । डहुळे दुधाचे भांडें ॥
तें दिसे कीं विघडे । तैसें हे पा ॥७४॥
नाना नीद् धरावया हातीं । चेऊनि उठिला झडती ॥
ते लाभे कीं थिती । नासली होये ॥७५॥

तेवीं पहावया अज्ञान ऐसें। हें आंगीं पिसें कायसें॥
न पाहतां आपेंसे । न पाहणेंचि कीं ॥७६॥
एवं कोण्हेही परी । अज्ञानभावाची उजरी ॥
न पडेचि नगरी । विचाराचिये ॥७७॥
अहो कोण्हेही वेळे । आत्मा अथवा वेगळे ॥
विचाराचे डोळे । देखते कां ॥७८॥
ना निर्धाराचे तोंड न माखे।प्रमाण स्वभींही नायके॥
कीं निरुती हन मुके । अनसाईपणा ॥७९॥
इतुलियाही भागू । अज्ञानाचा तरी तो मागू ॥
निगे ऐसा बागू । पडतां कां देवा ॥८०॥
अवसेचिनि चंद्रबिंबे । निर्वाळीलिये सभे ॥
कां मांडले जैसे खांबे । शशविषाणाचे ॥८१॥
नाना गगनौलाचिया माळा । वांझेचिया झालिया गळा ॥ घापती तो सोहळा । पाविजेत असे॥८२॥
आणूनि कासवीचे तूप । भरु आकाशाचे माप ॥
तरी साचा येती संकल्प । ऐसे ऐसे ॥८३॥
आह्मी येऊनि जाऊनि पुढती । अज्ञान अणावे निरुती॥
ते नाहीं तरी किती । वतवतु पा ॥८४॥
ह्मणोनि अज्ञान अक्षरें । तुमसू आतां निदसुरे ॥
परी आन एक स्फुरे । इयेविषयीं ॥८५॥
आपणया ना आणिकाते । देखोनी होय देखते ॥
वस्तु ऐशिया पुरते । नव्हेचि आंगे ॥८६॥

तरी ते आपणया पुढं । दृश्य पघळे येवढें ॥
आपण करी फुडें । द्रष्टपण ॥८७॥
जेथे आत्मत्याचे सांकडे । तेथें उठे हे येवढें ॥
आणि उठिले तरी रोकडे । देखत असो ॥८७॥
न दिसे जरी अज्ञान । तरी आहे हें नव्हे आन ॥
यया दृश्या अनुमान । प्रमाण जाले ॥८९॥
नातरी चंद्र एकु असे । तो व्योमी दुणावला दिसे ॥
तरी डोळा तिमिर ऐसें । मानू ये की ॥९०॥
भूमी वेगळी झाडे । पाणी घेती कवणीकडे ॥
न दिसती आणि अपाडे । साजी असती ॥९१॥
तरी भरवसेनी मूळे । पाणी घेती हें न ढळे ॥
तैसें अज्ञान कळे । दृश्यास्तव ॥९२॥
चेइलेया नीद जाय । निद्रिता तंव ठाउवी नव्हे ॥
परी स्वप्न दाऊनी आहे । ह्मणो ये कीं ॥९३॥
म्हणूनि वस्तुमात्रे चोखें । दृश्य जरी येवढें फाके ॥
तेव्हां अज्ञान अथी सुखे । म्हणो ये की ॥९४॥
अगा ऐशिया ज्ञानाते । अज्ञान म्हणणे केउते ॥
काय दीवो करी तयाते । अंधारु म्हणिपे ॥९५॥
अगा चंद्रापासूनि उजळ । जेणें राविले वस्तु धवल
तयातें काजळ । म्हणिजेत असे ॥९६॥
आगीचें काज पाणी । निफजा जरी आणी ॥
अज्ञान इया वाहणी । मानू तरी ते ॥९७॥

कळीपूर्ण चंद्रमा । आणवूनि मेळवी आत्मा ॥
तरी ज्ञान हें अज्ञान नामा । पात्र होइजे ॥९८॥
चोरसोनी लोभें । विष कां अमृतें दुभे ॥
ना दुभे तरी लाभे । विषाचि म्हणणें ॥९९॥
तैसा जाणणेयाचा वेऱ्हरु । जेथे माखला समोरु ॥
तेथे आणिजे पुरु । अज्ञानाचा ॥१००॥
तया नांव अज्ञान ऐसें । तरी ज्ञान होआवें तें कैसें ॥
येऱ्हवीं कांहींच असें । आत्मा काई ॥१०१॥
कांहींच जया न होणें । होय तें स्वतां नेणें ॥
शून्याचीं देवांगणें । प्रमाणासी ॥१०२॥
असे म्हणावया जोगें । नाचरे कीर आंगें ॥
परी नाहीं हे नलगे । जोडावेंचि ॥१०३॥
कोण्हाचे असणेनवीण असे । कोण्ही न देखताचि दिसे
हें अथी तरी कायसे । हारतलेपण ॥१०४॥
मिथ्या वादाची कुटी आली । ते निवांतचि साहिली
विशेषाही दिधली । पाठी जेणें ॥१०५॥
जो निमालीही नींद देखे । तो सर्वज्ञ येऱ्हढा काय चुके
परी दृश्यचिये न ठके । सोइ जो ॥१०६॥
वेदु काय काय न बोले । परी येथें नांवचि नाहीं घेतलें ॥
ऐसें कांहीं जोडलें । नाहीं जेणें ॥१०७॥
सूर्य कोणा न पाहे । परी आत्मा दाविला आहे ॥
गगनें व्यापिता ठाये । ऐसी वस्तू ॥१०८॥

देह हाडाची मोळी । मी म्हणोनी पोटाळी ॥
तो अहंकारु गाळी । पदार्थू हा ॥१०९॥
बुद्धि बोद्धया सोके । ते येवढी वस्तु चुके॥
मना संकल्प निके । याहीहूनी ॥११०॥
विषयाचिया बरडी । अखंड घासती तोंडीं ॥
तें इंद्रियें गोडी । न घेपती हे ॥१११॥
परी नाहींपणा सकट । खाऊनी भरलें पोट ॥
ते कोणाही सकट । कां फावेल ॥
जो आपणासी नव्हे विखो । तो कोण लाहे देखो ॥
जे वाणी न सके चाखो । आपणापे ॥११३॥
हें असो नांवें रूपें । पुढासूनि अमूपे ॥
जेथें आलीच वासिपे । अविद्या हे ॥११४॥
म्हणोनी आपुलेचि मुख । पहावयाची भूक ॥
न बाणे मा आणिक । के रिघेल ॥११५॥
नाडिले जे वादीकोडे । आतुचि बाहेरी सवडे ॥
तसा निर्णो सुनाथा पडे । केला येथ ॥११६॥
कां मस्तकांत निर्धारिली । जो छाया उडो पाहे ॥
आपुली ॥ तयाची फाकवली । बुद्धि जैशी ॥११७॥
तसें टणकोनी सर्वथा । हे ते ऐशी व्यवस्था ॥
करी तो चुके हाता । वस्तूचा जिये ॥११८॥
आतां सांगिजे ते केउते । शब्दा संसारा नाहीं जेथें॥
दर्शना बीजे तेथें । जाणीव आणी ॥११९॥

जयांचेनि बळे । अचक्षुपण आंधळे ॥
फिटोनी वस्तु मिळे । देखणीदशा ॥१२०॥
आपुलेंचि दृश्यपण । उमसो न लाहे आपण ॥
दृष्टत्वा कीर आण । पडली असता ॥१२१॥
कोणाकोण भेटे । दिठी कैंचि फुटे ॥
ऐक्यासकट पोटे । आटोनी गेली ॥१२२॥
येवढें ही सांकडे । जेणें सारूनी येकीकडे ॥
उघडली कवाडे । प्रकाशाची ॥१२३॥
दृश्याचिया सृष्टी । दिठीवरी दिठी ॥
उठलिया तळवटी । चिन्मात्रचि ॥१२४॥
दर्शनरिद्धि बहुवसा चितशेपु मातला ऐसा ॥
जे शिळा न पाहे अरिसा । वेद्यरत्नाचा ॥१२५॥
क्षणक्षणीं नीच नवी । दृश्याची चोख मदवी ॥
दिठीकरवी वेढवी । उदार जे ॥१२६॥
मागिलीये क्षणीचीं आंगें । पारसी म्हणोनिया वेगें ।
सांडुनि दृष्टी रिघे । नवीया रुपा ॥१२७
तैशीच प्रतिक्षणीं । जाणवेची लेणी ॥
लेवोनी आणी । जाणतेपणा ॥१२८॥
तया परमात्मपदीचें शेष । ना कांहीं तया सुसास ॥
आणि होय येवढी कास । घातली जेणें १२९॥
सर्वज्ञतेचे परी । चिन्मात्राचे तोंडवरी ॥
परी ते आन घरी । जाणिजेना ॥१३०॥

एवं ज्ञानाज्ञानमिठी । तेहीं फाकतसे दिठी ॥१३०॥
दृश्यपणे ये भेटी । आपुलीया ॥१३१॥
तें दृश्य मोटके देखे । आपण स्वयें द्रष्टत्वें ठाके ॥
तेंचि दिठीचेनि मुखे । माजी दाटे ॥१३२॥
तेव्हां घेणें देणें घटे । परी ऐक्याचें सूत न तुटे ॥
जेवी मुखी मुख वाटे । दर्पणे केले ॥१३३॥
आंगें आंगावरी पहुडे । चेइला वेगळा न पडे ॥
तया वारुवाचेनि पाडे । घेणें देणें ॥१३४॥
पाणी कल्लोळाचेनि मिसे । आपणापे वेल्हावे जैसें ॥
वस्तु वस्तुत्वें खेळोये तैसे । सुखे लाहे ॥१३५॥
गुंफी ज्वाळाचिया माळा । लेइलियाही अनळा ॥
भेदाचिया आहाळा । काय पडणें आहे ॥१३६॥
कीं रश्मीचेनि परिवारे । वेढूनि घेतला थोरे ॥
तऱ्ही सूर्यासी दुसरे । बोलो येईल ॥१३७॥
चांदणियाचा गिवसु । चांदावरी पडलिया बहुवसु ॥
काय केवळपणी त्रासु । देखिजेल ॥१३८॥
दळाचिया सहस्त्रवरी । फाको आपुलिया परी ॥
परी नाहीं दुसरी । भास कमळी ॥१३९॥
सहस्त्रवरी बाहिया । आहाति सहस्त्रार्जुनाराया ॥
तरी तो काय तिया । एकोत्तरावा ॥१४०॥
सौकटाचिया वोजा । पसरो कां बहु पुंजा ॥
परी ताथूवीण दुजा । भाव आहे ॥१४१॥

कोडीवरी शब्दाचा । मेळावा घरी वाचेचा॥
मिनला तरी वाचा । मात्र की ते ॥१४२॥
तैसे दृश्याचे डाखळे । नाना दृष्टीचे उमाळे ॥
उठती लेखावेगळे । दृष्टत्वेंचि ॥१४३॥
गुळाचा बांधा । फुटलिया मोडीचा धांदा ॥
जाला तरी नुसधा । गुळचि कीं तो॥१४४॥
तैसें हे दृश्य देखो । कीं बहु होऊनि फाको ॥
परी भेदाचा नव्हे विखो । तेंचि म्हणवूनी ॥१४५॥
तया आत्मयाच्या भाखा । न पडेचि दुसरी रेखा ॥
जरी विश्वा अशेखा । भरलें आहे ॥१४६॥
दुबंधी क्षीरोदकी । वाने परी अनेकी ॥
दिसती तरी तितुकी । सुतें आथी ॥१४७॥
पातयाची मिठी । नुकलिता दिठी ॥
अवघीयाचि सृष्टी । पाविजे जरी ॥१४८॥
न फुटता बीजकणिका । माजी विस्तारे वडु असिका॥
तरी अद्वैतफाका । उपमा आथी ॥१४९॥
मग माते म्या न देखावे । ऐसेही भरे हावे ॥
तरी आंगाचिये विसवे । सेजेवरी ॥१५०॥
पातयाची मिठी । पडिलिया कीजे दिठी ॥
आपुलियेची पोटी रिगोनी असणे ॥१५१॥
कां नुदेलिया सुधाकरु । आपणपे भरे सागरु ॥
ना कूर्मी गिळी विस्तारु । आपेआप ॥१५२॥

आवसेचिये दिवशीं । सतराविये अंशीं ॥
स्त्रये जैसें जशी । रिगणे होय ॥१५३॥
तैसें दृश्य जिणतां द्रष्टे । पडिले जैताचिये कुटे ॥
तया नांव वावटे । आपणपेया १५४॥
सहजे आवघेंचि आहे । तरी कोणा कोण पाहे ॥
ते देखणेंचि आहे । स्वरूपानिद्रा ॥१५५॥
नाना न देखणे नको । ह्मणे मीचि माते देखो ॥
तरी आपेआप विखो । आपैसे असे ॥१५६॥
जे अनादीच दृश्यपणें । अनादीचि देखणे ॥
हें आतां काय कोणे । रचु जावें॥१५७॥
अवकाशेशी गगना । स्पर्शेशी पवना ॥
कीं दीप्तीशी तपना । समंधु कीजे ॥१५८॥
विश्वपणे उजिवडे । तरी विश्व देखे पुढे ॥
ना तें नाहीं तरी तेवढे । नाहींच देखे ॥१५९॥
विश्वाचे असेंनाहीं । विपाये वुडालियाही ॥
तऱ्ही दशा ऐशीही । देखताचि असे ॥१६०॥
कापुराही आथी चांदिणे । कीं तोचि न मखे तेणें॥
तैसें केवळ देखणे । ठाये ठावो ॥१६१॥
किंबहुना ऐसें । वस्तु भलतिये दशे ॥
देखतचि असे । आपणपयाते ॥१६२॥
मनोरथांची देशांतरे । मनीं प्रकाशूनि नरे ॥
मग तेथें आदरे । हिंडे जैसें ॥१६३॥

कां दाटला डोळा डोळया ।डोळाचि तारा होऊनिया
स्फुरे चोख ह्मणौनिया । विस्मो नाहीं ॥१६४॥
यालागी एके चिद्रूपें । आपणपया आपणपे ॥
देखिजे का आरोपे । काय काज ॥१६५॥
किळेचे पांघरुण । आपजवी रत्ना कोण ॥
कीं सोनें ले सोनेपण । जोडजोडू ॥१६६॥
चंदन सौरभ वेढी । कां सुधा आपणया वाढी ॥
कीं गूळ चाखे गोडी । ऐसें आथी हे ॥१६७॥
कीं उजाळाचे कीळे । कापुरा पुटीं दिधले ॥
कीं ताऊनि ऊन केले । आगीतें काई ॥१६८॥
नाना ते लता । आपुले वेली गुंडाळता ॥
घर करी न करितां । जयापरी ॥१६९॥
कां प्रभेचा उभळा । दीप प्रकाशे संचला ॥
तैसा चैतन्ये गिवसिला । चिद्रूप स्फुरे ॥१७०॥
ऐसें आपणया आपण । आपुले निरीक्षण ॥
करावें येणेवीण । करीतूचि असे ॥१७१॥
ऐसें हें देखणें न देखणें।हें आंधारे चांदिणे॥
मा चंद्रासी उणे । स्फुरते का ॥१७२॥
म्हणूनि हें न व्हावें । ऐसेंही करूं पावे ॥
तरी तैसाचि स्वभावे । आइता असे ॥१७३ ॥
द्रष्टा दृश्य ऐसें । दोनी अळुमाळ दिसे ॥
तेंही परस्परानुप्रवेशे । कांहींना कीं ॥१७४॥

तेथें दृश्य द्रष्टा भरे । द्रष्टेपण दृश्यीं सरे ॥
या दोन्ही न होऊनि उरे । दोहींचे साचें ॥१७५॥
मग भलतेथ भलतेव्हां । माझारिलें दृश्य द्रष्टभावा
आटणी करीत खेवा । येती दोन्ही ॥१७६॥
कापुरीं अग्नीप्रवेशु । कीं आगी घातला पोतासु ॥
ऐसे नव्हे संसरिसु । वेचु झाला ॥१७७॥
एका एकु वेचला । शून्यबिंदु शून्यें पूशिला ॥
द्रष्टादृश्याचा निमाला । तैसें होय ॥१७८॥
किंबहुना आपुलिया । प्रतिबिंबा झोंबिनलिया ॥
झोंबी सकट आटोनियां । जाइजे जेवीं ॥१७९॥
तैसें रुसता दृष्टी । द्रष्टा दृश्य भेटी ॥
येती तेथें मिठी । दोहींची पडे ॥१८०॥
सिंधू पूर्वापर । न मिळती तंवचि सागर ॥
मग एकवट नीर । जैसें होये ॥१८१॥
वहु ये हे त्रिपुटी । सहजे हो तया राहटी ॥
प्रतिक्षणीं काय ठी । करीतसे ॥१८२॥
दोन्ही विशेष गिळी । ना निर्विशिष्टातें उगळी ॥
उघडी झापी एकी डोळी । वस्तूची हे ॥१८३॥
पातया पाते मिळे । कीं द्रष्टत्वें सैंघ पघळे ॥
तिये उन्मळितां मावळे । नवलावो हा ॥१८४॥
द्रष्टा दृश्याच्या ग्रासी । मध्यें लेख विकाशी ॥
योग भूमिका ऐशी । आंगी वाजे ॥१८५॥

उठिला तरंगु बैसे । पुढें अनुही नुमसे ॥
ऐसा ठाइ जैसें । पाणी होय ॥१८६॥
कां नीदसरोनी गेली । जाग्रति नाहीं चेइली ॥
तेव्हां होय आपुली । जैशी स्थिति ॥१८७॥
नाना एका ठाऊनि उठी । अन्यत्र नव्हे पैठी ॥
हे गमे तैसिया दृष्टि । दिठी सूता ॥१८८॥
कां मावळो सरला दीवो । रात्रीचा न करी प्रस्तावो
तेणें गगनें हा भावो । वाखाणिला ॥१८९॥
घेतला श्वासु बुडाला । घापता नाहीं उठिला ॥
तैसा दोहीं शिवतला । नव्हे जो अर्थु ॥१९०॥
कीं अर्धवियाची करणी । विषयाची वेणी ॥
करितांचि एके क्षणीं । जे कीं आहे ॥१९१॥
तया सारिखा ठावो । हा निकराचा आत्मभावो ॥
येणें कां पाहे । न पाहो लाभे ॥१९२॥
काय आपुलिये भूमिके । आरसा आपुलिये निके ॥
पाहो न पाहो सके । हें कें आहे ॥१९३॥
समोर पाठीमोरया । मुखे होऊं ये आरसिया ॥
वांचूनि तयाप्रति तया । होआवे कां ॥१९४॥
सर्वांगे देखणा रवी । परी ऐसें घडे केवी ॥
जे उदो अस्तूची चवी । स्वयें घेपे ॥१९५॥
कीं रसु आपणया पिये । कीं तोंड लपवूनि ठाये ॥
हें रसपण नव्हे । तया जैसें ॥१९६॥

तैसे पाहणें न पाहणे । पाहणेंपणेंचि हो नेणे ॥
आणि दोनी हे येणें । स्वयेंचि असिजे ॥१९७॥
जें पाहणेंचि म्हणूनिया । पाहणें नव्हे आपणया ॥
तैं न पाहणें आपसया । हाचि आहे ॥१९८॥
आणि न पाहणें मा कैसे । आपणपें पाहो बैसे ॥
तरी पाहणें हें ऐसें । हाचि पुढती ॥१९९॥
हे दोन्ही परस्परें । नांदती एका हारें ॥
बांधोनी येरयेरे । नाहीं केलें ॥२००॥
पाहणया पाहणें आहे । तरी न पाहणें होंचि नव्हे ॥
म्हणोनी याची सोये । नेणती दोन्ही ॥२०१॥
एवं पाहणें न पाहणें । चोरोनियां असणें ॥
ना पाहे तरी कोणे । काय पाहिलें ॥२०२॥
दिसत्यानें दृश्य भासे । म्हणावेना देखिलें ऐसें ॥
तरी दृश्यास्तव दिसे । ऐसें नाहीं ॥२०३॥
दृश्य कीर दृष्टीसी दिसे । परी साच कीं द्रष्टा असे
आतां नाहीं तें कैसें । देखिलें होय ॥२०४॥
मुख दिसो कां दर्पणीं । परी असणें कीं तये मुखपणीं
तरी जाली ते वायाणी । प्रतीती कीं ॥२०५॥
देखतांचि आपणयातें । आलिये निदेचेनि हाते ॥
तया स्वप्ना ऐसें येथें । निहाळिता ॥२०६॥
निद्रिस्त सुखासनीं । वाहिजे अनुवाहणी ॥
तो साचे काय तेसणी । दशा पावे ॥२०७॥

कीं सिसेंवीण एकएके । दाविली राज्य करिति रंके
तैशीं तियें सतुके । आर्थी काइ ॥२०८॥
ते निद्रा जेव्हां नाहीं । तेव्हां जो जैसा जिये ठाईं॥
तसाचि स्वप्नी कांहीं । न दाविजेचि कीं ॥२०९॥
तान्हेलिया मृगतृष्णा । न भेंटालिया सिंणु जेसणा॥
मा भेटलिया कोणा । काय भेटले ॥२१०॥
कीं साउलियेचेनि व्याजे । मेळविलें जेणें दुजे ॥
तयाचें करणें वांझे । जालें जैसें ॥२११॥
तैसें दृश्य करूनिया । तें द्रष्ट्यातें द्रष्ट्या ॥
दाऊनि धांडिले वाया । दाविलेपणही ॥२१२॥
जें दृश्य द्रष्टाचि आहे । मा दावणें कां साहे ॥
न दाविज तरी नोहे । तया तो कांहीं ॥२१३॥
आरिसा पा न पाहे । तरी मुखचि वाया जाये ॥
तेणेंवीण आहे । आपणपें कीं ॥२१४॥
तैसें आत्मयाते आत्मया । न दावीचि पै माया ॥
तरी आत्मा वावो कीं वांया । तेंचि तें कीं ना॥२१५
म्हणोनी आपणापे द्रष्टा । न करितां असे पैठा ॥
आतां जालाचि दिठा । कां करावा ॥२१६॥
नाना मागुते दाविलें । तरी पुनरुक्त तेंचि झालें ॥
येणें ही बोले गेले । दावणे वृथा ॥२१७॥
दोरा सर्पाभासा । साचपणें दोरु का जैसा ॥
द्रष्टा दृश्या तैसा । द्रष्टा साचु ॥२१८॥

दर्पणें आणि मुखें । मुख दिसे हें न चुके ॥
परी मुखीं मुख सतुकें । दर्पणीं नाहीं ॥२१९॥
तैसें द्रष्टा दृश्या दोहो । साच कीं देखता ठावो ॥
म्हणोनी दृश्य ते वावो । देखिलें जरी ॥२२०॥
वावो कीर होये । तऱ्ही दिसत तंव आहे ॥
येणे बोलें होये । आथी ऐसें ॥२२१॥
तरी आन आनातें । देखोनी होय देखतें ॥
तरी मानु येते । देखिलें ऐसें ॥२२२॥
येथें देखोनी कां न देखोनी । ऐक्य का नाना होऊनि
परी हा येणें वाचूनि । देखणें असे ॥२२३॥
आरशानें हा कां दाविलें । तऱ्ही मुखाचि मुख देखिलें
तो न दावी तऱ्ही संचलें । मुखाचि मुखीं ॥२२४॥
तैसें दाविते नाहीं । तरी हाचि ययाच्या ठाईं ॥
ना दावी तऱ्हीही । हाचि यया ॥२२५॥
जाग्रति दाविला । कां निद्रा हारविला ॥
परी जैसा येकिला । पुरुष पुरुषीं ॥२२६॥
का रायातें तूं रावो । ऐसा दाविजे प्रत्ययो ॥
तऱ्ही ठायेठावो । राजाचि असे ॥२२७॥
नातरी रायपण राया । नाणिजे कीं प्रत्यया ॥
तऱ्ही काहीं उणे तया । माजी असे ॥२२८॥
तैसें दाविता न दावितां । हा यया परौता ॥
चढेना तुटे आइता । असताचि असे ॥२२९॥

तरि कां निमित्य पिसे । हा यया दाऊं वैसे ॥
देखते नाहीं तैं आरिसे । देखावे कोणे ॥२३०॥
दीपु दावीतयाते रची । कीं तेणेंचि सिद्धी दीपाची॥
तैशी सत्ता निमित्ताची । येणें साच ॥२३१॥
वन्हीते वन्ही शिखा । प्रकाशी कीर देखा ॥
परी वन्ही नहूनि लेखा । येईल काई ॥२३२॥
आणि निमित्त जे बोलावें । तें येणें दिसोनि दावावें॥
देखिले तऱ्ही स्वभावें । दृश्यही हा ॥२३३॥
म्हणोनी स्वयंप्रकाश यया । आपणपे देखावया ॥
निमित्त हा वांचोनियां । नाहींच मा ॥२३४॥
भलतेन विन्यासे । दिसत तेणेंचि दिसे ॥
हा वांचूनि नसे । येथें कांहीं ॥२३५॥
लेणें आणि भांगारे । भांगारचि एक स्फुरे ॥
कां जेथें दुसरे । नाहींच म्हणौनी ॥२३६॥
जळतरंगीं दोन्हीं । जळावांचूनि नाहीं ॥
म्हणौनी आन कांहीं । नाहीं ना नोहे ॥२३७॥
हो कां घ्राणनुमेयो । येऊं कां हातीं घेवो ॥
लाहो कां दिठी पाहो । भलतैसे ॥२३८॥
परी कापुराच्या ठाई । कापुरावांचूनि नाहीं॥
तैसा रीति भलतयसाही । हाचि यया ॥२३९॥
आतां दृश्यपणें दिसो । कां द्रष्टा होऊनि असो ॥
परी हा वांचूनि अतिसो । नाहीं येथें ॥२४०॥

गंगा गंगापणें वाहो । कीं सिंधु होऊनि राहो ॥
परी पाणीपण नवलावो । न देखो कीं ॥२४१॥
थिजावें कीं विघरावें । हे अप्रयोजक आघवें ॥
घृतपण नव्हे । अनारिसें ॥२४२॥
ज्वाळा आणि वन्ही । न लेखिजति दोनी ॥
वन्हीमात्र म्हणोनी । आन नव्हे कीं ॥२४३॥
तैसें दृश्य कां द्रष्टा । या दोन्ही दशा वांझटा ॥
पाहता एकीकाष्टा । स्फूर्तीमात्र तो ॥२४४॥
इये स्फूर्तीकडोनी । नाहीं स्फूर्तीमात्र वांचोनी ॥
तरी काय देखोनी । देखतु असे ॥२४५॥
पुढे फरकेना दिसते । ना मागें डोकावी देखते ॥
पाहतां येणें ययाते । स्फुरद्रूपचि ॥२४६॥
कल्लोळी जळीं घातले । सोनेंन सोनं पांघुरले ॥
दिठीचे पाय गुंतले । दिठीसीचि ॥२४७॥
श्रुतीसी मेळविली श्रुति । दृतीसी मेळविली दृती ॥
कां तृप्तीसी तृप्ती । वोगरिली ॥२४८॥
गूळ गुळें परिवडिला । मेरु सुवर्णें मढिला ॥
कां ज्वाळा गुंडाळिला । अनळु जैसा ॥२४९॥
हें वहु काय बोलिजे । कीं नभ नभाचिये रिगे सेजे
मग कोणे निदिजे । जागे कोणे ॥२५०॥
हा येगे पाहिला ऐसा । कांहीं न पाहिला जैसा ॥
आणि न पाहताही आपैसा । पाहणेंचि हा ॥२५१॥

येथें बोलणे न साहे । जाणणे न समाये ॥
अनुभव न लाहे । आंगीं मिरौं ॥२५२॥
म्हणोनी ययाते येणं । येपरीचे पाहणें ॥
पाहतां कांहीं कोणे । पाहिले नाहीं ॥२५३॥
किंबहुना ऐसें । आत्मेन आत्मा प्रकाशे ॥
न चेतुचि चेऊ वैसे । तयासी तो ॥२५४॥
स्वयें दर्शनाचिया सवा । अवघीयाचि जातसे फावा
परी निजात्मभावा । न मोडताही ॥२५५॥
न पाहतां आरिसा असो पाहे । तरी तेंचि पाहणे होये
आणि पाहणेन तरी ते जाये।न पाहणे पाहणें॥२५६॥
भलतैसा फाके । परी येकपणा न मुके ॥
नाना संकोच तरी असिके । हाचि आथी ॥२५७॥
सूर्याचिया हाता । अंधकारू नये सर्वथा ॥
मा प्रकाशाची कथा । आइकता का ॥२५८॥
अंधारु कां उजिवडु । हा येकला येकवडु ॥
जैसा कां मार्तंडु । भल तेथें ॥२५९॥
तैसा आवडतिये भूमिके । आरूढलीयाही कौतुकें ॥
परी ययाते हा न चुके । हाचि ऐसा ॥२६०॥
सिंधूची शीव न मोडे । पाणीपणा सळ न मोडे ॥
परी मोडुतु कां गाडे । तरंगाची ॥२६१॥
रश्मी सूर्याची आथी । परी बिंबा बाहेरी जाती ॥
म्हणोनी बोधसंपत्ति । उपमा नोहे ॥२६२॥

आणि पल्हेचा दोडा । न पडता तढा ॥
जग तंव कापडा । न भरेचि की ॥२६३॥
सोनयाचा रवा । रवेपणाचा ठेवा ॥
आवघेयाची अवयवा । लेणें नव्हे ॥२६४॥
न फेडिता आडवावो । दिगंतोनी दिगंता जावो ॥
नये मा पावो । उपमा काई ॥२६५॥
म्हणोनी इंये आत्मलीळे । नाहीं आन कांटाळे ॥
आतां येयाचिये तुळे । हाचि यया ॥२६६॥
स्वप्रकाशाच्या घासी । जेविता बहुवेगेशीं ॥
वेचेना परी कुशी ॥ वाखही न पडे ॥२६७॥
ऐसा निरुपमा परी । आपुलिये विलासवरी ॥
आत्मा राणीव करी । आपुले ठाई ॥२६८॥
तयाते म्हाणिपे अज्ञान । तरी न्याया भरले रान ॥
आता म्हणे तयाचे वचन । उपसावो हो आम्ही॥२६९
प्रकाशिते अज्ञान । ऐसें म्हणणें हन ॥
तरी निधीदाविते अंजन । न ह्मणिजे काई॥२७०॥
सुवर्णगौरआंबिका । न ह्मणिजे काय काळिका ॥
तैसा आत्मप्रकाशका । अज्ञानवादु ॥२७१॥
येऱ्हवीं शिवोनी पृथ्वीवरी । तत्वाच्या वानेपरी ॥
जयाच्या रश्मीकरी । उजाळा येती ॥२७२॥
जेणें ज्ञान सज्ञान होये । दृङ्मात्र दृष्टीते विये ॥
प्रकाशाचा दिवो पाहे । प्रकाशासी ॥२७३॥

तें कोणे निकृष्टे । दाविले अज्ञानाचेनि वोटे ॥
ना तमे सूर्या मोटे । बांधितां निके ॥२७४॥
अपूर्व ज्ञानाक्षरीं । वसता अज्ञानाची थोरी ॥
शब्दार्थाची उजरी । अपूर्व नव्हे कीं ॥२७५॥
लाखेचे मांदुसे । आगीचे ठेवणे कायसे ॥
आतुबाहेरी सरिसे । करुनि घाली ॥२७६॥
म्हणोनी जग ज्ञाने स्फिुते । बोलता अज्ञानवादाते ॥
विखुरली होती आते । वाचेचिये ॥२७७॥
अखरी तव गोवधु । पुढारा अनृतबाधु ॥
मा कैसा अज्ञान वादु । कीजे ज्ञानी ॥२७८॥
आणिं अज्ञान म्हणणे । स्फुरतसे अर्थपणे ॥
आतां हेंचि ज्ञान कोणे । मानिजेना ॥२७९॥
असो हें आत्मराजे । आपणापे जेणें तेजें ॥
आपणाचि देखिजे । वहुयेपरी ॥२८०॥
निर्वेचिता जे झावळे । तेचि कीं लाहे डोळे ॥
डोळ्यापुढें मिळे । तेंचि तया ॥२८१॥
ऐसें जगज्ञान जें आहे । तें अज्ञान म्हणे मी विये॥
येणें अनुमानें हो पाहे । आथी ऐसें ॥२८२॥
तंव अज्ञान विशुद्धी नाहीं । हें जगेंचि ठविलें ठाइ ॥
जे धर्म धर्मित्व केही । ज्ञानाज्ञान असे ॥२८३॥
काजळा मोती विये । राखोंडिया दिपु जिये ॥
तरी ज्ञान धर्म होये । अज्ञानाचा ॥२८४॥

चंद्रमा निगती ज्वाळा । आकाश आते शिळा ॥
तरी अज्ञान उजळा । ज्ञानाते वमी ॥२८५॥
क्षीराब्धिकाळकूट । हें एके परीचें विकट ॥
काळकूटीं चोखट । सुधा कैंची ॥२८६॥
ना ज्ञानीं अज्ञान जाले । तें होतांचि अज्ञान गेलें॥
पुढती ज्ञान एकले । अज्ञान नाहीं ॥२८७॥
म्हणोनी सूर्य सूर्याचियेवढा । चंद्र चंद्राचि सांगडा॥
ना दीपाचिया पडिपाडा । ऐसा दीपू ॥२८८॥
प्रकाशू तो प्रकाशकी । यासी न वंचे घेई चुकी ॥
म्हणोनि जग आसिकी । वस्तुप्रभा ॥२८९॥
विभाति यस्य भासा । सर्वमिदं हा ऐसा ॥
श्रुति काय वायसा । ढेकर देती ॥२९०॥
यालागीं वस्तुप्रभा । वस्तूचि पावे शोभा ॥
जातसे लाभा । वस्तुसिचि ॥२९१॥
वांचूनि वस्तु इया । आपणापे प्रकाशावया ॥
अज्ञान हेतु वाया । अवघेची ॥२९२॥
म्हणोनी अज्ञान सद्भावो । कोणेपरी न लाहो ॥
अज्ञान कीर वावो । पाहो ठेलियाही ॥२९३॥
परी तमाचा विसुरा । न जोडेचि दिनकरा ॥
रात्रीचिया वरा । गेलियाही ॥२९४॥

कां नीद खोळे भरितां । जागणेंही नये हाता ॥
येकलिया टळटळिता । ठाकिजे जेवी ॥२९५॥

इति श्रीसिद्धानुवादेश्रीमदनुभवामृत अज्ञानखंडनं नाम सप्तमप्रकरणं संपूर्णम्

---

# प्रकरण आठवें.

तैसें आमुचेनि नांवें । अज्ञानाचें ज्ञानही नव्हे ॥
आम्हांलागीं गुरुदेवें । आम्हींच केलो ॥१॥
परी आह्मा आम्ही आहो । तें कैसें पाहो जावो ॥
तंव काय कीजे ठावो । लाजिजे ऐसा ॥२॥
हा ठावोवरी गुरुरायें । नांदविलों उवायें ॥
जे आह्मी न समायें । आह्मामाजी ॥३॥
अहो आत्मपणीं न संटो । स्वसंविती न घसवटो ॥
आंगीं लागले न फुटो । कैवल्यही ॥४॥
आमुची करवे गोठी । ते जालीचि नाहीं वाक्सृष्टी ॥
आमुतें देखो दिठी । ते दिठीच नव्हे ॥५॥
आमुतें करूनि विखो । भोगूं शके पारखो ॥
तैं आमुतें न देखो । आम्हीपणा ॥६॥
प्रकटो लपो न लाहो । येथें नाहीं नवलाहो ॥
परी कैसेनीही विपावो । असणेयाचा ॥७॥

किंबहुना श्रीनिवृत्ति । ठेविलो असो जये स्थिती ॥
ते काय देऊं हातीं । वाचेचिया ॥८॥
तेथें समोर व्हावया । अज्ञानाचा पाडु कासया ॥
केउते मेलिया माया । होऊ पाहिजे ॥९॥
अज्ञानाचा प्रवर्तु । नाहीं जया गांवाआतु ॥
तेथें ज्ञानाची तऱ्ही मातु । कोण जाणे ॥१०॥
रात्री म्हणोनी दीवे । पडती कीं लावावें ॥
वांचूनि सूर्यासवे । सिणणे होये ॥११॥
म्हणोनी अज्ञान नाहीं । तेथेंचि गेलें ज्ञानही ॥
आतां निमिषोन्मेषा दोही । ठेली वाट ॥१२॥
येऱ्हवी तरी ज्ञान अज्ञाने ।दोहींची अभिधानें ॥
अर्थाचोनि आनाने । विघ्राविली ॥१३॥
जैशीं दंपत्ते परस्परें । तोडूनि पालिटिली शीरें ॥
तेथें पालटु ना पण सरे । दोहींचें जिणें ॥१४॥
कां पाठी लाविला होये । तो दीपूचि वांया जाये॥
दिठी आंधारे पाहे । तै तोचि वृथा ॥१५॥
तैसें निपटूनि जें नेणिजे । तें अज्ञान शब्दं बोलिजे॥
आतां सर्वही जेणे सुजे । तें अज्ञान कैसें ॥१६॥
ऐसें ज्ञान अज्ञान आलें । अज्ञान ज्ञानें गेलें ॥
हे दोन्ही वांझोले । दोनी झाली ॥१७॥
आणि जाणे तेचि नेणे । नेणे तेचि जाणे ॥
आतां के असणे जिणे । ज्ञाना अज्ञाना ॥१८॥

एव ज्ञानाज्ञान दोन्ही । पोटी सूनि अहनी ॥
उदेला चिद्गगनीं । चिदादित्यु हा ॥१९॥

इति श्रीसिद्धानुवादेश्रीमदनुभवामृते ज्ञानखंडनं नाम
अष्ठमप्रकरणं संपूर्णम्

---

# प्रकरण नववें.

आतां अमोद सुनास जाले ॥ श्रुतीस श्रवण रिघाले
आरिसे उठिले । लोचनेसी ॥१॥
आपुलेंनि समीरपणे । वेल्हावती विंजणें ॥
कीं माथेची चापेपणे । वहकताती ॥२॥
जिव्हा लोधली रसें । कमळ सूर्यपणें विकाशे ॥
चकोरेचि जैसें । चंद्रमा जाली ॥३॥
फुलेंचि जालीं भ्रमर । तरुणीच जाले नर ॥
जालें आपुलें शेजार । निद्राळूंचि ॥४॥
दिठीवियाचा रवा । नागरु इया ठेवा ॥
घडिला कां कोरिवा । परी जैसा ॥५॥
तैसें भोग्य आणि भोक्ता । दिसे आणि देखता ॥
हें सरलें अद्वैता । अफुटामाजी ॥६॥
सेवतेपणा वाहेरी । न निगताचि परी ॥
पाती सहस्राकरी । उपलविजे ॥७॥

तैसें नवानवा अनुभवी । वाजतां वाधावी ॥
अक्रियेच्या गांवीं । नेणिजे ते ॥८॥
म्हणूनि विषयाचेनि नांवें । सूनि इंद्रियांचे थवे ॥
सैंघ घेती धांवें । समोरही ॥९॥
परी अरिसा सिवेसिवे । तव दिठीसी दिठी फावे॥
तैसें जाले धांवे । वृत्तिचिया ॥१०॥
नाग मुदी कंकण । त्रिलिंगी भेदली खूण ॥
घेता तरी सुवर्ण । घेईजे कीं ॥११॥
वेंचूनि आणू कल्लोळ । म्हणोनी घापे करतळ ॥
तेथें तरी निखळ । पाणी फावे ॥१२॥
हातापाशीं स्पर्शू । डोळ्यापाशीं रूपसु ॥
जीभपाशी मिठांशु । कोण्ही एकु ॥१३॥
तऱ्ही परिमळापरौते । मिरवणें नाहीं कापुराते ॥
तैसें बहुतापरी स्फुरते । तेंचि स्फुरे ॥१४॥
म्हणोनी शब्दादि पदार्थ । श्रोत्रादिकांचे हाते ॥
घ्यावया जेथें । उजू होती ॥१५॥
तेथें संबंधु होय न होय । तंव इंद्रियांचें तें नोहे ॥
मग असताचि आहे । संबंधू ना ॥१६॥
जियें पेरीं दिसती उसीं । तियें लाभती कीं रसीं ॥
कांती जेवी शशी । पुनवेचिया ॥१७॥
पडिलें चांदावरी चांदिणें । समुद्रीं जालें वरखणें ॥
विषया करणें । भेटती तैशी ॥१८॥

म्हणोनी तोंडाआड पडे । तेही वाचा वावडे ॥
परी समाधी न मोडे । मौनमुद्रेची ॥१९॥
व्यापाराचे गाडे । मोडताही आपाडे ॥
अक्रियेचें न मोडे । पाऊल केंही ॥२०॥
पसरूनि वृत्तीची वावे । दिठी रुपातें दे खेवें ॥
परी साचाचेनि नांवें । कांहींच नलगे ॥२१॥
तमाते घ्यावया । उचलूनि सहस्र बाहिया ॥
शेवटीं रवी यया । हाचि जैसा ॥२२॥
स्वप्नीचिया विलासा । भेटइन या आशा ॥
उठिला तंव जैसा । तोचि मा तो ॥२३॥
तैसा उदैलियानि विषयें । ज्ञानी विपयी हो लाहे॥
तंव दोन्ही न होनी होये । काय नेणो ॥२४॥
चंद्र वेंचू गेला चांदिणें । तंव वेंचिलें काय कोणें ॥
विऊनि वांझे स्मरणें । होती जैशीं ॥२५॥
प्रत्यहारादि आंगीं । योगें आंग टेकिले योगी ॥
तो जाला ये मार्गी । दिहाचा चांदु ॥२६॥
येथें प्रवृत्ति वहुडे जिणे । अप्रवृत्तिसी वाधावणे ॥
आतां प्रत्यङ्मुखपणे । प्रचारु दिसे ॥२७॥
द्वैतदर्शनें आंगण । अद्वैत वोळगे आपण ॥
भेदु तंव तंव दुण । अभेदासी ॥२८॥
कैवल्याही चढावा । करित विषयसेवा ॥
जाला भत्यु भज्य कालोवा । भवतीच्या घरीं॥२९।

घरामाजी पाये । चालता मार्गूही तोचि होये ॥
ना वैसे तऱ्ही आहे । पावणेची ॥३०॥
तैसें भलते करितां । येथें पाविजे कांहीं आतां ॥
ऐसें नाहीं न करितां । ठाकिजेना ॥३१॥
आठवू आणि विसरू । तयातेंही घेउ नेदी पसरु ॥
दशेचा व्यवहारु । असाधारणु ॥३२॥
जाली स्वेच्छाची विधि । स्वैर जाली समाधी ॥
दशे इये मोक्षरिद्धि । वैसो घापे ॥३३॥
जाला देवोचि भक्तु । ठावोचि जाला पंथू ॥
होऊनि ठेला येकांतु । विश्वचि हे ॥३४॥
भलतेउतेन देवें । भलतेन भक्त होआवे ॥
वैसला तेथें राणिवे । अकर्मू हो ॥३५॥
देवाचिया दाटणी । देऊळा जाली आटणी ॥
देशकालादि वाहणी । येइचिना ॥३६॥
देवी देवोचि न माये । मा देवी के अन्वयो आहे ॥
तेथें परिवारु वहुये । अघडता कीं ॥३७॥
ऐसाही स्वामीभृत्युसमंधा । लागी उठली श्रद्धा ॥
ते देवोचि नुसधा । कामविजे ॥३८॥
अवघीयाचि उपचारा । जपध्यान निर्धारा ॥
नाहीं आन संसारा । देवेवांचुनी ॥३९॥
आतां दवातेचि देवें । देववरी भजावें ॥
अपेणाचेनि नांवें । भलतिया ॥४०॥

देव देऊळ परिवारु । कीजे कोरूनि डोंगरु ॥
तैसा भक्तीचा वेव्हारु । कां न व्हावा ॥४१॥
पाहे पा अवघेया । रूखारूखचि यया ॥
परी दुसरा नाहीं तया । विस्तारु जेवी ॥४२॥
अहो मुगी मुग जैसें । घेतां न घेतां नवल नसे ॥
केलें देवपण तैसें । दोहींपरी ॥४३॥
अखताचि देवता । अखतीचि असे न पूजितां ॥
मा अखती काय आतां । पूजो जावो ॥४४॥
दीसीची लुगडी । दीपकळिके तूं वेढी ॥
हें न म्हणतां ते उघडी । ठाके काई ॥४५॥
कां चंद्रातें चंद्रिका । न म्हणिजे तूं ले का ॥
तऱ्ही तो असिका । तियाचि कीं ना ॥४६॥
आगीपणें आगी । असतचि असे आंगीं ॥
मा कासयालागी । देणें न देणें ॥४७॥
म्हणोनी भजतां भजावें। मा न भजतां काय नव्हें।
ऐसें नाहीं स्वभावें । श्रीशिवूचि असे ॥४८॥
आतां भक्ति अभक्ति । जाले ताट एकी पांती ॥
कर्माकर्माचिया वाती । माल्हवूनिया ॥४९॥
म्हणवूनि उपनिषदें । दशे येती निंदे ॥
निंदाचि विशदें । स्तोत्रें होती ॥५०॥
नातरी निंदास्तुति । दोन्ही मौनासाठीं जाती ॥
मौना मौन आथी । बोलतां बोली ॥५१॥

घालितां अऱ्हासऱ्हा पाये । शिवयात्रा होत जाये ॥
शिवा गेलियाही नोहे । केही जाणें ॥५२॥
चालणें आणि बैसक । दोन्ही मिळूनि एक ॥
नोहे ऐसें कौतुक । इये ठाई ॥५३॥
यऱ्हवीं अडोळिलिया डोळा । शिवदर्शनाचा सोहळा ॥
भोगिजे भलते व्हेळा । भलतेणें ॥५४॥
ना समोर दिसे शिव ही । परी देखिलें कांहीं नाहीं
देवा भक्ता दोही । एकाचि पाड्ड ॥५५॥
आपणचि चेंडू सुटे । मग आपणया उपटे ॥
तेणें उंदवला दाटे । आपणपाचि ॥५६
ऐशी जरी चेंडूफळी । देखिजे कां केव्हेळी ॥
तरी बोलिजे सरळी । प्रबुद्धाची ॥५७॥
कर्माचा हातु न लगे । ज्ञानाचें कांहीं न रिगे ॥
ऐसीच होतसे आंगें । उपास्ती हे ॥५८॥
निफजे ना निमे । आंगीं आंग घुमे ॥
सुखा सुख उपमे । देववेल इया ॥५९॥
कोण्ही एक अकृत्रिम भक्तीचें हें वर्म ॥
योगज्ञानादिविश्राम- । भूमिका हे ॥६०॥
आंगें कीर एक जाहले । परी नामरुपाचे मासले ॥
होते ते ही आटले । हरी हर येथें ॥६१॥
अहो अर्धनारीनटेश्वरे । गिळित गिळित परस्परे ॥
ग्रहण जाले एकसरे । सर्वग्रासे ॥६२॥

वाच्यजात खाउनी । वाचकत्वही गिळूनि ॥
ठाकिली निदैजौनी । परा येथें ॥६३॥
शिवाशिवा समर्था स्वामी । येवढीये आनंदभूमि ॥
घेपे दीजे एकें आम्ही । ऐसें केलें ॥६४॥
चेतचि मा चेवविले । निदैलेचि मा निदविले॥
आम्हीच आम्हा आणिले । नवल जी तुझें ॥६५॥
आह्मी निखळ मा तुझे । वरी लोभें म्हणसी माझे ॥
हें पुनरुक्त साजे । तूंचि म्हणोनी ॥६६॥
कोणाचें कांहीं नेघसी । आपुलेंही तैसाचि नेदिसी॥
कोण जाणे भोगसी । गौरव कैसें ॥६७॥
गुरुत्वें जेवढा चांगू । तेव्हडाचि तारूनि लघू ॥
गुरुलघु जाणे जो पांगू । तुझा करी ॥६८॥
शिष्या देतां वाटे । अद्वैताचा समो फुटे ॥
तरी काह्या होती भाटें । शास्त्रें तुझीं ॥६९॥
किंबहु ये दातारा । मीतूं याचा संसारा ॥
वेंचूनि होसी सोयरा । तेणेंचि तोषे ॥७०॥

इति श्रीसिद्धानुवादेश्रीमदनुभवामृते जीवन्मुक्तदशा
कथनंनाम नवमप्रकरणं संपूर्णम्

# प्रकरण दहावें.

परी गा निवृत्तिराया । हातातळीं सुखविलें तुया ॥
परी निवांतचि मिया । भोगावें कीं तें ॥१॥
परी महेशें सूर्याहातीं । दिधली तेजाची सूती ॥
यया भासाअंतर्वर्ती । जगाचि केलें ॥२॥
चंद्रासी अमृत घातलें । तें तयाचि काई येतुलें ॥
कीं सिंधु मेघा दिधले । मेघाचि भागू ॥ ॥३॥
दिवा जो उजिवडु । तो वराचाचि सुरवाडु ॥
गगनीं आथी पवाडु । तो जगाचाचि कीं ॥४॥
अगाधे ही उचंबळती । ते चंद्रीची ना शक्ति ॥
वसंत करी तैं होती । झाडाचें दानीं ॥५॥
म्हणोनी हें असंवर्य । हे दैवीकीचें औदार्य ॥
वांचूनि स्वातंत्र्य । माझें नाहीं ॥६॥
आणि हा येवढा ऐसा । परिहार देऊं कायसा ॥
प्रभुप्रभावविन्यासा । आड ठाउनी ॥७॥
आम्ही बोलिलों जें कांहीं । तें प्रगटेचि असे ठाई ॥
मा स्वयंप्रकाशा काई । प्रकाशावें बोलें ॥८॥
नाना विपाये आम्ही हन । कीजे ते पा मौन ॥
तरी काय जनीं जन । दिसतेना ॥९॥

जनातें जनें देखतां । द्रष्टेचि दृश्य तत्वतां ॥
कोण्ही नहोनी आइता । सिद्धांतचि हा ॥१०॥
यया परौते कांहीं । संचितरहस्य नाहीं ॥
आणि हें तया आधींही । असताचि असे ॥११॥
तऱ्ही ग्रंथ प्रस्तावो । न घडे हें ह्मणे वावो ॥
तरी सिद्धानुवाद लाहो । आवडी करु ॥१२॥
पढियंते सदा तेंचि । परी भोगी नवी नवी रुची ॥
म्हणोनी हा उचीतचि । अनुवाद सिद्ध ॥१३॥
याकारणें मिया । गौप्य दाविलें बोलोनिया ॥
ऐसें नाहीं अपैसया । प्रकाशूचि ॥१४॥
आणि पूर्ण अहंता वेठलों । सैंव आम्हीच दाटलों ॥
मा लोपलों ना प्रगटलों । कोण्हा होउनी ॥१५॥
आपणया आपणपे । निरोपण काय वोपे ॥
मा उगेपणें हरपे । ऐसें आहे ॥१६॥
म्हणोनी माझी वैखरी । मौनाचेंही मौन करी ॥
हें पाणियावरी मकरी । रेखिलिया ॥१७॥
एवं दशोपनिषदें । पुढारी न ढळती पदें ॥
देखोनी बुडी वोधें । येथंचि दिधली ॥१८॥
ज्ञानदेव म्हणे श्रीमंत । हे अनुभवामृत ॥
सेवूांने जीवन्मुक्त । हेंचि होतु ॥१९॥
मुक्ति कीर वेल्हाळ । अनुभवामृत निखिळ ॥
परी अमृताही उठी लाळ । अमृतें येणें ॥२०॥

नित्य चांदू होये । परी पुनवे आनु आहे॥
हें कां मी म्हणू लाहे । सूर्यदिठी ॥२१॥
प्रिया सावइले होये । तें आंगीचें आंगीं न समाये॥
येऱ्हवीं तेथेंचि आहे । तारुण्य कीं ॥२२॥
वसंताचा आला । फळीं फुलीं आपुला ॥
गगनाचिया डाळा । पेलती झाडें ॥२३॥
येयालागीं हें बोलणें । अनुभवामृतपणें ॥
स्वानुभूति परगुणें । वोगरिलें ॥२४॥
आणि मुक्त मुमुक्षु बद्ध । हे तववरी योग्यता भेद॥
अनुभवामृत स्वाद । विरुद्ध जंव ॥२५॥
गंगावगहना आली । पाणिये गंगा जाली ॥
कां तिमिरें भेटली । सूर्या जैसी ॥२६॥
नाहीं परिसाची कसवटी । तववरि वानियाच्या गोष्टी॥
मग पंधरावीयाच्या पाठी । बैसावें कीं ॥२७॥
तैसें जे या अक्षरा । भेटती गाभारा ॥
ते ओघ जैसे सागरा । आंतु आले ॥२८॥
जैशा अकारादि अक्षरा । भेटती पन्नासही मात्रा ॥
तैसें या चराचरा । दुसरें नाहीं ॥२९॥
तैसे तिये ईश्वरी । आंगोळी नुभेचि दुसरी ॥
किंबहुना सरोभरी । श्रीशीवेशीचि ॥३०॥
म्हणोनि ज्ञानदेवो म्हणे । अनुभवामृतें येणें ॥
सणु भोगिजे सणें । विश्वाचेनि ॥३१॥

इति श्रीसिद्धानुवादेश्रीमदनुभवामृते ग्रंथमहिमावर्णनं
नाम दशमप्रकरणं संपूर्णम्

# श्री अनुभवामृत ग्रंथांतील कठीण शब्दांचा कोश.

## प्रकरण पहिलें.

ओव्यांचा क्रमांक.

१ निरुपाधिकें–उपाधीरहीत । जगाची–विश्वाची
जनकें–आईबाप, उत्पादक । वंदिली–वंदन, नमस्कार.
मूळीकें–पहिलें, मूळचें । देवोदेवी–शिवशक्ती, देव, देवी,
पुरुष, व स्त्री.

२ प्राणेश्वरी–बायको, शक्ती,प्रकृति,देवी,पत्नी । उलथे–उलटे–
सरोभरी–वेग, भरीसपडून, स्वभावे करून, आदर, भरानें
चारुस्थळीं-निर्विशेषी,उत्तम,ब्रम्हस्वरूपीं।एकाआंगाची-एकअंग–
एकाहारी–चिद्रूपहारी,एका ओळीला, एका पंक्तीला.
प्रियू–नवरा, पुरुष, शिव, देव.

३ पांगे–हौसेनें, पंगिस्त होऊन । एकएकातें–एकमेकाला
उगळिते–ओकतात, प्रगट करितात । गिळीती-लीन, अव्यक्त,
पोटांत घालतात. । आवडीचेनिवेगें–स्फुरणाच्या योगानें

४ एकसरे–एकदम, एकसारखे । एकचिनव्हे–द्वैताच्या सापेक्ष
एक मोजणीचे नाहीं । नेणो–न जाणो, । दोघा–शिवशक्ती,
स्त्री, पुरुष. । साकारे–आकार असणारे, एक, अनेक.
पुरें–पूर्णत्व. । दोपण–द्वैत–दोनोपण–दोनपणानें

५ आळुकी–छंद, नाद, आवडी, लोभ. । फुटो-भंगतनाहीं
कवतिकी–लिलेनेंसुद्धां, कौतुकानें.

६ हा ठाववरि–एथपर्यन्त, एथवर.।भेडे–भित्रे, भितीनें

वियाली—प्रसवली. । दोघलेपण-दोन्हीपण, उभतांचें एकरूपपण.

७ झोंक-कल, विकार, संबंध, झोका, स्पर्श. । आंगी-स्वरुपाच्या-ठिकाणीं. । तिसरा—शिव, शक्ति, जगत. । संसारा—विश्व.

८ एकेंसत्तेचे—एकचएक स्वरुप. वैसणे—अधिष्ठान, आश्रय. प्रकाशाचे-चिद्स्फुरद्रूपाचे, । लेणे—अलंकार.। अनादि-अदिरहित-मूळपासूनच. । नांदती- नांदतांत, राहतात.

९ एकरसी- ब्रम्हरसीं, । थाव--ठाव, ठिकाण, अंत. । भेद-द्वैत, दोनपणा. । लाजोनी- लज्जित होणे. । आवडी—प्रेमानें.

१० गोसावी-अंगरहित, निराकर. । मालक—पती, पुरुष. देवे—देवाकडून । जियेविण--देवीवाचून. ।
एकोपजिवी-एकमेक एकमेकांचे जीवन ।एकएकाची-एकमेकाची

११ परिमाणू—खिडकींतून आलेल्या उन्हांत जें बारीक कण. दिसतात त्याचा सहावा हिस्सा.।उवाये-उत्कर्ष, उघड आनंदानें मेळू--संयोग, मिलन, एकत्व. । गोडी-- माधुर्यास.
नमाती--मावत नाहीं. । मांडिली—राहिलेली.

१२ एकएकांविण-एकमेक एकमेकावाचून । नकीजे-करित नाहीं तृणाचे—गवताची काडीसुध्दा जियेदोघे--शिवशक्ति
जीवप्राण—जीवानें व प्राणानें.

१३घरवाते—गृहवार्ता, घराच्या, प्रपंच, गृहादिसंसार.
मोटकीं—निपूण, नेटकी, मोजकी, नेमकी, थोडी.

१४ विपायें—कदाचित चुकून. । उमजलें—जागृत झाले, स्वरूपी लीन. । निदे—निद्रा । नुसधें--केवळ, एकटें.

१५ गिवसींत—हुडकीत, शोधीत. । वाहाणीं—ओघ.
आधाधी—अर्धें अर्धे, अर्धवट.

१७ अधाधें—अर्धेअर्धें, अर्धवट.

१८ दांडी—टिपरी, विणा, कर्ण. ।श्रुती—शब्द, वेद.
द्युती--वास, दीप्ती-प्रकाश.

२० आरोगण-जेवण,भक्षण करणें । मेहुण-दंपत्य,नवराबायको

२२ भ्रातारू--भ्रतार, नवरा.

२३ परिमळू-वास । पांगळू-कुंठीत.। निवाडू-निवडण्याची क्रिया

२५ गाभा–गर्भ.

२६ द्योतक--प्रकाशक, अनुमापक--यथार्थ, कल्पना देणारे.
बरवतसे- शोभतसे, मिरवतसे.

२७ निष्कर्षु-सिद्धांतवस्तू, शेवट, परिणाम । बाईला-प्रकृति बायकोनें. । दादुला-दादला, पती, नवरा.

२८ थारों-टिकत, थिरावो, राहो.

२९ उभारा-नामरुपात्मक स्थिति.

३० मिरवणें–प्रसिद्धि.

३१ दुकाळ- दुष्काळ । सोहळा–उत्सव, संग्रम. । लीळा-लीला सदैव--भाग्यवत.

३२ आटणिया-लुप्त होणें. । उवाया-उत्कर्ष, विकासाला.
संकोचे-आटणें, लुप्त होणें. । रूढविली-प्रगट केली.

३३ क्षोभा-विशेप भाव.

३४ भिडा-भिडेनें. । अवला-नवरा. । आंगविला उघडा-अंगानें उघडा पडला.

३५ मंदरूपें-सूक्ष्मरूपें. । उवायिलेंपण-विस्तार, प्रगटपण.
पडिपे-आवड, भूषण, शोभा, बरोबरी.

३६ चेवविला-जागा केला. । वेद्याचे सर्वदृश्यमात्र.
बोणें-पक्वान्न, अन्न. । धाला-तृप्त झाला.

३७ विसांवला-विसंबला भातारे-भ्रतार. आंवुलेपण-आपुलेपण, पुरुषपणा. । विये-उत्पत्ति.

३८ जियोद्देशे-जिच्यानिमित्तानें.

३९ आंगलगे-साह्यानें, अंगसंबंधानें. । आरोगूलागे-उपभोग घेणें, भक्षण करणें.

४२ अनळू-अग्नी. परिमळु-सुवास.

४३ दिवो-दिवस. । साची- अधिष्ठानी.

४४ प्रणवाक्षरीं-ओंकारापासून, विराटादि, जगदोत्पत्तीपर्यंत. विरुढती-उगवती, वाढती.

४५ शिरा-एक पक्वान्न, मोहोनभोग. । उजीरा-उदय,प्रगटपण वोहरा-वधुवरा.

४६ अवघीयांची रजनीं-रात्रीच्यावेळीं सर्वांची दृष्टि असून नाहींसी होते.

परेसी-ज्ञान वाणीसह. । वैखरी-जागृतीतिल वाणी.

४८ चळवळेशी-चंचलतासह.

४९ पाहणेंनसी-पाहतां पहाण्याच्या क्रियेसह.

पहातें-पाहण्याचा विषयासह. । घरौते वरौते-श्रेष्ट गृहस्थाश्रमी दांपत्य, व्यापक,. । अंतरबाह्य-घरचे बाहेरचे.

५० वाहणीं-मार्ग, प्रवाह. । वेदकू-वेद जाणणारा.

वेद्य-विषय, जाणावयास योग्य, ब्रम्हवस्तु.

५१ लिंगभेद-सूक्ष्मभेद-पुज्योच्छेद. द्वैतचिन्ह, चिन्हांनीं भेद. पऱ्हा-पलीकडे, दुसरीकडे.

५२ सोनेंनसी-सोन्याहून.

५३ ठावो-ठिकाणा, मुक्कामाची जागा.

५४ मिरवणें-प्रसिद्धी, शोभा.

५५ भास्य भासकता-प्रकाश्य व प्रकाशक हा भाव.

५६ दोंद-शरीरावर, मोठे पोट. । विखूरी-पसारणे.

गिवसणें-हुडकणें, शोधून सांपडला जाईल काय?

५७ कीळ-तेज, प्रभा, कांति. । पांगुळ-स्थिर, प्रसरणें, अचळ. अगळे-अधिक. । निर्मळ-तेजस्वी.

५८ मात्रा-ओंकार—अ, उ, म. तीनमात्रा. । ती-तीन.

चिरटिया-तुकडे केलेला, चिरफळचा. । णकार-ण असें तीन-

रेघांचें अक्षर.। भेदवला काई-भिन्न झाला काय.। रेघटिया-रेषा
५९ साजरेपण-सुशोभित. । मुकुळें-कमळे, फल, पुष्प.
तुरंबू-परिधान, पूजणें, सुवास घेणें,
६० सिनानी-वेगवेगळाली.
६१वायूचा ठेला-विश्रांती, वायू शांत झाला असतां.
६२ खेवो-तत्क्षणींच.
६४ रंभागर्भ-केळीचा गाभा, पोकळी.

---

## प्रकरण दुसरं.

ओव्यांचा क्रम.
१ आजेचा-ब्रम्हविद्येचा, पूर्णज्ञानाचा.
अहेवतंतु-सौभाग्यसूत्र, मंगळसूत्र,
२ मायाकुंजरु-कपटहस्ती हत्ती-अविद्यारूपी हत्ती.
मुक्त-नित्यमुक्त जो आत्मभाव.। ओगरु-वाढलेले अन्न,पक्वान्न.
३ आडवे-अरण्य, आडरानांत. । भूंजीत-भोगीत. । भवे-फेरे.
४ अपांगपातें-कृपादृष्टीनें, अर्धोन्मेलित दृष्टीनें, दृष्टिक्षेप.
बंधमोक्षपणआतें-बंध हाच मोक्षपणाला येतो.
५ कैवल्यकनक-मोक्षरूपी सोनें.। न कडसी-न विचारी, निवडा-निवड, भेदकरणे. । साना-लहान, अज्ञानी, अनधिकारी.
पाढाऊ-मार्गदर्शक, वाटाड्या.
६ बिके-बलानें. । आरसा-आरिसा.
७ बोध-आत्मज्ञान. । कळा-कला. । पुनीव-पौर्णिमा.
विखुरल्या-प्रसरल्या, पांगल्या. । एकवळा-एकत्र, युक्त.
८ सवें-तत्क्षणीं, लगेच, । उपायाचे-साधनाचे, प्रयत्नाचे.
धांवे-धावाधावी, खटपट, श्रम.
९ अनवसरे-अकाली, असमय, स्वरुपानुभव नसतां.
लें-धरितो, लेतो, धारण करतो. । मोहीरे-साहित्य, सामुग्री,

मोर्चा, मोहकरूप. । सरे-संपते नाश होतो.
भेटतखेव-भेटतांक्षणींच, बरोबर. । बहुरूप-सोंगाचाखेळ,
जगदाकार, बहुविध प्रपंच, नानात्व, नामरुपात्मक जगत,
१० काळवखे-अंधारें, काळोखरात्र. । सींतलें-स्पर्शलें, शिवल्या-
बरोबर,
११ पाखाळे-प्रक्षाळे, स्वच्छ होई, शुद्ध होतो. । वोविळे-ओवळे
१२ राखो जातां- तारोजातां, रक्षण करण्याला.
धाडिलें-घालविलें, सोडून दिले. । थिते-असलेले, व्यर्थ.
१३ सुसास-सुखास करमणें. । मिस- निमित्त. वास-स्थिति.
१४ मोहीरे-सन्मुखता, सुन्दर स्वरूप, मोहक रूप.
परिणमे-परिणाम, पावे, प्रगट होई, परिपक्व झालें.
१५ वेद्या–विषय, दृश्याला. । वेदकू-जाणणें, दृष्टा.
मुये-घालितो, शिरतो. । उशीटी-उष्टी, लिप्त.
१६ सावाये–साहृयानें. । उपर-ब्रम्हाच्याहीवर. । लाहे-मिळते,
प्राप्त होते. । तृणातळीं-तुच्छ, गवताच्याही खालीं.
१७ उपास्तिवरी-सेवा, उपासनेपर्यंत. । रावतिया-कष्ट, खट-
पट करणाराला. । मोडोनिया-दाट, बहाद्दरीचे, विपुल, पुष्कळ
वरिवंडिले–परिपक्व, अनुसरणें, तन्निष्ट होणें, अवलंबून आहे.
अनुज्ञा-आज्ञा.
१८ दिठीवा-कृपादृष्टी.। निगमवन-वेदशास्त्र,उपनिषदादिभाग
आपुलीये फळीं-स्वात्मभाव फळ, आपल्या फळाला.
न घेपती-सांपडत नाहींत. स्वरूपरुपीं फळ, घेतां येत नाहीत,
प्राप्त होत नाहीं.
१९ अलगे-अग्रानें, टोंकानें, भाला. । खोंची-स्पर्श करी, टोचतो,
भोसकतो. । निवटे-बाधीत, निवडी, निरास होणें, नाशकरतो,
मारतो, । जैता-विजय. । आपणपें-आपणाकडे.
२० लघुत्व-शिष्यत्व, कमीपणा, लहानपणा, जीवपणा.
मुद्दले-भांडवल, सापेक्षतेनें. । शेले-अग्रभागी, शिल्लक, श्रेष्ठ-

पदावर. । नाथीले-नसलेला, खोटा, नव्हतें तें.

२१ घनवटे-जड, गुरु, भरीव, परीपूर्ण.

२२ सावेव-साकार, प्रत्यक्ष दिसणारे, सगूण, शब्दगुणानेंयुक्त

हांव-बरोबरी, महत्वाकांक्षा.

२३ उजाळे-प्रकाशमान. । कडवसेनी-कडवशानें, प्रकाशानें.

२५ द्वैत दुणीचे-दुहेरी वस्त्र, द्वैतरूपी घडीचे.

नवचे-जात नाहीं, झांकत नाहीं.

२७ कें-कोठें, किति. । अनुमान-तर्क. । मांदो-समुह, समुदाय.

२८ लिहि-लेख, लिहिणे. । चावळो-बोलो, कांहींतरी बडबड.

वर्णन करायला.

२९ परिसरे-आश्रय करितो,प्रकार संपतात.। आविष्करे-प्रगटे.

मेचू-आवड, प्रीत.

३० अळुमाळू-किंचीत, थोडेसे. । देखे-ज्ञान, पहावें.

३१ सुये-टाकावी, घालावी. । नाडोले-फसविले, अडविले.

३२ वायबुंथी-खोटें पांघरूण, व्यर्थ उपाधि.

३३ निवर्त्य-निवारण करण्यास योग्य, निवृत्त, निरास.

३४ कै-कधीं, केव्हां. । गोचरू-भेटला, प्रत्यक्ष.

तमारी-अंधकाराचा शत्रु. । डगरू-आरोप, कीर्ती, आख्या, प्रसिद्धी, डांगोरा.

३५ उजिवडे-भासे ,प्रकाशे, प्रकाशक होते. । मावा-मायेनें, लीलेनें, प्रभावानें. । रूढे-व्यवहारांत आणिले, प्रचारांत येते.

३६ वाळीसी-टाकीसी, त्याज्य.

३७ गुढा-न कळणारा.

३९ उणें-वांचून, वीण, शिवाय. । साजणे-मैत्री, सख्य, शोभणें

भृत्यू-सेवक, भक्त.

४१ चेइलिया-जागे झाल्यावर.

४२ थळीव-अलंकार, वडी, पात्र,कोरीव काम. । बरव-शोभा.

४३ मडे-पुढें ये, मांडतो, उभा राहतो.

४४ उदो-उदय.

४५ हिरुनी-नाहीसे केलें, हरऊन टाकले.

४७ वेखासे-वाकडे, स्वभावाविरुद्ध.

४८ झोलु-पदर, झोळ. । एकुणा-एक उणा. । आतुलू-आतला कडू-बाजू,कड,कडोसरीचा. । फेडीतां-सोडीता, मोकळाकरितां बाहिरिलु-बाहेरचा.

४९ वंद्यत्व-नमस्कारास योग्य. । वंदितेनसी-वंदन करणाऱ्यासह

५० सोये-व्यवहार, सोय, अवकाश, जागा.

दशा-स्वरूप, अवस्था, स्थिति.

५१ गुणा-वात, दोरा. । पुळिका-बारीक खडा, तुकडा,वडी.

५२ मेल्हेरे-संबंध, मिळणें, संयोग. । सरे-संपतें.

सरीसेचि-लागलीच, बरोबर, एकदम.

५४ भापा-भापणानें, वर्णनानें. । उपखा-नाश, कमीपणा. व्यवहार, शीण. । फेडून-निरास करून, निवृत्त करून.

५५ दुवाळी-द्वैतसंबध. । पत्राडू-मोठेपण, ख्याती, उत्कर्प.

५८ आधारू-आश्रय. । दुर्भरु-भरावयास कठीण, पोट न भरणारा. । विरुद्ध-विरुद्धधर्माला,एकमेकाच्या उलट भावांना पाहुणेरू-आश्रय, पाहुणचार.

५९ निकें-चांगले, नेटके, बरें, मख्य.

६५ उखि-मृषा, वृथा, खोटा भास, भ्रांति.

६७ बुझे-समजे, समजून घेणाराशिष्य व समजून देणारा-गुरुहि हाच.

६९ उमसो-ठाव पाहणें, दिसो, प्रगट होणें, उठाव, स्फुरण. विसकुसो-विस्कटो, बिघाड होणें. । अतिसो-आतिशय, निकट,

संबंध, अतिशय.। पोखित–पोषण, पोशीत आहे, संवर्धन करतो
७० वरव–शोभा. । रागीव–राज्य.
७२ वारी–नाहीसें करी, नाशकरून.
७३ ओपसर–मिना (रत्नाच्याखालीं) कोंदण्याच्यावेळीं तेज वाढण्याकरिता पत्रा घालतात तो किंवा पूट देतात तो.
निखळ–स्वयंप्रकाशक, केवळ, मूळचाच. । चक्रवर्ती-सार्वभौम.
७४ सूनि-घेऊन, घालून. ।
७५ दृति-वास, सुगंध.
७६ पाठीकडून-मागलेकडून, माघारी वळून, अंतर्मुख होऊन.
धांडोळावे-शोधावे.
७७ हन-ही, अहो.
८० ऋण- कर्ज, उपकार.

---

## प्रकरण तिसरें.

ओव्यांचा क्रम.
१ बोभाटे-गलबला, व्याख्यान, श्रवण, गर्जनेनें, मनन.
आत्मयाची-जिवाची. चैतन्यात्माची. । चेणे-जागृती.
झोप लोटे-स्वरुपाचे अज्ञान जातें.
२ उपेगी-उपयोग, सहाय्यक. । वेंचती-नाहीसे होतात. संपतात
कीर-निश्चयानें, खरोखर.
४ अवधी-शेवटीं, अंतीं, मर्यादा, संधी.
५ मृतें लोहें-मृत लोखंड, भस्म झालेले. । इंधनें-सर्पण, लांकडे.
रसरुपें-रसायनरुपें, भस्मरुपें.
६ जिइये-जिवंत असतें.
८ मरोनी-अज्ञान नासूनी, वाचा नाहीशी होऊन, जीव खर्चून.
शिणलेवा-श्रम द्यावा, श्रम घेणें.

९ येऊन-झोंप आली असतां. । दिठी-अवस्था, दृष्टी.
आपणपां-आपले रुप, जागृतीस, व्यवहारिक सत्तेला.
१० गिवसी बाधितें, शोधते, आच्छादिते.
निमाली-मेल्यावर, नाहींसी झालेली.
११ जाकळी-व्यापणें, आवरण करणारी, बांधते, गुरफटते.
१२ त्राये-आश्रयस्थान, प्रतिष्ठा.
१४ नागवण-नुकसान.
१५ के-कोठें. । प्रसवो-प्रसंग, संभव, अस्तित्व, जन्म.
वावो-खोटा, मिथ्या.
१९ सबळ-आपल्यापेक्षां जास्त बळाची अपेक्षां, साह्य.
२० श्लाघतू-आनंदी होतो,मोठेपणा,प्रतिष्ठा,योग्यता,थोरवी.
धाडिले-घालविलें. । वाये-वृथा.
२१ आपणपे-आपल्याला, आपणस्वतः. । गिवसी-शोधीतो.
कीरु-निश्चय.
२२ दिया-दिवसांनीं. । रिझो-संतोष पावो-आनंदमानु.
२३ प्रमा-निश्चय, तत्वज्ञान, सिद्धी.
सोहम्-हा देह मी नव्हे, तर तो मी जो या देहादिकास अधिष्ठानरुप परमात्मा तोच मी आहे असा संकल्प.
२४ भारी-भार, ओझें, फारसे.
२६ उदासु-खिन्न, मोहरहित, वैतागून. । लेशू-विशेष, शेष, शिल्लक. । इंधनें-सर्पण, (चार देह) लांकडे.
२८ अवडळू-खडा. किंचीत, तुकडा, स्थूळरुपानें, आकारानें.
२७ कांती-पहा, खूण, रंग.
२९ ओहोळला- वाहुन जाणें. । ओल्हासा-ओलेपणाचागारवा.
३३ भारती-वाग्देवी, वाचा वैखरीं. । हन-आणखी, आणिक.

## प्रकरण चवथें

ओव्यांचा क्रम.

१ मारें-नाशानें, मारून, नाहींसे करून. । अभेदें-भेदशून्यपणें, ऐक्यरुपानें. । वावरे-संचार करी, प्रत्यय घेते, राहते. साधूनि-जिंकून, मारून, नाहींसि करुन, संपून गेल्यावर. जागरें-जागेपणानें.

२ दर्पणाचा निघाला-आरशांत दिसून न आलेला.

३ सुरीया-सुरीला.

४ लावी-आंतून कडी घाली, लाऊन घेतो. । ठावूनी-राहोन, बसून. । कोपट-घर, झोंपडी, खोंपट. साधी-सांपडवी, धरला जातो.

५ पोतास-कापराच्या, भुत्याच्या हातांतील पोत.

६ अज्ञानाचा टेका-दृश्याचा आश्रय, अज्ञानाचा आधार. फांके-वाढते, विस्तार पावते. । उफका-नाश.

७ दशा-वात. । उवाया-उत्कर्ष, परिणाम, विकास, मोठेपणा.

८ कुच-स्तन. । जाऊळाचें-जाईच्याफूलाचे.

९ निमणें-नाहींसे होणें, मरणें, लयपावणें, अदृश्य होणें. उदैजणें-उदय, चमकणें.

१० निधन-मृत्यू, नाश.

११ अरौते-अल्पसे, अलीकडे, शिवाय.

१४ उवाया-उत्कर्षाला येते.

१५ पुनिवा-पौर्णिमा. । आवसा-अमावास्या. सतरावी-पोर्णिमेच्या पंधरा, सोळावी आमावास्याची व सत्रावी कळा. चंद्राचामूळ देह, जो सोळा कलाविरहित असतो तो.

१६ तेजांतरे-दुसऱ्याच्या तेजानें. (चंद्रतारकादिकांच्या)

शिपे-झांके. । जाऊपें-जोडीदार.

१७ रुळे-मळे, झांके, मलीन होईल. । निर्वाळे-केवळ शुद्ध.

१९ वळघें-चढे, वरघे.

२१ विवळे-दिमला, उदय होतो, प्रकाशतो.

घेपतअसे-घेतां येईल काय ?

२३ सोये-व्यवहार, स्थिति, सज्ञा.

२६ प्रथा-प्रत्यय, अनुभव, प्रख्याती, प्रतीती.

२९ आलेपणें-येण्यानें.

३२ विखो-विषय.

३३ निरंजनी-निर्जर वनांत. । निदेला-निजलेला,

निमाला-असत नाही.

३५ दिठी-दृष्टी. । फुडे-खरें, चांगलेपणें, स्पष्ट.

३६ चोजवे-समजे, जाणणें, ओळखतो, कळतो,

काळवखा-काळोख, अंधारांत. । आसिका-सगळा, संपूर्ण. ।

बाणें-समजे, पक्के कळे, निश्चित, खात्रीनें.

३७ मानुसवाणे-मानण्यासारखें, प्रमाणाला येण्यासारखें. ।

ठाय ठावो-परिपूर्ण, जथें आहे तेथें, जसा आहे तसा.

३८ संच-समुदाय, आकार, संच । पुढिला-अन्याला, दुसऱ्याला

३९ आंगीकीं--अंगाच्या. । पोखरणो-विहीर, पुष्करणी, हौद.

हारतलिया-आटलिया, हारपल्यास, दिसेनासे झाल्यास. ।

आणिकावांचून-उपाधी वांचून.

४० भागू-भागला, वाटयाची स्थिति.

४२ आपजे-वाढे, होतो.

४३ चांग-उत्तम, शुद्ध, निवळ.

## प्रकरण पांचवें.

ओव्यांचा क्रम.

१ सत्ता-असणेंपण, अस्तित्व. । सुख-आनंदमात्र. ।
उणें-विरहित. । लेख-समज, जाण. । विख-विष.
२ द्राव-पातळपण. । पीयूख-अमृत.
३ उजाळ-उजळ, पांढरें, स्वच्छपणा. । दृती-सुगंध.
मार्दव-मऊपणा. । सावेव-सावयव, समग्र, मूर्तिमंत.
४ मवाळ-मऊ.
५ आटणी-विचार, समावेश.
७ उल्हासू-आनंद. । मिठांशु-मिठांश, गोडी, माधुर्य.
अमृती-अमृतांत.
९ थेंबा धरू ये लेख-थेंब मोजतां येतात, गणना.
लेख-मोजणें, गणना.
१० व्यावृत्ति-निरास, निषेध करण्यासाठीं.
समाप्ति-शेवट, अंत नाश.
११ निगदिलें-बोलीजेले, सांगितलें, बोलिलें, म्हटलें.
निश्वासें-वेदे, भगवंताच्या निद्रेंतील श्वासापासून झालेलें वेद.
१२ प्रतियोगीयें-प्रतिकुळे, विरुद्ध असणारी, बाधक. प्रतिपक्षी.
लोटितां-निरास करितां, निरसितां, नाहींसे-दूरकरतां. करतां.
त्रायें-जोर प्रतिष्ठा, किंमत आली.
१३ वाचक नव्हे-नांव नव्हे, दर्शक किंवा पर्याय शब्द नाहीं.
वाचक-दर्शक.
१४ गिवसें-प्रकाशे, प्रकाशला जाईल, सांपडतो.
१५ सुजे-सुचे, समजते. । वाचा-वाचेनें, वाचेकडून.
१६ प्रमेयत्व-विषयत्व, दुसऱ्याकडून जाणला जाणारा
ज्याच्याविषयीं सिद्धांत करावयाचा तो भाव.

१७ परिच्छेदें-वेगळपण, एकदेशित्वामुळें.
प्रमाणत्व-उपमा प्रमाणपणा.
१८ जाणणे–जाणण्याचा विषय, वस्तूचे ज्ञान करून घेणें
जाणता-ज्ञाता, प्रमाता, जाणणारा.
१९ शेष-सारांश, विचारांत शेवट, निष्कर्ष, तात्पर्य.
२० द्रष्टया-आत्मा, पहाणाराला.
स्वसंवादें-स्वतःला अपरोक्षत्वे, करून जाणतांना, ऐक्यतेनें.
२२ पाके-वाढे, निष्पत्तीनें.
उपखे–नाहीं होय, नाहींसा होतो, संपतो, उपशम पावतो.
२४ चेववूनी-जागे करून. । चेववितें-जागें करणारा.
२६ साऊलीवरी-सावलीनें, छायेच्या आधारें.
नमववे-मोजतां येत नाहीं. । मवितें — मोजणारा.
आखुडे–आखुडतो, सोडून देतो.
२९ अचिद्-अज्ञान, जडाच्या. । दशे—स्थितिला.
चिन्मात्री—ज्ञानमात्र, प्रकाशमात्र, जडता नाही त्या चिन्मा-
त्राला ते चिन्मात्र आहे, हे म्हणणें कैसें?
३० प्रबोध—जागृती, प्रकर्षण बोध.
३१ कीर–खरोखर, निश्चये करून.
३३ लवंचक—उभारणी,किंचित्,पोकळपणा,निरर्थक,लवचिक
दुणीचे कंचुक–वस्त्र, दुहेरी वस्त्र, अंगरखा, प्रावर्ण, द्वैताचें
आच्छादन.
३५ निघणें-वेगळें होणें, जाणे, बाहेर येणें.
३६ प्रकृती-देवी. । डंकू-नगारा, डाका, चर्मवाद्य.
अनुकरे–वाजवी, अनुकरण. । अवतरें-वारें अंगांत येतें.
३९ उजरिया–युक्त्या, प्रगटपणा, उदय, उत्कर्ष. ।
निदसुरिया-झोपेतील बरळणें, अज्ञानांतील माईक.
४० मिठांशु–गोडी.

४१ सज्जितां-तयार करितां, वाजवितां.।

अवोलणा–अव्ययवत, न उमटलेला.

४२ पुष्पसारा–पराग, परिमळ, सुगंध. भंवरा-भ्रमर, भुंगा.

४३ रससोय-स्वयंपाक, रसोई, पक्वान्न.

४४ चाखों-सेवन, चव.। सुवों-देवो, देणें, घालो.

४६ अंगनुठी-देह उत्पन्न न होतां.

४७ मकरध्वज-काम, मदनानें.। हन-आणिक, जरी.

माजे—उद्भवला, मस्त झाला.

४९ वोसरलिया-वोहटलिया, विझाल्या, नाहींसा केल्यावर, मागें सरल्यावर.। अनळा-अग्नी.। विटाळा-संबंधा, स्पर्शापासून

५० नेमें–जरूरी, साह्य.। वर्मती–वर्म जाणतील, जाणतात. वर्मती येणें–जाणती, खुणेला पावती.। वर्म-रहस्य, इंगित.

५१ मुडा—धान्य ठेवण्यास पेंढयाचा गोळ करितात तो, कणीग, कोठार.। सोई—रीतीनें, प्रकारानें.

५२ नातळे-लिप्त होत नाहीं, प्राप्त होत नाहीं, स्पर्श करीत नाहीं.

५३ शहाणें-जाणणें, शहाणपणाचे.। निपटणें-मौनाचे मौन, निःशेषत, पूर्णत्व.। पिऊनि गेले-नाहीसे झाले, पूर्णत्वानें पान होऊन गेलेले आहे.

५४ वाईली-वाहिली, घेतली. । दिसावयाची-कळावयाची, पुढें येण्याची.

५५ अनुपपत्ती-अंगची नाहीं, अयुक्त. अगम्यता, अयोग्यतेनें. उपपत्ती-युक्ती, दृष्टांत.। पाती- पंगत, पंक्ती.

लक्षणाची-जहद्‌दादी लक्षणाचा, वाच्यार्थाहून निराळापण तत्संबद्ध अर्थ.

५६ उपाय-साधनें.। वाये-व्यर्थ, निरुपयोगी.

५७ सुभटू-चांगला योद्धा-

५८ थोटावला-निर्वळ होणें, हात टेकणें, लंगडा, लुलाझाला. साधुनी-करून घेऊन. । नसुधेपणें-केवळ एक ज्ञानमात्र.

५९ भिंगा-अभ्रक. । चडळा-सबंध तुकडा, वाटोळा तुकडा. पुंज-पुंजका. समुदाय, रास. । निफळा-नाहींसा, नाहींसा होय, चुरा, नाश.

६० उबा-उबाऱ्यानें, उकडण्यानें. । गजबजिला-घाबरा झाला. पांघुरणें-सोपटें, वेष्टने.

६१ अनुभाव्य-त्रिपुटी, अनुभवण्याची वस्तू, ज्याचा अनुभव घ्यावयाचा ते. । अनुभविक-अनुभावणारा.
अनूभूतिक-अनुभव.

६२ अनवसरी-समाप्ती, जागा, अभाव, नाश. । हारी-ओळ. वाईल-प्रवेश, चालेल, कार्य करील, दाखविल.

६३ सळु-अंकूर, न्यूनत्व, किंचित्, उर्मी, उसळी.
वावरिजेल-वापरतां येईल, बोलता येईल, व्यवहारिजे, उच्चारवेल.

६४ धाला-तृप्त झालेला. । रंधन-पाकक्रिया, स्वयंपाक.

६५ सेजेयेती- निःस्तेजत्व, तेजोहीन होतात. । दिवसपति-सूर्य सुइजजाति-घातले जातात, शिरकवतात, घालतात.

६६ व्याज-निमित्त. । काज-कार्य, काम, काम करणारा.
भोज-आवड, कौतुक, आदर, महत्व. । वोळगे-प्राप्तहोणें,येईल

६७ आपणापे-आपल्यासी, स्वतःला.

६८ परौतें-पलीकडे, अधिक. । चांगावें-उत्तमत्व, चांगुलपणा.

---

## प्रकरण सहावें.

ओव्यांचा क्रम.

१ बाप-शाबास, बहाद्दर, अहो. । उपेगी-उपयोगी.

अमूर्ताचा-अव्यक्ताचा, निराकाराचा.

विशद्-स्पष्ट, बोधकरून दाखविणारा.

२ पाहते-डोळस, मनुष्य, ज्ञानी. । न पहाते-आंधळे, अज्ञानी.

३ वडीला-सर्वांच्या आधींचा. । अव्यक्त-प्रकृति, माया, ब्रम्ह.

उद्यत्कारू-कुलदीपक,उदयकर्ता, प्रकाशक. । येकेगुणें-शब्दामुळें

वंशा-वंशाला,विस्तारास, महत्वादिकाला.

४ खपुष्प–आकाशाचें फूल, अविद्यामान वस्तु.

जगद्रुप-जगायेवढें, जगद्बोध. । अमुप-न मोजतां येण्याजोगें.

मविते-मोजणारा, मोजणें.

५ दिवटा-मशालजी, प्रकाश. । कळिकटा-भांडण, भांडखोर, कलह लावणारा. तंटा लावणारा.

शिष्ट-संभावित, न्यायाधीश, समेट करणारा.

६ आंगिपडे–साह्य करी, पक्ष घेतो. । नाथिले-नसलेला,खोटें

रूढे–व्यवहारांत आणतो. । वस्तू-परब्रम्ह.

७ कुमारु-चिरंजीव, कुमरू. । जिऊभरीं-जीवित्व आणतो, भरवितो. । पंचाक्षरीं–मांत्रिक.

८ बांधला-मी म्हणूं लागला, देहतादात्म्याला पावला.

आपणया-आपल्या स्वतःला.

९ द्रोहो-विरोध, वैर.

११ गोमटे–चांगुलपणा. । उपयोगा–उपयोग.

१३ न वचे–नसतो. । कांहींच–कोणत्याही प्रकारचा.

स्वसंवेद्या–त्रिकालज्ञानरूप जो आत्मा, आपले स्वरूप आपणच जाणणारा. । ओझें–भार.

१४ विषो होवोनी–दृश्य होवोनी, विषय बनून.

१५ केउते–कसे.

१८ स्मारके–स्मरण करून देणारे, करविणारे.

१९ कीरू–निश्चयात्मक. । धिवसा–धैर्य.

२० खेवो–तत्क्षणीं, लगेच, बरोबर. । पिसें–वेडेपण.

२१ उदो–उदय. । कुडे–कुटील, वेडगळपणाचे, खोटे. । सरती–चालतील. । साचा–सत्याच्या, खरें, सूज्ञाच्या.

२२ चेणें–जागे होणें, जागवणें.

२३ रिगे-प्रवेशणें. । निरुती-विचाराअंतीं, निश्चयानें, खरोखर

२४ जाउपे-संतती, लेंकरूं, पोर. । खुरपे-शस्त्र, सुरी, खुरप्यानें खांडे-तोडी, छेदीं. निरास करणें, खांडोळी.

२५ सिते-दोरी, धनुष्याची दोरी. । धनवई-धनुर्धारी पुरुष, धनुष्य धारण करणारा. । घालिजेने-घालणारा, चढविणारा.

२७ वळघी-चाल, हल्ला, वेग, चढाई, पराक्रम.

२९ सोसु-सोस, हाव, उद्योग, खटपट; श्रम. । उद्वसु—व्यर्थ, ओस. । उद्यमू-उद्योग, खटपट.

३० जेणेंपाड-जितक्या मानानें.

३१ अविद्याकाळीं-अविद्या भासत असते तेवेळीं सुद्धां नसते. । सतुकें- खरी, सत्य, आहे.

३२ आतुडलिया-प्राप्त झालें तर. । वोडंबरीचिया-गारुड्याच्या जादु भरलेले, मंत्रानें उत्पन्न झालेल्या.

३३ आनु-अन्य, दुसरें. । आरोगिजनु-खाल्ले, सेवन केले. । परियळ-मांडे ( एक प्रकारचे पक्वान्न ) खाण्याचे पदार्थ.

३४ उमंडे-आसते, दिसते. । नुमंडे-नसते, दिसत नाहीं. । वोल्हांसु-ओलावा.

३५ वोल्हावतु-भिजवोत, उल्हासित, आनंदीत. । अगरा-शेत

३६ मशी-शाई, काजळ. । वोरबारे-श्रमानें, खटपटीनें.

३७ टवाळें-मिथ्यत्व, मिथ्याभास जग.

३८ विद्यमान-अस्तित्वांत असलेले. । अविद्या-जी असत नाहीतीं

३९ अनिर्वाच्यपण-शब्दानें न सांगतां येणे, ते सत नाहीं व असत नाहीं असे मत. । साधीतसे-सिद्ध करिते. । देवांगण-शपथ,प्रतिज्ञा,गंधर्वनगर.

४० भोये-भूमि. जमीन. । अंकित-चिन्हित, खूण झालेली.

४१ प्रमा-निश्चय, प्रमाण, अनुभव, प्रत्यय,

४२ मायावी-खोटी, अघटित सामर्थ्याची.

४३ आपैशी-स्वभावता, स्वतंत्र. । बोलू-शब्द. हातवसी-हात उगारणें.

४४ साबळे-भालानामक शस्त्राचें लोखंडी फाळ, तलवार,पहार हालया-हाणितलिया. । भोय-जमीन. । थोटावें-हिसडतो. अंतराळे-आकाश.

४५ पानी-पिण्यांत, पानकरण्यासाठीं.

४६ बोथरे-ढिला पडे, जलदीनें, जिरतो. । तवका-आवेश, तयारी, अवसान. । सुनाथा-व्यर्थ, दीनत्राणा. असिका-सर्व, सगळा, संपूर्ण. । तर्का-कल्पना, युक्ति, अनुमान.

४८ वास-सोय, मार्ग, वाट, ठिकाण. । काचरी- त्राळलेली, बारीक फोड. । दोहावी- दूध काढण्याचा प्रयत्न करावा.

४९ मोदळा-शिररहीत देह, धड, मातीचा गोळा.

५० उलथू-फिरवो, उलथण्याची. । ताथू-दोरे.

५१ खोळे-ओटींत, पोटांत, पदरांत.

५३ परणू-लग्न लावणें, विवाह करूं.

५७ युक्ति-युक्ति प्रयुक्तींनें, शाब्दिक रचना.

५८ परौती-पलीकडे, शिवाय. । सवंगणी-कापणी काढणें.

५९ खवगी-आकाश.।त्रळवा-त्रेडग,चडगें,मिठी,वेढा, आश्रय.

६० वरखु-वृष्टी विशेखु-उपयोग, विशेष आहे काय? । उन्मेखु-ज्ञान, शब्द, वृद्धि. । फाकावा-विकास, विस्तृत-होणे म्ह. यांचा नाश पावणें

६१ पाहतां–उजेडतां, पाहण्याचा. । मऊं–मौजावयास.
श्लाघे–महत्व पावे, चालतें, शोभतें.

६२ रस सोये–स्वैम्पाक, खाण्याचा पदार्थ, चवीचा प्रकार, रसास्वाद. । आरोंगु–चाखू, भक्षू, सेऊं, खाऊं.

६३ आहेवपण–सौभाग्यपण. । नवतेनि–नसलेल्या, नसतांना.

६४ अप्रयोजिकु–निरुपयोगी.

६५ फवे–दिसे, आटोक्यांत.
चेताते-न संभवे, जागृत, जागृतीत दृष्टीनें निद्रा पहाणे शक्य नाहीं.

६६ गिवसू–शोधीत, पाहूं. । दिहाची–दिवसाची.

६७ साच्या–कागद, नमुना, पुस्तक. पेंधा–पांगळा.
वाचरुकाचा–वाचणाराचा, कुशल धडघड वाचणारा.
नुसधीयेचि–कोऱ्या, ठसा, कोरें पुस्तक. नुसता.
अंतराळी–पोकळी, आकाशांत, अधांतरी.

६८ जल्पे–शब्द, वाक्यें, वडबड.
सिद्धचिप्रति सेदके-तयार असलेली निरासाचे प्रतिपादनकरणारी वचने, निषेध करणारी.

७० निफजतेन–तयार असलेल्या, निपजलेली, उत्पन्न झालेली.

७२ कीर-निश्चयानें, खरोखर, मुळींच नाहीं.

७३ मोहरा–मोर्चा, सन्मुख. । विचारा-शब्दाच्या विचारा.
संसारा-नाश.

७५ महिमया–मोठेपणाला. । साचिया-प्रस्तुत, स्वभावत:, सर्वप्रकारे.

७७ आपणया-आपल्यांत, स्वत:कडे. । रिघे-शिरेल काय?
वळंघे-चढेल.

८२ ठाकी-सोय, योग्यता.

८४ रावी-रंगवि, रंग दिला.

८५ कें-कोठें, कोणाच्या ठिकाणीं.

८६ वाऊ-धारण करतां, वाहतां.

८८ दुवाड-कठीण, दुर्घट.

९२ ठेले-नाहीसे झाले, थांवलें, बंद झाले.

संचले-पूर्ण भरलेलें, ओतप्रोत बनलेले.

९५ उमसू-समज, मानणें, उर्मी, उठाव.

९६ घाडीना-घालवित नाहीं.

९८ न लाहोनी नखी-शब्दास कांही परिणाम न झाल्यामुळें, शब्दास किंचितही आधार न मिळाल्यानें, लाग न लागल्यामुळें;

१०१ जल्पे-शब्द, वाक्य, बडबड.

सपडपे-इतमामासह, परिवार सहित.

---

## प्रकरण सातवें.

ओव्यांचा क्रम.

१ क्षोभना-विशेषत्वास येणें, स्फुरण, अस्तित्व.

दडे-लपे, अज्ञानशब्द कानावरसुद्धां ऐकू येत नाहीं.

२ आडमूनि-आश्रय करून, लपून, आडोसा. । खद्योत-काजवा.

सिरीं-डोक्यावर, आश्रयकरून मिरवी, दाखवी.

३ गरिमा-मोठेपणा, महत्व.

४ कोल्हेरीचे-कुंभाराचे मातींचे चित्रांतील.

असिवारूं-घोडे. । धारकी-मंडलावर. युद्धाला.

ओडंबरी-गारुड्याच्या मंत्रानें केलेले दागिनें.

५ आन-दुसरे, निराळेपणानें.

चादिणा-चांदण्यांत, चंद्रप्रकाशांमध्यें.

७ धांडोळा-शोध.

८ जिते-जिवंत.

९ नेण-मूर्ख, अज्ञानी, अजाणरूप.

१० गिवसे-झाकला जाई, अच्छादित होतो, आवृत्त होतो.

११ नुठितां-न उत्पन्न होतां. । दुजे-भेद, द्वैत, दुसरे. बुझे-समजे, ज्ञान.

१२ निरुते-खरें पाहिले असतां, वास्तविक, निश्चयानें,खात्रीने.

१३ म्हणतखेव-म्हणतां क्षणींच, लागलीच.

१६ आभाळें-ढगानें, मेघानें, अभ्रानें. । सुषुप्ती-गाढ निद्रा, झोंप. । रुसे-रुसली.

१७ आते-होते, बनलें.

१८ फुडे-निश्चयानें, स्पष्ट.

१९ पडळ-पडदा, सारा, वडस. । आथी-आहे.

२१ पडसाई-काळोख.

२२ ओजावोनेदी-शुद्धि नाहींशी करीत नाहीं, हांकेला ओ देत आहे.

२३ असिके-सर्व, सगळा, संपूर्ण.

२६ युग्मे-जोड्या, जोडपें.

३० बाधे-मिथ्या ठरतें, नाशपावते, बाधित होते.

३२ दुलाकुडपण सांडिले-एकावर एकदोन लाकडें घासली असतां त्यांचें दोनीपण नाहींसें होतें.

३६ जिव्हाळी-जिवंत, सजीव.

३७ बायसे-व्यर्थ, भलतेच.

३९ दिहाभेण-दिवसाच्या भीतीनें. । महुरे-मोर्च्या फिरविला.

४१ कार्यानुमेय-अज्ञानाचे कार्यजगत त्याच्यावरून अनुमानानें-कार्यावरून कळणारें. । धांडोळू-शोधू.

४२ घेणी- गृहणसिद्धि. । करणी-कार्य.

४३ वेल्हाळ-विस्तरलेलें, विस्तृत.

४४ जाउपे-पोर, मूल, कार्य.

४५ तिमिर-अंधकार, दृष्टिदोष. । दुणा-दुप्पट, दोनपणानें.

४६ प्रमाता-ज्ञाता, जीव, । प्रमेय-विषय.

प्रमाण-ज्ञान.

४७ आनु-दुसरें, संशय, शंका.

४८ करणे-कार्य.

५०. हालया-हाणितलया, शूळानें स्वत:लाच शुळावर घेतले! किंवा दिले!

५३ विशेषु-अंतर फरक.

५४ उखी-खोटें, व्यर्थ.

५५ भाजन-पात्र, योग्य.

५६ विये—उत्पन्न करी. । बिहे—भीते.

५७ ठायेंठाउ-जागच्या जागीं.

५९ अवस्थान-लीनरूपानें असणें, राहणें. अस्तित्व.

हुताशन-अग्नि. । मंथन-घुसळणें, घर्षण.

६० बरव-स्वरूप शोभा. । हाव-संबंध.

६१ फेडीजे-सांडावी, झाडावी. नुगवतीया-न उगवलेला.

वाळीजे-निषेधी, वर्ज्य करावी काय? । रुखाची-वृक्षाची.

६२ नुठिता-न जन्मलेला, उत्पन्न झाली नसतां.

चिकसा-अंगास लावण्याची उटणी, शिकेकाई.

उटीजे-पुसून स्वच्छ करणें.

६३ वोहाच्या-कासेंतील. । पवाडू-बुद्धि, कौशल्य, प्रयत्न.

६४ ठाऊ-जागा, आश्रय, ठाव.

६६ नातळे-लिप्त होत नाहीं, न स्पर्शे.

६७ शतचूर्ण-शंभर तुकडे, चुरा, भुगा.

६८ कुपी-विहीर.

६९ आसुगेला-फडकाविला, ओढला मेला.

७० निवटिलिया-मेलेल्यास. । नुठिला-न काढलेला, न लिहिलेला, न उमटलेला. । लेख-अक्षर. । सुदले-खावयासि घातले, वाढलें,

वा. क्र.

७१ टवाळ-मिथ्या.

७२ विये-प्रसूत होईल. । विरुढती-उगवती, अंकुराला येतील कां? वियें-वी.

७३ चोखडा-चांगला, शुद्ध.

७५ झडती-झटकन, त्वरेनें. । थीती-स्थित असलेली.

७६ आपैसे-स्वभावता, सहजच.

७७ भाव-आस्तित्व. । उजरी-उदय, शोभा, प्रकाश, प्रगटपणा परीं-प्रकारानें, तऱ्हेनें.

७९ निर्धार-निश्चय. । न माखे-माखूं शकत नाहीं, पुरत नाहीं. । निरुती-तत्वता, खरोखर सत्य. । अनसाईपणा-दोहों पैकीं कोणत्याही एका प्रकारानें असण्याचा धर्म पुढें येऊं शकत नाहीं.

८० बागू-भाग, विचार, संकल्प, लागू.

८१ निर्वाळली-केवळ, शुद्ध, शोभिवंत केलेली.

शशविषाण-सशाचे शिंग.

८२ गगनौल-आकाशपुष्प, आकाशकमळ. । घापती-घातल्या.

८४ वतवतुपा-वटवट करूं, वल्गना करावी.

८५ नुमसू-मागमूस घेत नाहीं, उच्चारणार नाहीं.

निदसुरे-खोटें, व्यर्थ, अज्ञानशब्द झोंतही बोलवत नाहीं.

८७ दृश्य-जग. । फुडे-चांगलेपणें, निश्चयपूर्वक, स्पष्ट.

८८ सांकडे-संकट.

९१ अपाडे-फार. पुष्कळ. । साजी-टवटवीत ताजी.

९२ नढळे-खास, चुकत नाहीं, सिद्ध होते.

९४ चोख-शुद्ध, स्वच्छ, चोखट, निर्विषय.

९५ केउतें-कसें. । दिवो-दिवस, प्रकाश.

९६ उजळ-स्वच्छ, चकचकित, लखलखित, उज्वळ. । राविले-रंगविली, प्रकाशित केली.

९७ निफजा-घडवी, निपजविल, करील. । वाहणी-रीत, प्रकार, मार्ग.

९८ अंमा-अमावास्या.

९९ वोरसोनी-मोठ्या प्रेमानें, पान्हाऊन. । दुभें-दूध देईल.

१०२ देवांगण-देवाच्या दारांत उभे राहून शपथ घेणें, गंधर्वनगरे.

१०४ हरतलेपण-नाहींपण, शून्यपण, नसणेंपण, अभाव.

१०५ कुटी-आरोप, दोष, आळ. । पाठीदिधलीं-विन्मुख झाला पाठ दिली, सहन केले, नाहीं म्हटले नाहीं.

१९६ निमाली-नाहींशी झाली, गाढ, लय पावलेली. । चुके-नाहीं असा ठरे, चुकावा काय? । दृश्य-जग, विषय. । योयीन ठके —दृश्याच्या स्थितीला येत नाहीं, आश्रय घेत नाहीं, तो दृश्य केव्हांच होत नाहीं.

१०८ ठाये-कुंठीत होई, राहते.

१०९ पोटाळी-मिठी मारी, पोटाशीं धरी, कवटाळतो. गाळी-सोडी, वगळतो.

११० बोध्दया जाणावयाच्या विषयाला, पदार्थाला. सोके-सवकलेली. । निके-चांगले, मैत्री, उत्तम, विनचूक.

१११ बरडीं-माळरान, खडकाळ, जमीन.
गोडी-आत्मस्वरूपाची गोडी.
नघेपती-ग्रहण करतां येत नाहीं, चव घेऊं शकत नाहीं.

११२ सकट-संपूर्ण, सह, सुद्धां.
फावेल का-कशी अनुभवास येईल,कशी सांपडेल.

११४ पुढासुनी-पुढें करून. । वासिपें-भिऊन नाहींसी होते, मिथ्या होते.

११५ भूक-इच्छा, क्षुधा.

न वाणे-अनुभवाला येत नाहीं, तृप्त होत नाहीं.

११६ सवडे-पडतें, सवडतें. । निर्णो-निर्णय, निश्चय.

मुनाथा-व्यर्थ,मुना. । वादी :कोडे-वादीचें कोडे, खेळांतिल एक कूट.

११७ निर्धारिली-मोजून, निश्चित केली.

फाकावली-भकली, फांकली, श्रमपावली.

११८ टणकोनि–आवेशानें, खटपट करून.

व्यवस्था-वर्णन, संगती, मत, मोजदाद, निश्चयपूर्वक सिद्धांत मांडतो.

११९ संसार–प्रवेश, व्यवहार. । बीजे–दुसरे,बीज,मूळ,कारण

१२० अचक्षुपण-चक्षुरहित स्थिति, आंधळेपणा.

फिटोनी-जावोन, नाहीसे होऊन, दूर होऊन.

१२१ उमसो-प्रगट होऊन.

१२२ फुरे-उत्पन्न होई.

१२४ तळवटी-बुडासी,तळापासून वर, आधारावर.

१२५ रिद्धि-ऐश्वर्य, दर्शन, संपत्ती, सामर्थ्य.

चित्शेपु- चैतन्याचा एक अंश.

मातला-शोभित झाला, माजला, वाढला.

१२६ नीच–नित्य. । मदवी-वस्त्रें. । करवी–कडून.

वेढवी-नेसून, वेढून नेसून घ्यावयास लावते.

१२७ पारसी–शिळी, पारसी पारोसे.

१२९ शेष-सर्वांच्या निरासाअंती राहिले ते शिल्लक.

कास घातली-संकल्प केला, कवर कसली, इच्छा केली.

३० तोंडावरी-स्वरूपीं, तोंडापर्यन्त, काठोकाठ, भरपूर.

१३१ मिठी-नाहीसे होणें.

१३२ तोखे—समाधान पावे, आनंद पावते,

दिठी-चैतन्य. । दाटे-भरे, दाटून राहते.

मोटके-मोजकीं, नेमके, अल्प, जरासे.

१३३ सूत-व्यवस्था, सूत्र, दोरा, धागा.

१३४ पाडे-सारखे, त्या प्रमाणेंच.

१३५ कल्लोळ-लाट, तरंग. । मिस-निमित्यानें, मिषानें.

आपणपें वेल्हावे- आपण स्वतः आपल्याच अंगावर उसळून प्रशस्तपणें क्रिडा करते. त्याप्रमाणें.

१३६ आहाळा-होरपळणें, रचना, बांध, स्वरूप, आराखडा.

१३८ केवळपणी-एकटेपणांत, केवळ, एकरूपतेत.

१४० बाहिया-हात,बाहु. ।एकोत्तरावा-एकअधिक अनुक्रमांचा

१४१ वोजा-व्यवस्थित, शोभेला, सजावटी करितां.

पुंजा-समुदाय, राशी. । सोकट—भाग, वस्त्राच्या काठांच्या

१४२ कोडीवरी-कोटयावधि. । मेळावा-समुदाय.

मिनला-मिळाला, योग्य जाहला, जमला.

१४३ डाळखे-नग, डाग, मासले, फाटे, डाहाळ्या.

वेगळे-भिन्न, शिवाय वेगवेगळे. । उमाळे-उठाव, उसळी, लोट, उद्भव. । लेखा-मोजणीला, गणतीला, गणती करण्या इतके असंख्य.

१४४ बांधा-ढेप भली.।मोडीचा धांदा-फुटण्याचा व्यवहार,धंदा

१४५ नव्हे विखो – विषय होत नाहीं.

१४६ रेखा – रेघ. । अशेखा-सर्व, अखिल, संपूर्ण.

१४७ दुबंधी-गंगाजमनी, दोनप्रकारच्या रंगाच्या.

क्षीरोदकी-दुधासारखें पांढरे, रेशमी वस्त्रामध्यें.

वाणे-कापडाचे प्रकार, वाण, रंग, तऱ्हा.

१४८ पातयाची-पाहण्याची. पापण्याची.

१४९ वटू असिका–संपूर्ण वडाचे झाड. । असिका-समग्र.
अद्वैत फांका–अद्वैत आत्मवस्तूच्या विस्ताराला.
१५० विसवे–विसावा घेते, विश्रांति घेतो.
शेजे-बिछान्यावर, अंथरूणावर. । हाव–इच्छा, उत्कंठा.
१५२ आपणपें-आपल्याच ठिकाणीं. । कां-अथवा, किंवा.
सुधाकरू-चंद्र, नुदैलया-उगवला नसता, उदय नसतांनाच.
१५३ सतराबी-सोळा कळचाचा क्षय करून सतरावा,
चंद्राचा मूळ देह.
१५४ जिणतां-जिकले असतां. । जैता-जिंकणारा.
कुटे-आरोप, आळ, निंदास्पद भाषण. । वावटे-स्थिति, मिथ्या,
विश्रांति घेतो, उपरम पावतो. । आपणपेया-स्व अंगाचे ठायीं.
१५७ देखणें-दृष्टा. आत्मस्वरुपाचे ठिकाणीं दृश्यपणा व
दृष्टपणाही अनादीच आहे.
१५९ उजीवडे-विकास, प्रगट होते.
१६१ मखे – माखें, भरे, लेप केला.
१६३ देशांतरे – नगरें अन्यदेश. । प्रकाशशून्य – कल्पनाकरून
१६४ दाटला – दाबला, भरून राहिला, स्थिर केला.
डोळचि तारा – चित्रविचित्र तारे, नक्षत्र, डोळयांतील बाहुली,
चमका, तेज, दृष्ठी. । विस्मो-आश्चर्य.
१६६ आपजवी-उत्पन्न करील काय? । कीळेचे – तेजाचें.
जोडजोडू-कमावून, सोन्याला सोनेंपण, दुसऱ्या कोणी जोडून
द्यावे लागते काय?
१६७ वेढी – चंदनाला सुगंध बाहेरून आणून वेढावा लागतो
काय!
१६८ ताबुनी-तापवून, ताव, आच. । कीळ–तेज-
१७० उभळा-उभारलेला, उभाऱ्यानें. उत्कर्षानें.[1]
संचला-भरला, व्यापला. । गिवसला–चिद्रूपस्फरानें.

१७१ करावे येणेंविण- 'करावें' अशा संकल्पाशिवाय.
१७३ पावे- करणें प्राप्त होईल, । आईता-स्वाभाविक,मूळचाच
१७६ भलतेथ—वाटेल तेथें. । भलतेव्हां-वाटेल त्यावेळीं.
माझारिले—मधले, मध्यंतरी असलेले, अंगिकारलेले.
१७७ पोतासू-कापूर, पोत. । संसरिसु—एकदम, बरोबरच.
वेचू-नाश.
१७८ वेचला-वजा, उणा केला.
निमाला—निराश झाला, लय झाला.
१८० दृष्टी—दर्शन.
रुसता-नाहींसें होणें,रुसलें असतां; हे दर्शन नको असें वाटत असतां.
१८१ पूर्वापार—पूर्वपश्चिम समुद्र.
१८२ ठी-स्मरण, निश्चय. नांव.
१८३ गिळी-नाहींसे करी. । उगळी-प्रगट करी, ओकी.
निर्विशिष्ट—सामान्य आत्म्यास. विशेष भाव रहित शुद्ध,
झापी-झाकी, मिटते. । विशेष-दृष्टा व दृश्य या दोनी भावाचा विशेष भाव.
१८४ सैंध-सर्वत्र, एकदम, चोहोंकडे, विस्तृत.
पघळे—फैलावते, पसरते. । उन्मीळता-दृष्टि उघडली असतां.
नवलावो—आश्चर्य, नवल.
१८५-मध्येंलेखू-दृश्य आणि दृष्टा यामधील संधिप्रकाश.
स्थिति—अवकाश । समज-ज्ञान.। वाजे-प्रकट होते,आदळते, येते.
योगभूमिका-स्वरूपस्थिति, ऐश्वर्य, सामर्थ्याचा भाव.
१८६ तरंग—लाट. । आनू-दुसरा, अल्प.
नुमसे-उमटला, उठला नाहीं.
१८७ नाहीं चेइली-पूर्ण जागृति आली नाही.
१८८ पैठी-बसली, स्थापन झाली, स्थापित.

दिठीसुता-पहिले तर दृष्टि ठेविली असतां. एका पदार्थावरून उठली व दुसऱ्या पदार्थावर गेली नाहीं. त्या दरम्यान विषय रहित दृष्टीची कल्पना.

१८९ मावळोसरला-मावळला. । प्रस्तावो-सुरवात, आरंभ, सुरू होणें.

१९० घापता-टाकावयाचा, बाहेर सोडावयाचा.

शिवतला-शिवला,

१९१ करणी-सर्व इंद्रियें.

१९२ निकराचा-शेवटला प्रशांत, निर्विषय.

१९५ उदो-उदय.

१९८ आपसया-आपण स्वतः. आपोआप, सहजच.

२०० येरे येरे-एकमेकांनीं, एकमेकांस, एकानें दुसऱ्यांस.

२०१ सोयं-दाद, व्यवहार, मार्ग, स्थिति, प्राप्ति.

२०५ वायाणे-मिथ्या, व्यर्थ, खोटे, पोकळ.

२०७ सुखासनी-पालखींत. । तेसणी-तशी, तशाप्रकारची.

आनु वाहणी-अन्य, दुसरेवाहनांत वसणें खरोखर असते काय!

२०८ सिसेवीण-मस्तकांवाचून. । रंके-भिकाऱ्यानें.

सतुके-खरोखर.

२१० जेसणा-जितका. जेव्हढा. । शिणू-श्रम, शीण.

भेटलिया-प्राप्त झाल्यावर. मृगतृष्णा- मृगजळ.

२११ व्याजे-निमित्त, हेतुनें. । वांझे-व्यर्थ.

२१५ वावो-खोटा, वैयर्थ, व्यर्थत्व.

२१६ दिठा द्रष्टा, आत्मा. दृष्टीस पडलेला असा

२१९ सतुके-जशी भासती तशी सत्य, खरोखर साच.

२३२ शिखा-ज्वाळा.

२३५ विन्यासे-व्यवस्था, रीतीनें. मांडणीनें, रूपानें.

भलतेनी-पाहिजेल त्या कोणत्याहि रीतीनें दिसो.

२३६ भांगारे–सुवर्ण, सोनें.

२३८ घ्राणानुमेयो–वासानें नाकाला कळण्याजोगे, जाणण्या जोगे.

२४१ नवलावो-फरक, आश्चर्यकारक, निराळेपणा कांहींनाहीं

२४२ अप्रयोजक–निष्फळ, निरुपयोगी.

अनारिसे-खोटें, वेगळें, भिन्नत्व.

२४३ लेखीजती-मोजले जातात, गणली समजली जातात.

२४४ एकीकाष्टा-सिद्धांत दृष्टीने, विचार दृष्टीनें, एकच-मर्यादा, मूळत्व, केवलस्थिति. । वांझटा- व्यर्थ, निष्फळ.

२४५ स्फूर्तीकडोनी- आत्मदृष्टीनें, स्फुर्तीच्या आत्मवस्तूच्या अंगानें पहातां. । स्फूर्ती–आत्मरूप. आत्मा.

२४६ फरकेना-पुढें येईना, मांडेना, पुढें फरकेना.

२४७ कल्लोळ-लाट.

२४८ श्रुती-वेद, शब्द. । ओगरिली-वाढली.

२४९ परिवडिला–माखला, परिवेष्टिला.

२५२ न समाये-प्रवेश नाहीं.

मिरवू-मिरवणें, डौल, चालणें, मिरवायला.

२५५ सवा–बरोबर. । फावा-प्राप्ति, फावणें, विस्तार.

२५७ फाके-वाढे, मोठा.

२६० आरुढला-चढला, असल्यावर. । कौतुके-सहज,लीलेनें,

२६१ शीव-मर्यादा. । सळू–अवस्था, रूप, भंग, विकार,लेव्हल. गाडे-अनेक, समुदाय.

२६२ बोधसंपत्ती-चिद्विलास, आत्मज्ञान सपत्तीला.

२६३ पल्हे–कापूस. । दोडा-बोंड. । तडा-चीर, उकरणे, फट तडा.

२६४ रवा- सोन्याची लगड.

२६५ आडत्रावो–मधला रस्ता, अडथळा, प्रतिबंध.

दिगंत-दिशा. । दिगंतोनी-एकाटोकांपासून दुसऱ्या टोकापर्यन्त.
फेडिता–क्रमिता, जातां, दूर करतां.
२६६ कांटाळे-बरोबर योग्यतेचा पदार्थ उपमा, तोल, ताजक, तुलना, वजन.
२६७ स्वप्रकाश-चित्तप्रकाश, आत्मप्रकाशाचें.
वाख-खळगा, सुरकती, वळी.
राणीव-राज्य.
२६९ न्याया भरले कीं रान-न्यायाची देशोधडी झाली, न्याय रानोमाळ झाला. । उपासावो–सहन करून.
२७० निधी-भूमिगत ठेवा, जमिनींत गुप्त असलेले धन.
अंजन-काजळ, ज्यामूळें दिसते त्या डोळ्यांत घालावयाचे द्रव्यास अंजन किंवा काजळ म्हणतात.
२७१ गौर-तेजस्वी, गौरी, सुवर्णाची केलेली.
अंविका–देवी.
२७२ शिवोनि-शिवापासून. । करी–हातानें.
वानेपरीं–अनेकप्रकारची, निरनिराळे प्रकार.
उजाळा-प्रकाशाला. । रश्मिकरी-प्रकाशानें, किरणानें.
२७३ दृङ्मात्र– ज्ञानमात्र, चिद्प्रकाशमात्र.
पाहे–उजेड. उगवे, प्रकाशाचा दिवस उजाडला.
२७४ निकृष्टें–नीच. अत्यंत हीन, अप्रबुद्धीनें.
२७५ उजरी–प्रगटपणा, स्पष्टता, । अपूर्व–नवीन.
२७६ मांदुसे–पेटींत.
२७७ स्फीते–स्फुरते, व्याप्त, वृद्धिगत झालेले, समृद्ध, स्पष्ट, विकसित.
विखुरली-बरळली. वहकली, फाटली जातात. अस्ताव्यस्त पसरलेली. । आते-येते. अंत्रे, आतडी.
२७८ आखरी–शब्दानें, अक्षरानें. । अनृत-खोटें बोलणें.

२७९ मानिजेना–समजत नाहीं! समजणार नाहीं!

२८० बहुयेपरी–अनेक रूपानें, बहुत पुष्कळ प्रकारांनीं.

२८१ निर्वचिता–विचारानें, निर्णय केल्यावर-

झावळे–खोटें ठरतें, अंधूक, अस्पष्ट.

२८२ विये–उत्पन्न करी,प्रसूत होई, माझ्यापासून झालेले आहे.

आथी–अज्ञान आहे असें म्हणावें लागेल.

२८३ ठेविलेठायीं-सुचविले, सिद्ध केलें, निश्चित करून ठेवलें.

धर्मधर्मित्व-गुणगुणित्व, एकानें धर्मी व दुसऱ्यानें त्याचा धर्म असणें हा संबंध.

२८४ जिये–जन्मपावेल, जिवंत राहील.

२८५ शिळा–दगड.

२८६ विकट-विपरीत, अवघड.। चोखट-शुद्ध,चांगले असे अमृत

२८७ ना–अथवा.

२८८ सांगडा–सारखा, बरोबरीचा.

२८९ प्रकाशका–निश्चयेकरून, प्रकाश प्रकाशच नेहमी असतो

न वंचे-टाकीत, त्यागकरतें. । आसिकी–सगळें, निश्चित, हे सर्व जग.

२९० वायसा-व्यर्थ, उगीच, पोकळ.

विभाति–ज्याच्या प्रकाशानें सर्व प्रकाशीत होते.

२९३ सद्भावो-अस्तित्व.

२९४ विसुरा- चमत्कार, विस्तार, पसारा.

२९५ खोळ–पदरांत, वस्त्रांत.

टळटळिता-केवळ संबंधरहित, ढळढळीत.

---

## प्रकरण आठवें.

ओवीचा क्रम.

३ उवाये–आनंदानें, प्रगट, उत्कर्ष, स्पष्टपणें, सुखानें.

न समाये—आमचे आम्हींपण, आमच्यांत न राहतां, सर्व विश्व आत्ममय, स्वरुप झालेले आहे.

४ न संटो—सुटत नाहीं, च्युत होत नाहीं.

न घसवटो-घासले जात नाहीं, चिकटत नाहीं.

स्वसंविती-आत्मज्ञान. आत्म संवेदनेनें.

६ पारखो-वेगळेपणा, परका, अन्य.

७ विपावो—असंभव, चुकून होणारा प्रकार, योग.

९ पाडू-योग्यता, पात्रता.

१२ निमिषोन्मेपा—पापणी उघडणे, झाकणें, ज्ञान अज्ञानाचा, निमिष आणि उन्मेष, डोळेमिटणें व उघडणें.

१३ विप्लविली-नाशपावली, बुडून गेली, उपलवली.

अभिधानें-नाम, नांवें, शब्द.

१६ निपटूनि-समूळ, कांहींएक वाकी न ठेंवतां. निःशेष,संपूर्ण.

सुजे-सुचे, समजे, कळते. समजते.

१७ वांझोले-व्यर्थ, वांझ ठरले.

१९ अहनि-दिवसरात्र (अहन्-दिवस)

सुनी-घालून.

---

## प्रकरण नववें.

ओवीचा क्रम.

१ अमोद-सुवास. सुगंध. । सुनास-चांगलें नाक, नासिका.

२ चापे-चाफ्याचें फूल. । विझणें-पंखे. । समीर-वारा.

वेल्हावती-डोलती, विस्तृत होतात.

बहकती-फांकत शोभत, दरवळतात.

३ लोधली-रसरूप झाली, थबथबली, भरली.

४ शेजार-बिछाना, शेजघर.

५ नागरु-मुन्दर-उत्तम. । दिठीवयाचा-दृश्याचा, दृष्टीचा,

देखणें, दर्शन, चैतन्याचा,
६ दिसे-दृश्य. । देखता-द्रष्टा. । अफूट-सबंध एक, अभेद्यांत, अखंड
७ पाती-पाकळी. । उपलवीजे-विकसित होतात, विस्तार पावतात, उमलतात. । सेवंते-शेवंतीची फुलें, शेवंतीपणा
८ वाजतां-संबंध, आदळत असतां, जोरानें वाहत असतां. वाधावा-वर्धावा, (मागून येणाऱ्याची आगमनाची खूण)
९ सुनी-प्रवृत्त होऊन, प्रवेश करून. थवे-समुदाय. सैंघ-सर्व, जिकडे तिकडे, एकदम.
१० शिवेशिवे-शिवतो न शिवतो तोंच.
दिठी-डोळा, दृष्टी, पहाणें.
११ नाग-बायांचे डोक्यांतील विशेष दागिना.
कंकण-कडे. । खूण-चिन्ह, लिंगभेद. । घेतां-घेणारा.
भेदली-निराळीं झाली, भेद करती झाली.
१२ घापे-घालतो. । कल्लोळ-लाट, तरंग.
फावे-प्राप्त होये, पाणीच हातांत येणार.
१४ परौते-पलीकडे. । मिरवणें-शोभा, अस्तित्व, खुलून राहणें.
१५ उजू-समोर, सज्ज, सरळ, अनुकूल.
१७ कांती-प्रकाश, कळा. । उसी-उसाच्या ठिकाणीं.
१८ वरखणें-वृष्टी, वर्षाव. । करणें-इंद्रियें.
१९ आड-पुढें, समोर प्राप्त. । मुद्रा-मौनमुद्रेच्या समाधि-स्थितींत. । वावडे-बोले, वडवडे, बोळते, उच्चार करणें.
२० गाडे-अनेक, अनंत. । मोडतां-घडता, होत असतां.
अपाडे-सारखें, अनंत.
२६ प्रत्यहारादि-विषयापासून इंद्रिये खेचून चित्तस्वरूपानुकार करणें. । टेकिले-आश्रय केला.
दिहाचा-दिवसाचा सूर्यप्रकाशांत चंद्राची स्थिति.

२७ प्रत्यंङ्मुखपणें-अंतरमुखवृत्तीनें. । जिणें-जगणें, जीवित्व. बहुडें-लयास जाते, मागें फिरणें.

२८ दुण-दुप्पट. । ओळगे-आश्रय करी, सेवा करते.

२९ चढावा-वरताण, वरचढपणा. । भृत्यू-भक्त, सेवक. भज्ज-सेव्य. । कालोवा-मिलाफ, सरमिसळ. भक्ति-उपासना सेवा, सेवा सेव्यसेवक भाव.

३१ ठाकीजेना-राहीना, राहत नाहीं

३२ पसरू-अवकाश, विस्तार.

३३ स्वैर-अनियमित, सैर. । ऋद्धी-ऐश्वर्य. बैसो-बसकर, बैसावयास.। घापे-आसन,घालतो, सत्कार करतो

३५ राणीव-राज्य, भूमिका, अधिष्ठान.

३६ दाटणीं-विस्तारणें, दाटीनें, व्यापकपणानें. वाहणी-रीत,ओघ.

३७ अन्वयो-संबंध, अस्तित्व. । बहुये-बहुत, फारकरून, बहुधा. अघडता-न घडणारा. न होणारा.

३८ नुसधा-फक्त, केवळ, एकटा. । कामविजे-कमावला जातो, कमवावा लागतो, उपयोगांत आणला जातो.

४१ वेव्हारू-व्यवहार.

४२ रूख-वृक्ष.

४३ मुग-मौन. । मुगी-मुका.

४४ आखताची-आक्षतेची, तांदुळाची.

४९ पांतीं-पंगतीला.

५० विशदे-स्पष्ट, केवळ,

५२ अव्हासव्हा-कोठेंही, प्रमाणाबाहेर, उलट सुलट.

५४ अडोळिलिया-अढळल्यास, पुढें आले असतां. भलतेणें-पाहिजेत्यानें. । व्हेळा-वेळेला.

५५ पाडू-योग्यता, एकाच बैठकी वरचे.

५७ सरळी-एकत्वांतील क्रीडा

५८ उपासती-उपासना, भक्ति.

५९ निफजें-उत्पन्न होई, निपजतो.

६० अकृत्रिम-स्वत:सिद्ध, सहज, कृत्रिम नसलेले.

६१ मासले-नमुनें, तुऱ्हा, प्रकार,

६२ गिळीत-सर्व नाहीसे करीत, एकमेकांत मिळत जाऊन एक सहासर्वग्रास झाला आहे.

६३ निदैजोनी-लीन होऊन, निजून, लयपाऊन.

परा-पहिली-अत्यंत सूक्ष्म ज्ञानवाणी.

६६ पुनरुक्त-पुन्हां बोललेले, पुनरूक्ति.

६८ लघू-लहान, हलका (जलांत जडपदार्थ बुडवितो हलका लघु तारतो.)

६९ समो-समता, सारखेपणा, समत्व, समावस्था

---

## प्रकरण दहावें.

ओव्यांचा क्रम.

१ हातातळीं-अनुग्रह करून, मस्तकावर हात ठेवून. हाताचा आश्रय देऊन. । सुखविले-आनंदविलें, सुखीं केले.

२ सुती-सूत्र,उमगस्थान, झरा. । अंतरवरती-आंत प्रकाशाच्या पोटांत, आंत राहणारे, व्याप्य.

४ सुरवाडू-उपयोग, सुख, शोभा. । उजिवडू-प्रकाश, उजेड. पवाडू-अवकाश, विस्तार, योग्यतेच.,

५ अगाध-गंभीर, समुद्र । उचंबळती-भरती येते.

करी-प्रवेश करी. । दानीं-परोपकार, (पल्लवादिकामुळें) दान करणारे, दान देणारें दाते.

६ असंवयं-अमर्याद, गूढ नसलेले स्पष्ट.

७ परिहार–वर्णन, निराकरण. । आड ठाऊनी-आड राहुन, आश्रयास राहून. । निर्माणा-आकारास [illegible], रचना ग्रंथ तयार करणें.

९ विपायें–कदाचित.

११ रहस्य-हृद्गत, वर्म, गुह्य, गुढज्ञान.

१२ प्रस्तावो-प्रसंग, निरुपण, ग्रंथाचा आरंभ. सिद्धानुवाद-सिद्ध गोष्टींचें वर्णन, सिद्ध बोलणें, प्रसंग, सिद्ध गोष्टीचा अनुवाद, पुनरुच्चार.

१३ पढीयंते-आवडते.

१४ गौप्य–रहस्य, गुप्तगोष्ट. । अपैसया–आपण स्वत:, सहजच, पूर्वींच, प्रकाशाप्रमाणें स्पष्ट असलेलेंच.

१५ वेठलो-वेढलो, मूर्त झालो. । सैंध- सर्वत्र, जिकडे तिकडे.

१६ वोपे–चाले, होई, प्राप्त करून द्यावें. मकरी-मासा, सुसर, मगर. रेखलिया-चित्रें काढण्याचा प्रयत्न करणें.

१८ पुढारी न ढळती-कुंठीत झाली, पुढें–पुढील, पुढें अनळलो हालत नाहीं.

२० वेल्हाळ–सुशोभित, सुंदर.

२२ सावाइले-तारुण्यांत येणें, सकाम, संगति झाली असतां.

२३ पेलती-वाढतात, डोलतात. तोलून धरतात.

२४ परगुणें-पदार्थ, पक्वान्न, मेजवानी.

२६ अवगाहन-स्नान, भेट मिळण्याला.

★★

# श्री चांगदेवपासष्टि.

स्वस्ति श्री वटेशु । जो लपोनि जगदाभासु ॥
दावी मग ग्रासु । प्रगटला करी ॥१॥
प्रगटे तंव तंव न दिसे । लपे तंव तंव आभासे ॥
प्रगट ना लपाला असे । न खोमता जो ॥२॥
बहु जंव जंव होये । तंव तंव कांहींच न होये ॥
कांहीं नहोनि आहे । अवघाचि जो ॥३॥
सोनें सोनेपणा उणें । न येतांचि झालें लेणें ॥
तेंवि न वेंचितां जग होणें । अंगें जया ॥४॥
कल्लोळकंचुक । न फेडितां उघडें उदक ॥
तेंवी जगेंसी सम्यक् । स्वरूप जो ॥५॥
परमाणूंचिया मांदिया । पृथ्वीपणें न वचोनि वायां॥
तेवि विश्वस्फूर्ति इयां । झांकेवना जो ॥६॥
कळाचेनि पांघुरणें । चंद्रमा हरपों नेणे ॥
कां वन्हीं दीपपणें । आन नोहे ॥७॥
म्हणोनि अविद्यानिमित्तें । दृश्य द्रष्टृत्व वर्ते ॥
तें मी नेणें आइतें । ऐसेंचि असे ॥८॥
जेंवि नाममात्र लुगडें । येऱ्हवीं सूतचि तें उघडें ॥
कां माती मृद्भांडें । जयापरी ॥९॥
तेंवि द्रष्टादृश्यदशे । अतीत दृङ्मात्र जें असे ।
तेंचि द्रष्टादृश्यमिसे । केवळ होय ॥१०॥

अलंकार येणें नामें । असिजे निखिल हेमें ।
नाना अवयवसंभ्रमें । अवयविया जेंवि ॥११॥
तेंवि शिवोनि पृथ्वीवरी । भासती पदार्थांचिया परी
प्रकाशे तें एकसरी । संविंत्ति हे ॥१२॥
नाहीं तें चित्र दाविती । परी असे केवळ भिंती ॥
प्रकाशे ते संविंत्ति । जगदाकारें ॥१३॥
वांधियाचिया मोडी । बांधा नहोनि गुळाची गोडी
तयापरि जगपरवडी । संविंत्ति जाण ॥१४॥
घडियेचेनि आकारें । प्रकाशिजे जेंवि अंबरें॥
तेंवि विश्वस्फूर्ति स्फुरे । स्फूर्तिचि हे ॥१५॥
न लिंपतां सुखदुःख। येणें आकारें क्षोभोनि नावेक
होय आपणिया सन्मुख । आपणचि जो ॥१६॥
तया नांव दृश्याचें होणें।संविंत्ति द्रष्टृत्वा आणिजे तेणें
बिंबा बिंबत्व जालेपणें । प्रतिबिंबाचेनि ॥१७॥
तेंवि आपणचि आपुला पोटीं ।आपणया दृश्य दाविन
उठी ॥ द्रष्टादृश्यदर्शनत्रिपुटी । मांडे तें हे ॥१८॥
सुताचिये गुंजे । आंतबाहेर नाहीं दुजें ।
तेंवि तिनपणेंविण जाणिजे । त्रिपुटि हे ॥१९॥
नुसधें मुख जैसें । देखिजतसे दर्पणमिसें ॥
वायांचि देखणें ऐसें । गमों लागे ॥२०॥
तैसें न वचतां भेदा । संविंत्ति गमे त्रिधा ॥
हेंचि जाणें प्रसिद्धा । उपपत्ति इया ॥२१॥

दृश्याचा जो उभारा । तेंचि द्रष्टृत्व होय संसारा ॥
या दोहींमाजिला अंतरा । दृष्टि पंगु होय ॥२२॥
दृश्य जेथवां नाहीं । तेथवां दृष्टि घेऊनि असे काइ॥
आणि दृश्येंविण कांहीं । द्रष्टृत्व असे? ॥२३॥
म्हणोनि दृश्याचे जालेपणें । दृष्टि द्रष्टृत्व होणें ॥
पुढती ते गेलिया जाणें । तैसेंचि दोन्ही ॥२४॥
एवं एकाचि झाली ती होती । तिन्ही गेलिया एकाचि
व्यक्ति । तरी तिन्ही भ्रांति । एकपण साच ॥२५॥
दर्पणाच्या आधीं शेखीं । मुख असताचि असे मुखीं
माजी दर्पणअवलोकीं । आन कांहीं होये? ॥२६॥
पुढें देखिजे तेणें बगें । देखतें ऐसें गमों लागे ॥
परी दृष्टीतें वाउगें । झकवित असे ॥२७॥
म्हणोनि दृश्याचिये वेळे । दृश्यद्रष्टत्वावेगळें ।
वस्तुमात्र निहाळे । आपणाशीं ॥२८॥
वाद्यजातेंविण ध्वनी । काष्ठजातेंविण वन्हीं ।
तैसें विशेष ग्रासुनी । स्वयेंचि असे ॥२९॥
जे म्हणतां नये कांहीं । जाणों नये कैसेंही ।
असताचि असे पाही । असणें जया ॥३०॥
आपुलिया बुबुळा । दृष्टि असोनि अखम डोळा ॥
तैसा आत्मज्ञानीं दुबळा।ज्ञानरूप जो॥३१॥
जें जाणणेंचि कीं ठाईं । नेणणें कीर नाहीं ॥
परि जाणणें म्हणोनियांही । जाणणें कैंचें? ॥३२॥

यालागीं मौनेंचि बोलिजे । कांहीं नहोनि सर्व होईजे॥
नव्हतां लहिजे । कांहींच नाहीं ॥३३॥
नाना बोधाचिये सोयरिके । साचपण जेणें एकें ॥
नाना कल्लोळमाळिके । पाणी जेंवि ॥३४॥
जे देखिजतेंविण । एकलें देखतेपण ॥
हें असो आपणिया आपण । आपणचि जे ॥३५॥
जें कोणाचें नव्हतेनि असणें । जें कोणाचें नव्हतां दिसणें
कोणाचें नव्हतां भोगणें । केवळ जो ॥३६॥
तया पुत्र तूं वटेश्वराचा । रवा जैसा कापुराचा ॥
चांगया मज तुज आपणयाचा । बोल ऐके ॥३७॥
ज्ञानदेव ह्मणे । तुज माझा बोल ऐकणें ॥
तें तळहाता तळीं मिठी देणें । जयापरी ॥३८॥
बोलेंचि बोल ऐकिजे । स्वादेंचि स्वाद चाखिजे ॥
कां उजिवडें देखिजे । उजिडा जेंवि ॥३९॥
सोनिया वरकल सोनें जैसा।कां मुख मुखा हो आरिसा
मज तुज संवाद तैसा । चक्रपाणि ॥४०॥
गोडिये आपुली गोडी । घेतां काय न माये तोंडीं?
आम्हां परस्परें आवडी । तो पाडु असे ॥४१॥
सखया तुझेनि उद्देशें । भेटावया जीव उल्हासे ॥
कीं सिद्धभेटी विसकुसे । ऐशिया बिहे ॥४२॥
घेवों पाहे तुझें दर्शन । तंव रूपा येवों पाहे मन ॥
येथें दर्शना होय अवजतन । ऐसें गमों लागे ॥४३॥

कांहीं करी बोले कल्पी । कां न करी न बोले न कल्पी ॥
ये दोन्ही तुझ्या स्वरूपीं । न घेति उमसू ॥४४॥
चांगया तुझेनि नांवे । करणें न करणें न व्हावें ॥
हें काय ह्मणों परि न धरवे । मीपण हें ॥४५॥
लवण पाणियाचा थावो । माजि रिघोनि गेलें पाहो ॥
तंव तेंचि नाहीं मा काय घेवो । माप जळा ॥४६॥
तसें तुज आत्मयातें पाही । देखों गेलिया मीचि नाहीं ॥
तेथें तूं केचा काई । कल्पावया जोगा । ॥४७॥
जो जागोनि नीद देखे । तो देखणेपणा जेंवि मुके ॥
तेंवि तूंतें देखोनि मी ठाके । कांहीं नहोनि ॥४८॥
आंधाराचे ठाईं । सूर्यप्रकाश तंव नाहीं ॥
परी मी आहें हें कांहीं । नवचेचि जेंवि ॥४९॥
तेंवि तूंतें मीं गिवसी । तेथें तूंपण मीपणेंसी ॥
उखतें पडे ग्रासीं । भेटीचि उरे ॥५०॥
डोळ्याचे भूमिके । डोळा चित्र होय कौतुकें ॥
आणि तेणेंचि तो देखे । न डंडळितां ॥५१॥
तैसी उपजतां गोष्टी । न फुटतां दृष्टि ॥
मी तूंवीण भेटी । माझी तुझी ॥५२॥
आतां मी तूं या उपाधी । ग्रासुनि भेटी नुसधी ॥
ते भोगिली अनुवादीं । घोळघोळूं ॥५३॥
रुचातियाचेनि मिसें । रुचितें जेविजे जैसें ॥
कां दर्पणव्याजें दिसे । देखतें जेंवि ॥५४॥

तैसीं अप्रमेयें प्रमेयें भरलीं । मौनाचीं अक्षरें भलीं ॥
रचोनि गोष्टी केली । मेळियेचि ॥५५॥
इयेचें करूनि व्याज । तूं आपणयातें बूझ ॥
दीप दीपपणें पाहे निज । आपुलें जैसें ॥५६॥
तैसी केलिया गोठी । तया उघडिजे दृष्टी ॥
आपणिया आपण भेटी । आपणामाजी ॥५७॥
जालिया प्रळयीं एकार्णव । अपार पाणियाची धांव ॥
गिळी आपुला उगव । तैसें करी ॥५८॥
ज्ञानदेव म्हणे नामरूपें । विण तुझें साच आहे आप-
णपें ॥ तें स्वानंदजीवनपे । सुखिया होईं ॥५९॥
चांगया पुढतपुढतीं । घरा आलिया ज्ञानसंपत्ति ॥
वेद्यवेदकत्वहीं अतीतीं । पदीं बैसें ॥६०॥
चांगदेवा तुझेनि व्याजें । माउलिया श्रीनिवृत्तिराजें ॥
स्वानुभव रसाळ खाजें । दिधलें लोभें ॥६१॥
एवं ज्ञानदेव चक्रपाणी ऐसे । दोन्ही डोळस आरिसे ॥
परस्पर पाहतां कैसे । मुकले भेदा ॥६२॥
तियेपरि जो इया । दर्पण करील ओंविया ॥
तो आत्माएवढिया । मिळेल सुखा ॥६३॥
नाहीं तेंचि काय नेणों असे । दिसे तेंचि कैसें नेणों दिसे ॥
असे तेंचि नेणों आपैसें । तें कीं होइजे ॥६४॥
निद्रपरौतें निद्रजणें । जागृति गिळोनि जागणें ॥
केलें तैसें गुंफणें । ज्ञानदेवो ह्मणे ॥६५॥

श्रीचांगदेवपासष्टि समाप्त.

# श्रीज्ञानेश्वर महाराजकृत

# हरिपाठ.

॥ अभंग १.

सुंदर तें ध्यान उभें विटेवरी । कर कटेवरी ठेऊनिया ॥१॥ तुळसीहार गळा कासेपितांबर ॥ आवडे निरंतर हेंचि ध्यान ॥२॥ मकरकुंडलें तळपतीश्रवणीं॥ कंठीं कौस्तुभमणी विराजीत ॥३॥ तुका म्हणे माझें हेंचि सर्वसुख ॥ पाहीन श्रीमुख आवडीनें ॥४॥

अभंग २, ॥ देवाचिये द्वारीं उभा क्षणभरीं ॥तेणें मुक्ति चारी साधियेल्या ॥१॥ हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा ॥ पुण्याची गणना कोण करी ॥२ ॥ असोनि संसारीं जिव्हे वेगु करी ॥ वेदशास्त्र उभारी बाह्या सदा ॥३॥ ज्ञानदेव म्हणे व्यासाचिये खुणें॥ द्वारकेचे राणे पांडवा घरीं ॥४॥

अभंग ३. ॥ चहूं वेदीं जाण साहिशास्त्रीं कारण॥ अठराहि पुराणें हरिसी गाती ॥१॥ मंथूनी नवनीता तैसें घे अनंता ॥ वायां व्यर्थ कथा सांडी मार्गु ॥२॥ एक हरी आत्मा जीवशिवसमा ॥ वायां तूं दुर्गमा न घालीं मन ॥ ३ ॥ ज्ञानदेवा पाट हरि हा वैकुंठ ॥ भरला घनदाट हरि दिसे ॥४॥

अभंग ४. ॥ त्रिगुण असार निर्गुण हें सार ॥ सारासार विचार हरिपाठ ॥ १ ॥ सगुण निर्गुण गुणाचें अगुण ॥ हरीवीण मन व्यर्थ जाय ॥२॥ अव्यक्त निराकार नाहीं त्या आकार॥जेथोनी चराचर हरिसी भजे ॥३॥ ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं॥ अनंत जन्मोनी पुण्य होय ॥ ४ ॥

अभंग ५. ॥ भावेंवीण भक्ति भक्तीवीण मुक्ति॥ बळेंवीण शक्ति बोलूं नये ॥१॥ कैसेनि दैवत प्रसन्न त्वरीत ॥ उगा राहें निवांत शिणसी वायां ॥२॥ सायास करीसी प्रपंच दिनानिशीं॥ हरीसी न भजसी कोण्या गुणें ॥३॥ ज्ञानदेव म्हणे हरिजप करणें ॥ तुटेल धरणें प्रपंचाचें ॥४॥

अभंग ६. ॥ योगयागविधी येणें नव्हे सिद्धी ॥ वायाचि उपाधी दंभ धर्म॥१॥ भावेंवीण देव नकळे निःसंदेह ॥ गुरुविण अनुभव कैसा कळे ॥२॥ तपेंविण दैवत दिधल्यावीण प्राप्त ॥ गुजेंवीण हित कोण सांगे ॥३॥ ज्ञानदेव सांगे दृष्टांताची मात॥ साधूंचे संगती तरणोपाय ॥४॥

अभंग ७.॥ साधुबोध झाला तो नुरोनियां ठेला॥ ठायींच मुराला अनुभव ॥ १ ॥ कापुराची वाती उजळली ज्योती॥ठायींच समाप्ती झाली जैशी॥२॥ मोक्षरेखें आला भाग्यें विनटला ॥ साधूंचा अंकिला

हरिभक्त ॥३॥ ज्ञानदेवा गोडी संगती सज्जनीं ॥ हरि दिसे जनीं वनीं आत्मतत्वीं ॥४॥

अभंग ८. ॥ पर्वताप्रमाणें पातक करणें ॥ वज्रलेप होणें अभक्तांसी ॥१॥ नाहीं ज्यासी भक्ति तो पतित अभक्त ॥ हरिसी न भजत दैवहत ॥२॥ अनंत वाचाळ बरळती बरळ । त्यां कैसेनि गोपाळ पावे हरी ॥३॥ ज्ञानदेवा प्रमाण आत्मा हा निधान ॥ सर्वां घटीं पूर्ण एक नांदे ॥४॥

अभंग ९. ॥ संतांचे संगती मनोमार्गगती ॥ आकळावा श्रीपती येणें पंथें ॥ रामकृष्ण वाचा भाव हा जीवाचा ॥ आत्मा जो शिवाचा राम जप ॥२॥ एकतत्वनाम साधिती साधन ॥ द्वैताचें बंधन न बाधिजे ॥३॥ नामामृतगोडी वैष्णवां लाधली ॥ योगियां साधली जीवनकळा ॥४॥ सत्वर उच्चार प्रल्हादीं बिंबला । उद्धवा लाधला कृष्णदाता ॥५॥ ज्ञानदेव म्हणे नाम हें सुलभ ॥ सर्वत्र दुर्लभ विरळा जाणे ॥६॥

अभंग १०. ॥ विष्णूवीण जप व्यर्थ त्याचें ज्ञान॥ रामकृष्णीं मन नाहीं ज्याचें ॥१॥ उपजोनि करंटा नेणे अद्वैतवाटा ॥ रामकृष्णीं पैठा कैसेनि होय ॥२॥ द्वैताची झाडणी गुरुवीण ज्ञान ॥ तया कैंचें कीर्तन घडेल नामीं ॥३॥ ज्ञानदेव म्हणे सगुण हें ध्यान॥

नामपाठ मौन प्रपंचाचें ॥४॥

॥ भजनः- रामकृष्णहरी जयजयरामकृष्णहरीं ॥

अभंग ११. ॥ त्रिवेणीसंगमीं नाना तीर्थें भ्रमी चित्त नाहीं नामीं तरि तें व्यर्थ ॥१॥ नामासी विन्मुख तो नर पापिया ॥ हरिवीण धांवया नपवे कोणी ॥२॥ पुराणप्रसिद्ध बोलिले वाल्मीक ॥ नामें तिन्ही लोक उद्धरती ॥३॥ ज्ञानदेव म्हणे नाम जपा हरिचें ॥ परंपरा त्याचें कुळ शुद्ध ॥४॥

अभंग १२. ॥ हरि उच्चारणीं अनंत पापराशी ॥ जातील लयासी क्षणमात्रें ॥ १ ॥ तृण अग्निमेळें समरस झालें ॥ तैसें नामें केलें जपतां हरी ॥२॥ हरिउच्चारण मंत्र हा अगाध ॥ पळे भूतबाध भेणें तेथें ॥ ३ ॥ ज्ञानदेव म्हणे हरि माझा समर्थ ॥ न करवे अर्थ उपनिषदां ॥४॥

अभंग १३. ॥ तीर्थ व्रत नेम भावेंविण सिद्धि॥ वायांचि उपाधि करिसी जना ॥१॥ भावबळें आकळे येऱ्हवीं नाकळे ॥ करतळीं आंवळे तैसा हरी ॥२॥ पारियाचा रवा घेतां भूमीवरी ॥ यत्न परोपरी साधन तैसें ॥३॥ ज्ञानदेव म्हणे निवृत्ति निर्गुण ॥ दिधलें संपूर्ण माझ्या हातीं ॥४॥

अभंग ॥१४॥ समाधी हरिची समसुखेंवीण ॥ न साधेल जाण द्वैतबुद्धी ॥१॥ बुद्धीचें वैभव अन्य

नाहीं दुजें ॥ एक्या केशीराजें सकळ सिद्धी ।।२।। ऋद्धिसिद्धिनिधी अवघीच उपाधी ॥ जंव त्या परमानंदी मन नाहीं ॥३॥ ज्ञानदेवीं रम्य रमलें समाधान ॥ हरीचें चिंतन सर्वकाळ ॥४॥

अभंग १५. नित्य सत्यामित हरिपाठ ज्यासी ॥ कळिकाळ त्यासी न पाहे दृष्टी ।। १ ॥ रामकृष्ण उच्चार अनंतराशी तप ॥ पापाचे कळप पळती पुढें।२। हरि हरि हरि हा मंत्र शिवाचा ॥ म्हणती जे वाचा तयां मोक्ष ॥३॥ ज्ञानदेवा पाठ नारायणनाम। पाविजे उत्तम निजस्थान ॥ ४ ॥

अभंग १६. ॥ एकनाम हरी द्वैतनाम दुरी ॥ अद्वैतकुसरी विरळा जाणे ॥१॥ समबुद्धि घेतां समान श्रीहरी ।। शमदमा वैरी हरी झाला ॥२॥ सर्वांघटीं राम देहादेहीं एक ॥सूर्य प्रकाशक सहस्त्ररश्मीं ॥३॥ ज्ञानदेवा चित्तीं हरिपाठ नेमा ॥ मागिलिया जन्मा मुक्त झालों ॥४॥

अभंग १७. ॥ हरी बुद्धी जपे तो नर दुर्लभ ॥ वाचेसि सुलभ रामकृष्ण ॥१॥ रामकृष्णनामीं उन्मनी साधिली ॥ तयासी लाधली सकळ सिद्धि ॥ २ ॥ सिद्धि बुद्धि धर्म हरिपाठीं आले ॥ प्रपंची निवाले साधुसंगे ॥३॥ ज्ञानदेवीं नाम रामकृष्ण ठसा ॥ येणें दशादिशा आत्मराम ॥४॥

अभंग १८. ॥ हरिपाठ कीर्ति मुखे जरी गाय॥ पवित्रचि होय देह त्याचा ॥१॥ तपाचे सामर्थ्यें तपिन्नला अमूप ॥ चिरंजीव कल्प वैकुंठीं नांदे ॥२॥ मातृ पितृ भ्राता सगोत्र अपार ॥चतुर्भुज नर होऊन ठेले ॥३॥ ज्ञान गूढ गम्य ज्ञानदेवा लाधलें ॥ निवृत्तीनें दिलें माझ्या हातीं ॥४॥

अभंग १९. ॥ हरिवंशपुराण हरिनामसंकीर्तन ॥ हरिवीण सौजन्य नेणें कांहीं ॥१॥ तया नरा लाधलें वैकुंठ जोडलें ॥ सकळही घडलें तीर्थाटन ॥ २ ॥ मनोमार्गे गेला तो येथें मुकला ॥हरिपाठीं स्थिरावला तोचि धन्य ॥३॥ ज्ञानदेवा गोडी हरिनामाची जोडी ॥ रामकृष्णीं आवडी सर्वकाळ ॥४॥

॥ भजन. विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल. ॥

अभंग २०. ॥ नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी ॥ पापें अनंत कोडी गेलीं त्यांचीं ॥१॥अनंत जन्मांचें तप एक नाम ॥ सर्व मार्ग सुगम हरिपाठ ॥ २ ॥ योगयाग क्रिया धर्माधर्म माया ॥ गेले ते विलया हरिपाठें ॥३॥ ज्ञानदेवीं यज्ञ याग क्रिया धर्म ॥ हरीविण नेम नाहीं दुजा ॥४॥

अभंग २१. ॥ वेदशास्त्रप्रमाण श्रुतीचें वचन ॥ एक नारायण सार जपा ॥१॥ जप तप कर्म हरीविण धर्म ॥ वाउगाचि श्रम व्यर्थ जाय ॥ २॥ हरिपाठें

गेलें ते निवांतचि ठेले॥भ्रमर गुंतलें सुमनकळिके॥३ ज्ञानदेवीं मंत्र हरिनामाचें शस्त्र ॥ यमें कुळगोत्र वर्जियेलें ॥४॥

अभंग २२. ॥ काळवेळ नाम उच्चारितां नाहीं॥ दोन्ही पक्ष पाहीं उद्धरती ॥१॥ रामकृष्णनाम सर्व दोषां हरण ॥ जडजीवां तारण हरि एक॥२॥ हरि-नाम सार जिव्हां या नामाची ॥ उपमा त्या दैवाची कोण वानी ॥३॥ ज्ञानदेवा सांग झाला हरीपाठ ॥ पूर्वजा वैकुंठमार्ग सोपा ॥४॥

अभंग २३. नित्यनेम नामीं ते प्राणी दुर्लभ ॥ लक्ष्मीवल्लभ तयाजवळी ॥१॥ नारायणहरि नारायण-हरि ॥ भुक्ति मुक्ति चारी घरीं त्यांच्या ॥ २ ॥ हरिवीण जन्म तो नर्कचि पै जाणा ॥यमाचा पाहुणा प्राणी होय ॥३॥ ज्ञानदेव पुसे निवृत्तीसी चाड ॥ गगनाहूनि वाड नाम आहे ॥४॥

अभंग २४. ॥ सात पांच तीन दशकांचा मेळा। ॥ एकतत्वीं कळा दावी हरी ॥१॥ तैसें नव्हे नाम सर्व मार्गा वरिष्ठ ॥ येथें कांहीं कष्ट न लगतीं ॥२॥ अजपा जपणें उलट प्राणाचा ॥ तेथेंही मनाचा निर्धारु असे ॥३॥ ज्ञानदेवा जिणें नामेविण व्यर्थ ॥ रामकृष्णीं पंथ क्रमियेला ॥४॥

अभंग २५. ॥ जप तप कर्म क्रिया नेम धर्म ॥

सर्वांघटीं राम भावशुद्ध ॥ १ ॥ न सोडीं रे भावो टाकीं रे संदेहो ॥ रामकृष्णीं टाहो नित्य फोडीं ॥२॥ जात वित्त गोत कुळ शीळ मात ॥ भजें कां त्वरित भावनायुक्त ॥३॥ ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं ॥ तेणें वैकुंठभुवनीं घर केलें ॥४॥

अभंग २६. ॥ जाणीव नेणीव भगवंती नाहीं ॥ उच्चारणीं पाहीं मोक्ष सदां ॥१॥ नारायणहरी उच्चार नामाचा ॥ तेथें कळिकाळाचा रीघ नाहीं ॥ २ ॥ तेथील प्रमाण नेणवे वेदांसी ॥ तें जीवजंतूंसी केंवि कळे ॥ ३ ॥ ज्ञानदेवा फळ नारायणपाठ ॥ सर्वत्र वैकुंठ केलें असे ॥४॥

अभंग २७. ॥ एकतत्व नाम दृढ धरी मना ॥ हरिसी करुणा येईल तुझी ॥ १ ॥ तें नाम सोपारें रामकृष्णगोविंद ॥ वाचेशीं सद्गद जपे आधीं ॥२॥ नामापरतें तत्त्व नाहींरे अन्यथा ॥ वायां आणिका पंथा जाशी झणी ॥३॥ ज्ञानदेवा मौन जपमाळ अंतरीं ॥ धरोनी श्रीहरि जपे सदां ॥४॥

अभंग २८. ॥ सर्वसुखगोडी सर्वशास्त्र निवडी ॥ रिकामा अर्धघडी राहूं नको ॥१॥ लटिका व्यवहार सर्व हा संसार ॥ वायां येरझार हरीवीण ॥२॥ नाम मंत्र जप कोटि जाईल पाप ॥ कृष्णनामीं संकल्प धरूनि राहें ॥३॥ निजवृत्ति काढी सर्व माया तोडीं ॥

इंद्रियां सवडी लपों नको ॥४॥ तीर्थव्रती भाव धरी रे करुणा ॥ शांतिदयापाहुणा हरि करी ॥५॥ ज्ञान देवा प्रमाण निवृत्तिदेवीं ज्ञान ॥ समाधिसंजीवन हरिपाठ ॥६॥

अभंग २९. ॥ नामसंकीर्तन साधन पैं सोपें ॥ जळतील पापें जन्मांतरींचीं ॥१॥ नलगती सायास जावें वनांतरा ॥ सुखें येतो घरा नारायण ॥२॥ ठायींच बैसोनी करा एकचित्त ॥ आवडी अनंत आळवावा ॥३॥ रामकृष्णहरि विठ्ठल केशवा ॥ मंत्र हा जपावा सर्वकाळ ॥ ४ ॥ यावीण असतां आणीक साधन ॥ वाहातसें आण विठोबाची ॥५॥ तुका म्हणे सोपें आहे सर्वांहूनी । शाहणा तो धणी घेतो येथें ॥६॥

॥ निजाचे निजभुवन सांडोनी वैकुंठ । येथें वाळवंट आवडलें ॥१॥ देवगुज सांगे पंढरीसी जारे प्रेमसुख घ्यारे नाम माझें ॥ २ ॥ तारिल भवसिंधु घ्यारे माझी भाक ॥ साक्ष पुंडलिक करुनि सांगें ॥ ३ ॥ काया वाचा मनें दृढ धरा जिवीं ॥ सकळ चालवी । भार त्याचा ॥४॥ हें जरी लटिकें नामयासी पुसा॥ आहे त्या भरवसा नामीं माझा ॥५॥

देवाचिये द्वारीं उभा क्षणभरी ॥ तेणें मुक्ति चारी साधियेल्या ॥१॥ हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा॥

पुण्याची गणना कोण करी ॥२॥ असोनि संसारीं जिव्हे वेगु करी ॥ वेदशास्त्र उभारी बाह्या सदा ॥३ ज्ञानदेव म्हणे व्यासाचिये खुणें ॥ द्वारकेचे राणे पांडवां घरीं ॥४॥

॥ श्रीविठ्ठल ॥

१. सद्गुरुरायें कृपा मज केली ॥ परी नाहीं घडली सेवा कांहीं ॥ १ ॥ सांपडविले वाटे जाता गंगास्नाना ॥ मस्तकीं तो जाणा ठेविला कर ॥२॥ भोजना मागतो तुप पावशेर ॥ पडिला विसर स्वप्ना माजीं ॥३॥ काय कळें उपजला अंतराय ॥ म्हणो-नियां काय त्वरा झाली ॥४॥ राघव चैतन्य केशव चैतन्य ॥ सांगितली खूण माळिकेची ॥५॥ बाबाजी आपुलें सांगितलें नाम ॥ मंत्र दिला रामकृष्णहरी ॥६ माघ शुद्ध दशमीं पाहुनी गुरुवार ॥ केला अंगिकार तुका म्हणे ॥७॥

२. ॥ माझिये मनींचा जाणोनियां भाव ॥ तो करी उपाव गुरुराव ॥१॥ आवडिचा मंत्र सांगितला सोपा ॥ जेणें नव्हे गुंफा कोठें कांहीं ॥ २ ॥ पुढें गेलें एक उतरले पार ॥ हा भव सागर साधुसंत ॥ ३ ॥ जाणत्या नेणत्या ज्या जैसी आवडी ॥ उतार सांगडी तापा पेटी ॥४॥ तुका म्हणे संतीं दाखविला तारु ॥ कृपेचा सागरु पांडुरंग ॥५॥

३. ॥ घालोनिया भार राहिलों निश्चिंती ॥ निरविलें संती विठोबासी ॥१॥ लाऊनियां हात कुरवाळिलं माथा ॥ सांगितले चिंता न करावी ॥ २ ॥ कटीकर विटे समचरण साजिरें ॥ राहिला भीवरेतिरीं उभा ॥ ३ ॥ खुंटले सायास आणीक या जीवा ॥ धरिले केशवा पाय तुझे ॥४॥ तुजवांटे आतां तें करीं अनंता ॥ तुका म्हणे संता लाज माझी ॥५॥

४. ॥ माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव ॥ आपणचि देव होय गुरु ॥१॥ पढिये देहभाव पुरवी वासना ॥ अंतीं तें आपणापाशीं न्यावें ॥२॥ मागें पुढें उभा राहे सांभाळित ॥ आलिया आघात निवारावे ॥३॥ योगक्षेम त्याचा जाणें जड भारी ॥ वाट दावी करीं धरोनियां ॥४॥ तुका म्हणें नाहीं विश्वास ज्या मनीं ॥ पहावे पुराणीं विचारुनी ॥५॥

५. ॥ आदिनाथ उमा बीज प्रगटिलें॥ मच्छिंद्रा लाधलं सहजस्थिती ॥ १ ॥ तेचि प्रेममुद्रा गोरक्षा दिधली ॥ पूर्ण कृपा केली गयनिनाथा ॥२॥ वैराग्यें तापला सप्रेमें निवाला ॥ ठेवा जो लाधला शांति सुख ॥३॥ निर्द्वंद्व निःशंक विचरतां महीं ॥ सुखानंद हृदयीं स्थिरावला ॥४॥ विरक्तीचें पात्र अन्वयाचें सुख । येऊनि सम्यक अनन्यता ॥५॥ निवृत्ती गयनीं कृपा केली पूर्ण । कळ हे पावन कृष्णनामें॥६॥

६. ॥ आदिनाथ गुरु सकळ सिद्धांचा ॥ मच्छिंद्र तयाचा मुख्य शिष्य ॥१॥ मच्छिंद्रानें बोध गोरक्षासी केला ॥ गोरक्ष बोळला गयनी प्रती ॥ २ ॥ गयनी प्रसादें निवृत्ती दातार ॥ ज्ञानदेवा सार चोजविलें ॥३॥

७. ॥ अवघाचि संसार सुखाचा करीन ॥आनंदे भरीन तिन्ही लोक ॥१॥ जाईनगे माये तया पंढरपुरा ॥भेटेन माहेरा आपुलिया ॥२॥ सर्व सुकृताचे फळ मी लाहीन ॥ क्षेम मी देईन पांडुरंगा ॥३॥ बाप रखुमादेवी वरु विठ्ठलाचिं भेटी ॥ आपुला संवसाटी करुनि ठेला ॥४॥

॥ भजन ॥ श्रीज्ञानेश्वर माऊली ज्ञानराज माऊली तुकाराम. ॥

श्रीज्ञानेश्वर महाराजकृत हरिपाठ व गुरुवारचें अभंग समाप्त

# श्रीएकनाथ महाराजकृत हरिपाठ

( १ ) हरीचिया दासा हरि दाही दिशा । भावें जैसा तैसा हरि एक ॥ १ ॥ हरि मुखीं गातां हरपली चिंता । त्या नाहीं मागुता जन्म घेणें ॥२॥ जन्म घेणें लागे वासनेच्या संगें । तेंचि झाली अंगे

हरिरूप ॥ ३ ॥ हरिरूप झालें जाणणें हरपलें । नेणणें तें गेलें हरिचें ठायीं ॥४॥ हरिरूप ध्यानीं हरिरूप मनीं । एका जनार्दनीं हरी बोला ॥५॥

( २ ) हरि बोला हरि बोला नाहीं तरी अबोला । व्यर्थ गलबला करूं नका ॥१॥ नको नको मान नको अभिमान । सोडी मीतूंपण तोचि सुखी ॥२॥ सुखी जेणें व्हावें जग निववावें । अज्ञानीं लावावें सन्मार्गासी ॥ ३ ॥ मार्ग जया कळे भाव-भक्तिबळें । जगाचिये मेळे न दिसती ॥४॥ दिसती जनीं वनीं प्रत्यक्ष लोचनीं । एका जनार्दनी ओळखिलें ॥५॥

(३) ओळखिला हरि धन्य तो संसारीं । मोक्ष त्याचें घरीं सिद्धीसहित ॥ १ ॥ सिद्धि लावी पिसें कोण तया पुसे । नेलें राजहंसें पाणी कायी॥२ काय तें करावें संदेहीं निर्गुण । ज्ञानानें सगुण ओस केलें ॥३॥ केलें कर्म झालें तेंचि भोगा आलें । उपजले मेले ऐसे किती ॥४॥ एका जनार्दनी नाहीं यातायाती । सुखाची विश्रांती हरी संगे ॥५॥

(४) जें जें दृष्टीं दिसे तें तें हरिरूप । पूजा ध्यान जप त्यासी नाहीं ॥१॥ वैकुंठ कैलासी तीर्थ क्षेत्रीं देव । तयावीण ठाव रिता कोठें ॥२॥ वैष्णवांचें गुह्य मोक्षाचा एकांत । अनंतासी अंत

पाहतां नाहीं ॥३॥ आदि मध्य अंतीं अवघा हरि एक । एकचि अनेक एक हरी ॥४॥ एकाकार झाले जीव शिव दोन्ही । एका जनार्दनी ऐसें केलें ॥५॥

(५) नामाविण मुख सर्पाचें तें बीळ । जिव्हा नव्हे काळ सर्प आहे ॥१॥ वाचा नव्हे लांब जळो त्याचें जिणें । यातना भोगणें यमपुरीं ॥२॥ हरिवीण कोणी नाहीं सोडविता । पुत्र बंधु कांता संपत्तीचे ॥३॥ अंतकाळीं कोणी नाहीं वा सांगाती । साधूचे संगतीं हरि जोडे ॥४॥ कोटिकुळें तारी हरि अक्षरें दोनी । एका जनार्दनीं पाठ केलीं ॥५॥

(६) धन्य माय व्याली सुकृताचें फळ । फळ तें निर्फळ हरिविण ॥१॥ वेदाचेंही बीज हरि हरि अक्षरें । पवित्र सोपारें हेंचि एक ॥२॥ योग याग व्रत नेम धर्म दान । न लगे साधन जपतां हरि ॥३॥ साधनांचें सार नाम मुखीं गातां । हरि हरि म्हणतां कार्यसिद्धि ॥ ४ ॥ नित्य मुक्त तोचि एक ब्रम्हज्ञानी । एका जनार्दनी हरी बोला ॥५॥

(७) बहूतां सुकृतीं नर देह लाधला । भक्तिविण गेला अधोगती ॥ १ ॥ बाप भाग्य कैसें न सरेचि कर्म । न कळेचि वर्म अरे मूढा ॥२॥ अनेका जन्माचें सुकृत पदरीं । त्याचें मुखीं हरि पैठा होय ॥३॥ राव रंक हो का उंच नीच याती । भक्तिवीण

माती मुखीं त्याच्या ॥४॥ एका जनार्दनी हरि हरि म्हणतां । मुक्ति सायुज्यता पाठीं लागे ॥५॥

(८) हरिनामामृत सेवी सावकाश । मोक्ष त्याचे भूस दृष्टीपुढें ॥१॥ नित्य नामघोष जयाचें मंदिरीं । तेंचि काशीपुरी तीर्थ क्षेत्र ॥२॥ वाराणशी तीर्थ क्षेत्रा नाश आहे । अविनाशासी पाहे नाश कैंचा ॥३॥ एका तासामाजी कोटि वेळां सृष्टी । होती जाती दृष्टीं पाहे तोचि ॥४॥ एका जनार्दनी ऐसे किती झाले । हरिनाम सेविलें तोचि धन्य ॥५॥

( ९ ) भक्तिवीण पशु कशासी वाढला । सटवीनें नेला कैसा नाहीं ॥१॥ काय माय गेली होती भूतापाशीं । हरि नये मुखासी अरे मूढा ॥२॥ पातकें करितां पुढें आहे पुसता । काय उत्तर देता होशील तूं ॥३॥ अनेक यातना यम करवील । कोण सोडवील तेथें तुजला ॥४॥ एका जनार्दनी सांगताहे तोंड । आहा वाचा रडे बोलतांची ॥५॥

(१०) स्वहिताकारणें संगती साधूची । भावें भक्ति हरीची भेटी तेणें ॥ १ ॥ हरि तेथें संत संत तेथें हरि । ऐसे वेद चारी बोलताती ॥ २ ॥ ब्रम्हा डोळसाते वेदार्थ नाकळे । तेथें हे आंधळे व्यर्थ होती ॥३॥ वेदार्थाचा गोवा कन्या अभिलाप । वेदें नाहीं ऐसें सांगितलें ॥ ४ ॥ वेदाचीं हीं बीजाक्षरें

हरि दोनी । एका जनार्दनी हरी बोला ॥५॥

(११) सत्पद तें ब्रम्ह चित्पद तें माया । आनंद पदीं जया म्हणती हरि ॥१॥ सत्पद निर्गुण चित्पद सगुण । सगुण निर्गुण हरिपायीं ॥२॥ तत्सदिति ऐसें पैल वस्तूवरी । गीतेमाजीं हरि बोलियेलें ॥३॥ हरिपद प्राप्ति भोळ्या भाविकांसी । अभिमानी-यांसी गर्भवास ॥४॥ अस्ति भाति प्रिय ऐशीं पदें तिनी । एका जनार्दनीं तेंचि झालें ॥५॥

(१२) नाकळे तें कळे कळे तें नाकळे । वळे तें नावळे गुरुवीण ॥ १ ॥ निर्गुणीं पावलें सगुणीं भजतां । विकल्प धरितां जिव्हा झडे ॥२॥ बहुरूपी धरी संन्याशाचा वेष । पाहोन तयास धन देती ॥३ संन्याशाला दिले नाही बहुरूपीयाला । सगुणीं भजला तेथें पावे ॥४॥ अद्वैताचा खेळ दिसे गुणा-गुणीं । एका जनार्दनीं ओळखिलें ॥५॥

(१३) ओळखिला हरि सांठविला पोटीं । होतां त्याची भेटी दुःख कैंचे ॥ १ ॥ नर अथवा नारी हो कां दुराचारी । मुखीं गातां हरि पवित्र तो ॥२॥ पवित्र तें कुळ धन्य त्याची माय । हरि-मुखें गाय नित्य नेमें ॥३। काम क्रोध लोभ जयाचे अंतरीं । नाहीं अधिकारी ऐसा येथें ॥४॥ वैष्णवांचें गुह्य काढलें निवडुनी । एका जनार्दनीं हरी बोला ॥५

(१४) हरि बोला देतां हरि बोला घेतां। हसतां खेळतां हरि बोला ॥१॥ हरि बोला गातां हरि बोला खातां। सर्व कार्य करितां हरि बोला हरि बोला एकांतीं हरि बोला लोकांतीं। देह त्यागा अंती हरि बोला ॥३॥ हरि बोलाभांडतां हरि बोला कांडतां। उठतां बैसतां हरि बोला ॥४॥ हरि बोला जनीं हरि बोला विजनीं । एका जनार्दनीं हरि बोला ॥५॥

(१५) एक तीन पांच मेळा पंचविसांचा। छत्तीस तत्वांचा मूळ हरि ॥ १ ॥ कल्पना अविद्या तेणें झाला जीव। मायोपाधि शिव बोलिजेती ॥२॥ जीव शिव दोनी हरिरूपीं तरंग। सिंधु तो अभंग नेणे हरी ॥३॥ शुक्तीवरी रजत पाहतां डोळा दिसे। रज्जूवरी भासे मिथ्या सर्प ॥ ४ ॥ क्षेत्रक्षेत्रज्ञातें जाणताती ज्ञानी। एका जनार्दनीं हरि बोला ॥५॥

(१६) कल्पनेपासूनी कल्पिला जो ठेवा तेणें पडे गोवा नेणें हरि ॥१॥ दिधल्यावांचून फळ प्राप्ति कैंची। इच्छा कल्पनेची व्यर्थ बापा ॥ २ ॥ इच्छावे जे जवळी हरिचे चरण। सर्व नारायण देतो तुज ॥३॥ न सुटे कल्पना अभिमानाची गांठीं। घेतां जन्म कोटि हरि कैंचा ॥ ४ ॥ एकाजनार्दनीं सांपडली खूण। कल्पना अभिमान हरी झाला ॥५॥

(१७) काय नपूंसका पद्मनीचे सोहळे। वांझसी डोहळे कैंचे होती ॥ १ ॥ अंधापुढें दीप खरासी चंदन। सर्पा दूध पान करूं नये ॥ २ ॥ क्रोधी अविश्वासी त्यांसी बोध कैंचा। व्यर्थ आपुली वाचा शिणवूं नये ॥३॥ खळाची संगती उपयोगासी नये। आपणा अपाय त्याचे संगें ॥४॥ वैष्णवीं कुपथ्य टाकिलें वाळूनी। एका जनार्दनी तेचि भले ॥५॥

(१८) न जायेचि ताठा नित्य खटाटोप। मंडूकी चटचट तैसे ते गा ॥ १ ॥ प्रेमाविण भजन नाकाविण मोती। अर्थाविण पोथी वाचुनी काय ॥२॥ कुंकुवा नाहीं ठाव म्हणे मी आहेव। भावाविण देव कैसा पावे ॥३॥ अनुतापाविण भाव कैसा राहे॥ अनुभवें पाहे शोधूनियां ॥४॥ पाहतां पाहणें गेलें ते शोधूनी। एका जनार्दनींअनुभविलें ॥५॥

(१९) परिमळ गेलिया वोस फूल देठीं। आयुष्या शेवटीं देह तैसा ॥ १ ॥ घडिघडी काळ वाट याची पाहे। अझूनि किती आहे अवकाश ॥२ हाचि अनुताप घेऊनि सावध। कांहीं तरी बोध करीं मना ॥३॥ एक तास उरला खट्वांगरायासी भाग्यदशा कैसी प्राप्त झाली ॥४॥ सांपडला हरि तयाला साधनीं। एका जनार्दनीं हरि बोला ॥५॥

(२०) करारे आपांनो साधन हरीचें । आणी कर्णाचे करूं नका ॥ १ ॥ जेणें नये जन्म यमाची यातना । ऐसिया साधना करा कांहीं ॥२॥ साधनाचें सार मंत्रबीज हरि । आत्मतत्व धरी तोचि एक ॥३॥ कोटि कोटि यज्ञ नित्य ज्याचा नेम । एक हरि नाम जपतां घडे ॥४॥ एका जनार्दनीं न घ्यावा संशय । निश्चयेसीं होय हरिरूप ॥५॥

( २१ ) बारा सोळा जणी हरीसी नेणती । म्हणोनि फिरती रात्रंदिवस ॥ १ ॥ सहस्र मुखांचा वर्णिता भागला । हर्ष जया झाला तेणें सुखें ॥२॥ वेद जाणूं गेला पुढें मौनावला । तें गुह्य तुजला प्राप्त कैंचें ॥३॥ पूर्व सुकृताचा पूर्ण अभ्यासाचा । दास सद्गुरूचा तोचि जाणे ॥ ४ ॥ जाणते नेणते हरीचे ठिकाणीं । एका जनार्दनीं हरि बोला ॥५॥

(२२) पिंडी देहस्थिति ब्रम्हांडीं पसारा । हरिविण सारा व्यर्थ भ्रम ॥ १ ॥ शुक याज्ञवल्क्य दत्त कपिलमुनी । हरीसी जाणोनि हरिच झाले ॥२॥ यारे यारे धरूं हरिनाम तारूं । भवाचा सागरू भय नाहीं ॥३॥ साधुसंत गेले आनंदीं राहिले । हरिनामें झालें कृतकृत्य ॥४॥ एका जनार्दनी मांडिलें दुकान देतो मोलाविण सर्व वस्तु ॥५॥

(२३) आवडीनें भावें हरिनाम घेसी । तुझी

चिंता त्यासी सर्व आहे ॥ १ ॥ नको खेद धरूं कोणत्या गोष्टीचा । पति तो लक्ष्मीचा जाणतसे ॥ २ ॥ सकळ जीवांचा करितो सांभाळ । तुज मोकलील ऐसें नाहीं ॥ ३ ॥ जैशी स्थिति आहे तैशापरी राहे । कौतुक तूं पाहे संचिताचें ॥४॥ एका जनार्दनीं भोग प्रारब्धाचा । हरिकृपें त्याचा नाश झाला ॥५॥

( २४ ) दुर्बळाची कन्या समर्थानें केली । अवदशा निमाली दरिद्राची ॥ १ ॥ हरि कृपा होतां भक्ता निघती दोंदे । नाचती स्वानंदें हरिरंगीं ॥२ देव भक्त दोन्ही एकरूप झाले । मुळींचें संचलें जैसें तैसें ॥ ३ ॥ पाजळली ज्योती कापुराची वाती । ओवाळितां आरती भेद नुरे ॥ ४ ॥ एका जनार्दनीं कल्पचि मुराला । तोचि हरि झाला ब्रह्मरूप ॥५॥

(२५) मुद्रा ती पांचवी लाउनियां लक्ष । तो आत्मा प्रत्यक्ष हरि दिसे ॥ १ ॥ कानीं जें पेरिलें डोळां तें उगवलें । व्यापक भरिलें तोचि हरि ॥२॥ कर्म उपासना ज्ञानमार्गीं झाले । हरिपाठीं आले सर्व मार्ग ॥ ३ ॥ नित्य प्रेमभावें हरिपाठ गाय । हरिकृपा होय तयावरी ॥४॥ झाला हरिपाठ बोलणें येथुनी । एका जनार्दनीं हरि बोला ॥५॥

॥ श्रीएकनाथ महाराजकृत हरिपाठ समाप्त ॥

# श्रीएकनाथ महाराजकृत

## चिरंजीव पद

चिरंजीवपद पावावयासी । आनउपाय नाहीं साधकासी ॥ किंचित् बोलों निश्चयंसीं । कळावयासी साधकां ॥१॥ येथं मुख्य पाहिजे अनुताप । त्या अनुतापाचें कैसें रुप ॥ नित्य मृत्यु लागला समीप । न मनीं अल्प देहसुख ॥ २ ॥ म्हणे नरदेह किमर्थ निर्मिला । तो मीं विषयस्वार्थी लाविला ॥ थिता परमार्थ हातिंचा गेला । करी वहिला विचार हा ॥३ ऐसा अनुताप वाहतां । तंव वैराग्य ये तयाच्या हातां । त्या वैराग्याची कथा । ऐक आतां सांगेन ॥४॥ ते वैराग्य बहुतांपरी । आहे गा हें अवधारी ॥ सात्विक राजस तामस त्रिप्रकारीं । योगीश्वरीं बोलिजे ॥५॥ नाहीं वेदविधी आचार । नेणें सत्कर्म साचार॥ कर्म धर्मी भ्रष्टाकार । तो अपवित्र तामस ॥६॥ त्याग केला पूज्यतेकारणें । सत्संग सोडूनि पूजा घेणें॥ शिष्यममता धरोनि राहाणें । तें जाणणें राजस ॥७॥ वैराग्य राजस तामस । तें न मानेच संतास ॥ तेणें न भेटे कृष्णपरेश । अनर्थास मूळ तें ॥ ८ ॥ आतां वैराग्य शुद्ध सात्विक । जें मी जगद्वंद्य मानीं यदुनायक ॥ तें तूं सविस्तर ऐक ॥ मनीं निष्टंक

वैसावया ॥९॥ भोगेच्छा विषयक । ते तो सांडी सकळिक ॥ प्रारब्धें प्राप्त होतां देख । तेथोनी निष्टंक अंगकाढी ॥१०॥ कां जे विषय पांच आहेती ते अवश्य साधका नाडिती ॥ म्हणोनी लागों नेदी प्रीति । कवणे रीतीं ऐक पां ॥ ११ ॥ जेणें धरिला शुद्ध परमार्थ । त्यासी जनमान हा करी अनर्थ । तेणें वाढे विषय स्वार्थ । ऐक नेमस्त विचार हा ॥१२॥ वैराग्य पुरुष देखोनी । त्याची स्तुति करिती जनीं ॥ एक सन्मानें करुनी । पुजे लागोनी पैं नेती ॥१३॥ त्याचें वैराग्य कोमळ कंटक । नेट न धरीच निष्टंक॥ देखोनि मान स्तुति अलोलिक । भुलला देख पैं तेथें ॥१४॥ जनस्तुति लागे मधुर । म्हणती उद्धरावया हा हरीचा अवतार ॥ आम्हालागीं जाहला स्थिर । तेणें धरी फार शब्दगोडी ॥१५॥ हा पांच विषयांमाजीं प्रथम । शब्दविषय संभ्रम ॥ स्पर्शविषय सुगम । उपक्रम तो ऐसा ॥१६॥ नाना मृदु आसनें घालिती । विचित्र पर्यंक निद्रप्रती ॥ नरनारी शुश्रुषा करिती । तेणें धरी प्रीति स्पर्शगोडी ॥१७ रूपाविषय कैसा गोवी । वस्त्रेंभूषणें देती बरवीं ॥ तेणें सौंदर्य करी जीवीं । देहभावीं श्लाघ्यता ॥ १८ ॥ रूपविषय ऐसा जडला । रसविषय कैसा झोंबला ॥ जें जें आवडे याला । गोडगोड अर्पिती ॥१९॥ ते

रसगोडी करितां । घडी न विसंबे धरी ममता ॥ मग गंधविषय ओढितां । होय तन्मतां त्यां कैसा ॥ आवडे सुमन चंदन । बुका केशर विलेपन ॥ ऐसे पांचही विषयजाण । जडले संपूर्ण सन्मानें ॥२१॥ मग जे जे जन वंदिती । तेचि त्याची निंदा करिती । परि अनुताप नुपजे चित्तीं । ममता निश्चितीं पूजकांची ॥२२॥ म्हणाल विवेकी जो आहे । त्यासी जनमान करील काय ॥ हें बोलणें मूर्खाचें पाहे । जया चाड आहे मानाची ॥२३॥ ज्ञात्यासी प्रारब्धगती । मान झाला तरी नेघो म्हणती ॥ परी येथेंचि गुंतोनि न राहती । उदास होती तत्काळ ॥२४॥ या परी साधकाच्या चित्ता । मानगोडी न संडे सर्वथा ॥ जरी कृपा उपजेल भगवंता । तरी होय मागुता विरक्त ॥२५॥ तो विरक्त कैसा म्हणाल । जो मानलें सांडी स्थळ ॥ सत्संगीं राहे निश्चळ । न करी तळमळ मानाची ॥२६॥ मांडीना स्वतंत्र फड आंगा येईल अहंता वाड ॥ न धरी जीविकेची चाड । न बोले गोड मनधरणी ॥ २७ ॥ नावडे प्रपंचीं बैसणें । नावडे कोणाशीं बोलणें ॥ नावडे योग्यता मिरवणें । बरवें खाणें नावडे ॥२८॥ नावडे लौकिक परवडी । नावडती लेणीं लुगडीं ॥ नावडे परान्न गोडी । द्रव्यजोडी नावडे ॥२९॥ नावडे स्त्रियांत

देसणें । नावडे स्त्रियांचें पाहणें ॥ नावडे स्त्रियांचें रगडणें । त्यांचें बोलणें नावडे ॥ ३० ॥ नको नको स्त्रियांचा सांगात । नको नको स्त्रियांचा एकांत ॥ नको नको स्त्रियांचा परमार्थ । करिती आघात पुरुषासी ॥३१॥ म्हणाल गृहस्थ साधकें । स्त्रिया सांडोनि जावें कें ॥ येच अर्थी उत्तर निकें । ऐका आतां सांगेन ॥३२॥ तरी स्वस्त्रियेवांचोनी । नातळावी अन्य कामिनी ॥ कोणे स्त्रियासन्निध वाणी । आश्रयो झणीं न द्यावा ॥३३॥ स्व स्त्रीसही कार्यापुरतें । पाचारावें स्पर्शावें निरुतें ॥ परी आसक्त होउनियां तेथें । सर्वथा चित्त नसावें ॥ ३४ ॥ नरनारी शुश्रुषा करिती । भक्ती ममता उपजविती ॥ परीशुध्द जो परमार्थी । तो स्त्रियांचें संगती न बैसे ॥३५॥ अखंड एकान्ती बैसणें । प्रमदासंगे न राहणें॥ जो निःसंग निराभिमानें । त्यानें बैसणें सर्वदा ॥३६ कुटुंब आहाराकारणें । अकल्पित नमिळे तरीकोरान्न करणें । ऐसे स्थिती जें वर्तणें ॥ तें जाणणें शुध्द वैराग्य ॥३७॥ ऐशी स्थिति नाहीं ज्यासी । तंव कृष्णप्राप्ती कैंची त्यासी ॥ यालागी कृष्णभक्तीसी । ऐशी स्थिती असावी ॥३८॥ यास्थितीवेगळा जाण ॥ कृष्णीं मिळे तो अज्ञान ॥ तो सकळ मूर्खांचें अधिष्ठान । लटिकें तरी आण देवाची ॥ ३९ ॥ हे

बोल माझिये मतीचे । नव्हति गा साचे ॥ कृष्णें सांगितलें उद्धवहिताचे । ते मी साच बोलिलों ॥४०
साच न मानी ज्याचें मन । तो विकल्पी न पवे कृष्णाचरण ॥ माझें काय जाईल जाण । मी बोलोन उतराई ॥४१॥ साधावयास वैराग्यज्ञान । मनुष्य-देहीं करावा प्रयत्न ॥ सांगे एका जनार्दन । आणिक प्रयत्न असेना ॥४२॥

इति श्री चिरंजीव पद समाप्त

★★

# श्रीएकनाथकृत आनंदलहरी

श्रीगणेशाय नमः । ॐ नमो सच्चिदानंदघना । ॐ नमो सकळ सुखाचिया निधाना । ॐ नमो परात्पर निर्गुणा । जगज्जीवना मूळबीजा ॥ १ ॥ ॐ नमो सकळव्यापका । ॐ नमो आनंदाचिया निजसुखा । आनंदा आनंद तुझेनि देखा । तो तूं लोकां प्रतक्ष ॥२॥ ॐ नमो अव्यक्त परब्रम्हा । ॐ नमो सर्वसुखाचिया निजधामा । ॐ नमो भक्तांच्या कल्पद्रुमा । तुज उपमा आनु नाहीं ॥३
ॐ नमो आदिपुरुषा आदिदेवता । ॐ नमो उत्पत्तिप्रळयरहिता । पाहतां तूं सकळांचा निज-

जानिता । सकळभूतां सत्ता तुझी ॥ ४ ॥ ॐ नमो जी ज्ञानसागरा । ॐ नमो त्रैमूर्तीअवतारा । ॐ नमो मोक्षाचिया निजघरा । विश्वंभरा तुज नमो ॥५॥ तुझें निजस्वरूप पाहतां दृष्टीं । निजानंद न समाये सृष्टीं । तुटल्या जन्ममरणाच्या गांठी । निर्भय पोटीं मी जालों॥६॥बंधमुक्तीचीं अटाअटी । संचरली होती माझ्या पोटीं । होतां तुझी कृपादृष्टी । उठाउठी पळाली ॥ ७ ॥ तुझिया रूपीं पाहतां कांहीं । बंधमुक्ती दोन्ही नाहीं । व्यापक तूं सर्वा देहीं । आनंद डोही जेवीं तरंग ॥८॥ बंधमुक्तीची कहाणी । ऐकिली जेवीं स्वप्नीं । जागृतीमाजीं येऊनी । साच मानी कोण तीतें ॥ ९ ॥ स्वर्ग नर्क दोन्ही शब्द । हा अज्ञानाचा अनुवाद । सद्गुरुकृपा जालिया बोध । जालें सर्व चैतन्य ॥ १० ॥ सगुण आणि निर्गुण । हें शब्दाचेंचि लाघव जाण । जेथ शब्द झाला शून्य । गुणागुण उरले कोठें ॥११ तुझी इच्छा जे मायाशक्ति । ते अनंत ब्रह्मांडें जाली रचिती । करी पंचभूतांची व्यक्ति । जैसी संतती वांझेची ॥१२॥ जैसा कल्पनेचा विस्तारू । हृदयीं करितु अपारू । पाहतां न दिसे साचारू । तैसा विचारू मायेचा ॥१३॥ अहर्निशीं तुझ्या स्वरूपीं असती । तयांसी कळली मायेची स्थिती । सकळ

मिथ्यात्वें देखती । अज्ञानाची भ्रांति तया नाहीं ॥१४॥ बंधमुक्तीचा वळसा । तेचि अज्ञानाची दशा । निद्रिस्त वोसणाये जैसा । भ्रांतीचा फांसा पडिलासे ॥१५॥ ज्यातें तुझी कृपा झाली । त्याची भ्रांति निरसली । कल्पना विरोनि गेली । वृत्ती बुडाली तुझ्या रूपीं ॥ १६ ॥ परिस लागलियां लोहातें । दूरि केलें काळीमेतें । श्रेष्ठत्व आणिलें नीचातें । परी अळंकारातें न मुके ॥१७॥ पूर्वकर्म जें घडलें । तेणें तें नांव पावलें । लोहोपणासी मुकलें । न मोडतां झालें सुवर्ण ॥१८॥ तैसें त्वां कृपावंतें । निरसिलें भ्रांति काळिमेतें । निरसूनि ज्ञानआज्ञानातें । निजसुखातें मिळविलें ॥ १९ ॥ परी देहाचिये माथा । आहे कर्मरेखेची सत्ता । ते न चुके गा गुरुनाथा । सुखदुःख संचिता भोगवी ॥२०॥ घालुनी आशेचा पाश । हिंडवी नाना देश । हिंपुटी करूनी देहास । संचित तैसें भोगवी ॥२१ पूर्वीं कर्म जें घडलें । अळंकारातें आटिलें । तें नांवपणासी मुकलें । केवळ जालें सुवर्ण ॥२२॥ जैसा वृक्ष छेदलिया समूळ । आर्द्रता न तुटे तात्काळ । आंगीं असोनि अल्पकाळ । मग केवळ काष्ठ होय ॥२३॥ पत्रें आणि पुष्पें फळ । सहित जाळला समूळ । अग्निसंगें केवळ । भस्म होय

॥२४॥ तैसी सद्गुरु कृपा होय । तोडी विवेका-
चेनि घायें । देहवृक्ष पाडिला पाहे । आर्द्रता राहे
संचिताची ॥ २५ ॥ जैसा अनुभवें तो वाळतु ।
संचितक्रियमाणासहितु । वृक्षांची खुंटली मातु ।
पावलियां देहांतु शून्य होये ॥२६॥ भस्म जालिया
नंतरें । वृक्षाचाहि ठाव नुरे । तैसा देह अनुभवें
विरे । पुढें वोसरे जन्ममरण ॥ २७ ॥ तैसें देह
पावलिया लय । पूर्वकर्म सहजेंचि जाय । संचि-
तासि नुरे ठाय । सहजें होय सुखरूप ॥ २८ ॥
पूर्वकर्माचिये ऐशी परी । गुरुभक्त नेघे आपणा-
वरी । राहोनि आनंदाभीतरीं । साक्षित्वें व्यवहारीं
वर्तत ॥२९॥ जैसें जळामाजीं पद्मपत्र । जळीं
असोनि अलिप्त । तैसा मुक्त व्यवहारीं वर्तत ।
सुखें भोगित स्वानंदें ॥३०॥ भवभ्रमातें निरसिलें ।
जन्ममरणातें चुकविलें । देहीं असतां मुक्त केलें ।
स्वरूपीं मेळविलें आपुलिया ॥ ३१ ॥ तुझिया
स्वरूपाचा अनुभव । जाणती संत सज्जन प्रभाव ।
निरसोनि देहाचा देहभाव । सुखें स्वानुभव भोगिती
॥३२॥ जो अमृताचे सागरीं । अहर्निशीं क्रीडा
करी । तो जन्ममरणाचें भय धरी । हें कैशापरी
घडेल ॥३३॥ जेथ जन्ममरण जालें वावो । तेथें
बंधमुक्त कैंचा ठावो । जीव गिळोनि आपुला

उगवां । विसरला पाहाहो दुजेपण ॥ ३४ ॥ ऐसी तुझे कृपेची करणीं । भवभ्रम निरासिला ततूक्षणीं । निद्रिस्त वोसणावे स्वप्नीं । तया उठवुनि सावध केलें ॥३५॥ पुरुषोत्तम नाम पंचाक्षर । जो भावें भजे निरंतर । तेथें कैचा भवभ्रम संचार । न चले व्यापार पंचभूतांचा ॥ ३६ ॥ सद्गुरुचरणीं जयाचा भावो । तयां बंधमुक्तता जाल्या वावो । त्यातें काळ विसरला पाहाहो । तया ठावो ब्रह्मपदीं ॥३७॥ भावार्थी जे निजगडे । तयां बद्धमुक्तता केवीं घडे । यमपुरी वोस पडे । म्हणोनी रडे प्रेत-नाथ ॥३८॥ जैं पतंग भक्षी वडवानळासी । दर्दुरीं गिळिजें शेषासी । जैं खद्योतें गिळिजे रवि-बिंबासी । तैं गुरुभक्तासी बद्धता ॥ ३९ ॥ जैं वायसें युद्ध कीजे खगपतींसी । पिपिलिका सप्त-सागर शोषी । कीं मुकुटें गिळिजें ब्रम्हांडासी । तैं गुरुभक्तांसी बध्दता ॥४०॥ जैं चित्रींचिया हुता-शनें । दग्ध होती महावनें । कीं रज्जूसर्पाचिया पानें । मृत्य पावे कृतांतू ॥४१॥ किं मक्षिकाचेनि थडकें । महागिरी पडोंशके । किंवा प्रेताचेनि धाकें । झडपोंशके महाकाळ ॥४२॥ किंवा वांझेचेनि सुतें । रणीं जिंकिजे इंद्रातें । किंवा कासवीचेनि घृतें । कुंभकर्णासीं तरळ होय ॥४३॥ हेंहि ईश्वरइच्छा

घडे । परी गुरुभक्तांसी बद्धता न घडे । जन्ममरणाचें फिटलें कोडें । तुटलें बिरडें मायेचें ॥ ४४ ॥ जे माया त्रिभुवनें व्याली । सकळ भूतातें व्यापूनि ठेली । निमिष्यमात्रें ब्रह्मांडें रचिलीं । सृष्टी केली स्वइच्छा ॥४५॥ तयेचा नेणती पारु । ब्रम्हादी हरिहरू । उत्पत्ति स्थिति संहारू । हाही व्यापारू मायेचा ॥४६॥ त्रिमूर्तींची जे सत्ता । हे मूळमायेची प्रतापता । शक्तीविण कार्यकर्ता । हें सर्वथा न घडेचि ॥४७॥ अगाध मायेचें करणें । रचूनि नाना विद्यानें । करूनि अवघेचि विसर्जनें । अदृश्यपणें वर्तत ॥४८॥ जें स्वरूपीं इच्छा जाली । ते हे माया नांव पावली । सकळ भूतांतें प्रसवली । सृष्टी निर्मिली पळमात्रें ॥४९॥ शिवा आणुनी जीवपण । तयासी लाविलें जन्ममरण । सुखदुःखादि भोग दारुण । करूनि आपण निराळी ॥ ५० ॥ ऐसी ये माया सबळ । एवढें रचिलें जगड्वाळ । ते गुरुभक्तापुढें केवळ । मिथ्या मृगजळ होऊनि ठेली ॥५१॥ शिव विरंचिं नारायण । आणि साधुसंत योगीजन । हे स्वरूपीं जाले निमग्न । यातें माया वदन दाऊं न शके ॥५२॥ जेथ अज्ञानाचा सुकाळ । तेथें मायेचा गोंधळ । जो ज्ञाता अनुभवी केवळ तेथ विटाळ मायेचा ॥५३॥ जरी म्हणाल मायेचा

विटाळ। तरि कां देह धरिला स्थूळ। ऐसें म्हणतां ते केवळ। अज्ञानी समूळ जाणावे ॥५४॥ मायेसी नाहीं स्वतः चळण। इसी चाळिता आदिनारायण। माया पटळ आड लावून। भूतांतें आपण चेष्टवी ॥५५॥ जैसा छाया मंडपाभीतरीं। एकला बैसोनि सूत्रधारी। वस्त्र लावूनि माझारीं। प्रभा अंतरी दीपाची ॥५६॥ नाना अचेतन पुताळियां। स्वइच्छा नाचवी तयां। हावभाव दाऊनियां। जन भुल-वावया खेळतु ॥५७॥ एक एकातें मारित। आप-णचि शंखध्वनी करित। काय जालें म्हणोनि पुसत। आणि हांसत आपणचि ॥५८॥ भंडउभंडातें दावी। नाना पातकें करवी। गाईपाठीं व्याघ्र लावी। आणि मारवी तयेते ॥ ५९ ॥ अनंत पुतळीयांतें दावित। संहार स्वइच्छा करीत। अज्ञानाते साच दिसत। नसे मेले जीत ते ठाई ॥६०॥ दाखवी नाना सुखदुःखातें। हें होय कवण कवणातें। एकाविण दुजें नाहीं तेथें। पापपुण्या ठाव कैचा। ६१॥ तैसा भगवंत लीलावतारी। चिदाकाशींच्या मंडपाभीतरीं। मायपट आड लाऊनि माझारीं। प्रभा अंतरी स्वरूपाची ॥६२॥ नानायाती नानावर्ण नानाकर्मे पापपुण्य। सुखदुःखादि भोग दारुण। करूनि आपण निराळा ॥ ६३ ॥ तो जैसें जैसं

चेष्टवित । तैसीं तैसीं भुतें नाचत । सर्वही करविता भगवंत । पापपुण्य हें कवणासी ॥६४। पापपुण्य हें बोलणें। जैसें शेतामाजीं बुजवणें । तेथें नसे साचपणें । वृथा भिणें वनचरीं ॥ ६५ ॥ तैसें ते अज्ञानी जन । तयांसी दिसे पाप पुण्य । जे जीवन्मुक्त सज्ञान तयांसी त्रिभुवनमुक्त दिसे ॥६६॥ जो सकळांचा जाणता । तो मायेचा नेणता । साधु भगवंताच्या ये समता । म्हणोनि बद्धता न घडे त्यासी ॥६७॥ त्यासी माया मिथ्या कळली पाहीं। तो देहीं असोनी विदेही। जन्ममरणाचें भय नाहीं। सच्चिदानंदडोहीं क्रीडतु ॥ ६८ ॥ जयांसी नाहीं आत्मज्ञान । तयांसी देहाचें बंधन । नाना सुखदुःखभोग दारुण । जन्ममरण भोगिती ॥६९॥ जे सद्गुरुचें अंकित । तयांसी देह दुर्लभ बहुत। स्वरूपीं होऊनियां रत । सुख भोगिती स्वानंद ॥७०॥ जैसे द्रव्याचोनि गुणें । एकीं विष घेऊनी भक्षणें । एकी उपभोग भोगणें । एक दानधर्म करिती ॥७१॥ तेथ द्रव्यासी नाहीं दूषणें । आपुलें संचित भोगणें । तैसें देहाचेनि गुणें । बद्धमुक्तपण भोगिजे ॥७२॥ जे नाना पातकें करित । त्यांसी देह काय करा म्हणत । कां जे श्रीहरीसी शरण रिघत । तयासी सांगत देह काई? ॥ ७३ ॥ देह

विटाळ । तरि कां देह धरिला स्थूळ । ऐसें म्हणतां ते केवळ । अज्ञानी समूळ जाणावे ॥५४॥ मायेसी नाहीं स्वतः चळण । इसी चाळिता आदिनारायण । माया पटळ आड लावून । भूतांतें आपण चेष्टवीं ॥५५॥ जैसा छाया मंडपाभीतरीं । एकला बैसोनि सूत्रधारी । वस्त्र लावूनि माझारीं । प्रभा अंतरीं दीपाची ॥५६॥ नाना अचेतन पुताळियां । स्वइच्छा नाचवी तयां । हावभाव दाऊनियां । जन भुल-वावया खेळतु ॥५७॥ एक एकातें मारित । आप-णाचि शंखध्वनी करित । काय जालें म्हणोनि पुसत । आणि हांसत आपणचि ॥५८॥ भंडउभंडातें दावी । नाना पातकें करवी । गाईपाठीं व्याघ्र लावी । आणि मारवी तयेते ॥ ५९ ॥ अनंत पुतळीयांतें दावित । संहार स्वइच्छा करीत । अज्ञानाते साच दिसत । नसे मेले जीत ते ठाई ॥६०॥ दाखवी नाना सुखदुःखातें । हें होय कवण कवणातें । एकाविण दुजें नाहीं तेथें । पापपुण्या ठाव कैचा । ६१॥ तैसा भगवंत लीलावतारी । चिदाकाशींच्या मंडपाभीतरीं । मायपट आड लाऊनि माझारीं । प्रभा अंतरी स्वरूपाची ॥६२॥ नानायाती नानावर्ण नानाकर्में पापपुण्य । सुखदुःखादि भोग दारुण । करूनि आपण निराळा ॥ ६३ ॥ तो जैसें जैसें

चेष्टवित । तैसीं तैसीं भुतें नाचत । सर्वही करविता भगवंत । पापपुण्य हें कवणासी ॥६४। पापपुण्य हें बोलणें । जैसें शेतामार्जी बुजवणें । तथें नसे साचपणें । वृथा भिणें वनचरीं ॥ ६५ ॥ तैसें ते अज्ञानी जन । तयांसी दिसे पाप पुण्य । जे जीवन्मुक्त सज्ञान तयांसी त्रिभुवनमुक्त दिसे ॥६६॥ जो सकळांचा जाणता । तो मायेचा नेणता । साधु भगवंताच्या ये समता । म्हणोनि बद्धता न घडे त्यासी ॥६७॥ त्यासी माया मिथ्या कळली पाहीं । तो देहीं असोनी विदेही । जन्ममरणाचें भय नाहीं । सच्चिदानंदडोहीं क्रीडतु ॥ ६८ ॥ जयांसी नाहीं आत्मज्ञान । तयांसी देहाचें बंधन । नाना सुखदुःखभोग दारुण । जन्ममरण भोगिती ॥६९॥ जे सद्गुरुचें अंकित । तयांसी देह दुर्लभ बहुत । स्वरूपीं होऊनियां रत । सुख भोगिती स्वानंद ॥७०॥ जैसे द्रव्याचेनि गुणें । एकीं विष घेऊनी भक्षणें । एकी उपभोग भोगणें । एक दानधर्म करिती ॥७१॥ तेथ द्रव्यासी नाहीं दूषणें । आपुलें संचित भोगणें । तैसें देहाचेनि गुणें । बद्धमुक्तपण भोगिजे ॥७२॥ जे नाना पातकें करित । त्यांसी देह काय करा म्हणत । कां जे श्रीहरीस शरण रिघत । तयासी सांगत देह काई? ॥ ७३ ॥ देह

पाहतां अचेतन । देहासी कैंचें दूषण । जो देहासी चेष्टवी जाण । सुखदुःखभोगणें त्यालागीं ॥७४॥ जैसी काष्ठाची पुतळी केली । सर्व इंद्रियें निर्मिलीं । परी चाळितेविण जाली । प्रेतरूप ॥७५॥ चाळिता बैसे अंतरीं । वोढी इंद्रियांची दोरी । मग प्रवर्त व्यापारीं । सूत्रानुक्रमें ॥७६॥ तेथ सुखदुःखअवस्था कैसी घडे पुतळीचे माथां । जो अंतरी चेष्टविता । तोचि कर्ता सर्वही ॥७७॥ तैसे देह अचेतन । त्यांत चाळवितें मन । सर्व इंद्रियें मनाआधीन । स्वामी जाण तयांचा ॥७८॥ पापपुण्याची कल्पना । संकल्पविकल्प उठवी नाना । विसरोनी आत्मज्ञाना । जन्मरण भोगित ॥ ७९ ॥ ज्यासी सद्गुरुकृपा होय । त्याचें मनपण विरोनि जाय । संकल्पविकल्पां नुरे ठाय । मिरासी होय मोक्षाचा ॥ ८० ॥ सद्गुरूचे कृपेवीण । नव्हे मोक्षाचें साधन । जन्ममरणाचें बंधन । न चुके जाण सर्वथा ॥८१॥ एक गुरुभक्तातें निंदिती । एक गुरु म्हणजे काय म्हणती । जे जे गुरूतें सेविती । तयांसी प्राप्ती काय जाली ॥८२॥ सद्गुरुभजनीं लाधलें सुख । तें नेणती अज्ञान मूर्ख । विषयसुखें मातले देख । जन्ममरणाचें दुःख भोगिती ॥ ८३ ॥ जैसी नपुंसकासी पद्मिणी । कां निर्नासिकासी दर्पणी । कीं

